# प्रकरण चार

## बांधकाम विभाग

**4.144 अंगणवाडी बांधकामाकरीता ग्रामपंचायतींना वाटप केलेल्या अनुदान वाटपाबाबत. (बांधकाम पश्चिम)**

**पंचायत समिती कल्याण, जिल्हा ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16)** - पंचायत समिती, कल्याण, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे यांनी एकात्मिक बाल विकास योजना अंतर्गत रक्कम रुपये 90,00,000/- इतके अनुदान वाटप केलेले आहे. सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9,दिनांक 31/01/2013 नुसार सदरच्या कामास कार्यकारी अभियंता यांची तांत्रिक मंजूरी घेण्यात आली किंवा कसे याबाबत खात्री झालेली नाही.

2) ग्रामपंचायत स्तरावर वितरीत झालेल्या अनुदानाचा विनियोग विहीत वेळेत करण्यात आल्याची खात्री झाली नाही.

3) अनुदान खर्चाची मुल्यांकने व विनियोग प्रमाणपत्रे पंचायत समिती स्तरावर उपलब्ध झालेली नाहीत.

4) अंगणवाडी केंद्राचे बांधकाम पूर्ण झालेबाबत गट विकास अधिकारी व उपअभियंता तसेच बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे संयुक्त स्वाक्षरीने अहवाल पाठविणे आवश्यक आहे.

**4.145 13 वा वित्त आयोगातून करण्यात आलेल्या विकासकामातील अनियमिततेबाबत. (शासकीय निधी)**

**पंचायत समिती वाडा, जिल्हा पालघर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती, वाडा यांनी पंचायत समिती 13 वा वित्त निधीतून बांधकामावर एकूण रुपये 8,00,000/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक ग्रासोयो-2007/ प्र.क्र.1/यो-9,दिनांक 08/05/2007 मधील परिच्छेद क्रमांक 3.2.8. तसेच शासन निर्णय, क्रमांक झेडपीए-2004/प्र.क्र.18/वित्त/(33),दिनांक 30/06/2004 नुसार ग्रामपंचायतीस प्रथम प्राधान्याने कामे द्यावयाची आहेत, संबंधित ग्रामपंचायतीने असमर्थता दर्शविल्यास त्या कामाचे वाटप मजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता, आणि नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यांना 33.33.34 या प्रमाणात वाटप करावयाचे असताना त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त-9, मुंबई,दिनांक 20/06/2008 अन्वये कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, नियमावली 1964 चे नियम 296 (ब) नुसार जानेवारी ते मार्च दरम्यान कोणतेही काम देऊ नये असे असताना कामाचे वाटप करण्यात आलेले आहे.

4) कार्यारंभ आदेशात काम पूर्ण करावयाचा कालावधी नमूद करण्यात आलेला नाही.

5) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, क्रमांक झेडपीए/प्र.क्र.44/33,दिनांक 22/12/2000 नुसार कामाचा पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेवरून नोंदविण्यात आलेला नाही.

**4.146 तर लिलाव वसुलीबाबत. (जिल्हा फंड)**

**पंचायत समिती वसई, जिल्हा पालघर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती, वसई अंतर्गत लिलाव याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

अ) पाणजू ते नायगांव

1) प्रवासी वाहतुकीकरता प्रवासी परवान्याचे कागदपत्रे प्राप्त झाले नाहीत.

2) प्रवाशांचे सुरक्षेसाठी लाइफ जाकेट रिंग बॉय जीवरक्षक साधनाची पूर्तता केल्याचे दिसून येत नाही.

3) प्रवासी विमा नोंदणीपत्र परवान्याबाबतचे कागदपत्र प्राप्त झाले नाही.

4) तरीच्या ठेक्यास कार्यकारी अभियंता, बांधकाम यांची मंजुरी घेणेत आलेली नाही.

5) लिलाव प्रकियेत एकच स्पर्धक असताना दुबार लिलाव प्रक्रियेचा अवलंब करणे आवश्यक असताना योग्य प्रकारे लिलाव प्रक्रियेची अंमलबजावणी करणेत आलेली नाही.

ब) अर्नाळा ते अर्नाळा किल्ला

1) तर लिलाव मक्तेदाराकडून करारनामा करून घेतलेला नाही.

2) प्रवासी विमा छत्र घेण्यात आलेला नाही.

3) कार्यकारी अभियंता, बांधकाम यांची मंजुरी घेणेत आलेली नाही.

4) लिलाव प्रक्रियेत एकच स्पर्धक असताना दुबार लिलाव प्रक्रियेचा अवलंब करणे आवश्यक असताना योग्य प्रकारे लिलाव प्रक्रियेची अंमलबजावणी करणेत आलेली नाही.

**4.147 निवासस्थानाची अनुज्ञाप्ती शुल्क कमी दराने वसुली केलेबाबत.**

**पंचायत समिती वसई, जिल्हा पालघर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती वसई अंतर्गत वाटप केलेल्या निवासस्थानाची अनुज्ञाप्ती शुल्क रक्कम रुपये 1,56,940/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुंबई नागरी सेवा नियम 1959 व शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक घभाव/2010/ प्र.क्र.4/सेवा-5,दिनांक 19/04/2011 नुसार शासकीय कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतन संरचनेनुसार कर्तव्यस्थानी पुरविलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या शासकीय निवासस्थानासाठी अनुज्ञाप्ती शुल्काचे दर संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वेतनानुरुप निवासस्थानाच्या पात्रतेचा विचार न करता प्रत्यक्षात ताब्यात असलेल्या निवासस्थानच्या प्रकारासाठी अनुज्ञाप्ती शुल्काची वसुली दि. 1/5/2011 पासून बदललेल्या दरान्वये करणे आवश्यक असताना तशी वसुली केलेली नाही. तरी शासन निर्णयान्वये अनुज्ञाप्ती शुल्क शासकीय निवासस्थानी रहात असलेल्या 9 कर्मचाऱ्यांकडुन रक्कम रुपये 1,56,940/- वसुल करणे आवश्यक आहे.

**4.148 नवीन अंगणवाडी इमारत बांधकामबाबत. (अभिकरण निधी)**

**पंचायत समिती डहाणू, जिल्हा पालघर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती डहाणू यांनी प्रमाणक क्रमांक 2,दिनांक 19/09/2014 अन्वये 20 अंगणवाडी बांधकामाकरीता रुपये 6,60,000/- प्रमाणे रुपये 1,32,00,000/- मंजूर होते तसेच या व्यतिरिक्त 5 अंगणवाडी बांधकामाकरिता रुपये 33,00,000/-, प्रमाणक क्रमांक 1 दिनांक 19/09/2014 अन्वये दिले. एकूण रुपये 1,65,00,000/- प्राप्त झाले. सदरची रक्कम प्रत्येकाला 50 टक्के, 40 टक्के, 10 टक्के याप्रमाणे ग्रामपंचायतींना वाटप केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संबंधित 25 अंगणवाडी केंद्रांचे बांधकाम दिनांक 31/03/2015 पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असताना पूर्ण झाले नाही. संबंधित ग्रामपंचायतींना अद्याप पर्यंत काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र, फोटो पाठविले नाहीत, यास्तव संबंधित ग्रामपंचायतींनी अनुदान खर्च केल्या बाबत त्यांचेकडून फोटो मुल्यांकन, मोजमाप पुस्तकाचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त करुन देणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.444/वित्त-9,दिनांक 15/07/2008 नुसार कार्यकारी अभियंता यांची मंजूरी घेतली का याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 77(2) नुसार ग्रामपंचायतींना प्रदान केलेल्या रकमांची पोचपावती आवश्यक आहे.

4) रकमाचे प्रदान करताना परिगणना करुन शासकीय वजाती कराव्यात तशी पूर्तता करुन अनुपालन सादर करावे.

5) आयकर अधिनियक 1961 चे कलम 194 नुसार आयकर रक्कम 2 टक्के वसुल करुन शासनखाती भरणा केल्याचे दिसून येत नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक संकिर्ण 2009/ प्र.क्र.123/पंरा-7,दिनांक 30/10/2009 अन्वये 1 टक्के कामगार उपकर वसुल करुन कामगार कल्याण मंडळाकडे जमा केल्याचे दिसून येत नाही.

7) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमाप-1098/प्र.क्र.28,दिनांक 19/08/1998 अन्वये तसेच विमा संचालनालयाचे पत्र क्रमांक प्राविवि-2903/सहविमा/जिप/संकिर्ण/ अभियांत्रिकी/एम-2,दिनांक 27/06/2003 नुसार व दिनांक 08/05/2002 च्या परिपत्रकान्वये कंत्राटीत कामाचा विमा उतरविला नसेल तर उपरोक्त शासन निर्णयानुसार अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1 टक्के रक्कम वसुल करुन कामगार कल्याण मंडळामध्ये जमा करावे.

8) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची अधिसुचना दिनांक 04/04/2012 पासून मुल्यवर्धित कराच्या टक्केवारी मध्ये सुधारणा करण्यात आली आहे त्यानुसार नोंदणीकृत मक्तेदारीच्या बिलातून 2 टक्के व अनोंदणीकृत मक्तेदाराकडून 5 टक्के मुल्यवर्धित कर वसुल करणे आवश्यक आहे. सदरचे सर्व कराची वसुली करणे आवश्यक आहे.

**4.149 13 वा वित्त आयोगातून केलेल्या बांधकामाच्या देयकातून कामगार कल्याण उपकर व विम्याची रक्कम कपात न केलेबाबत. (शासकीय केंद्र निधी)**

**पंचायत समिती डहाणू, जिल्हा पालघर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती, डहाणू सन 2014-15 वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये सुरक्षा अनामत, कामगार कल्याण उपकर, विमा व गौण खनिजावरील स्वामित्वधन यांची कपात केलेली नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विमा संचालनालयाचे पत्र क्रमांक प्रविवि-2903/सहविमा/जिप/संकिर्ण/अभियांत्रिकी/एम-2, दिनांक 27/06/2003 नुसार कामाच्या देयकाच्या रक्कमेच्या 1 टक्के विम्याची रक्कम देयकातून कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार उपरोक्त विवरणपत्रात नमूद केलेली विम्याची रक्कम रुपये 31,827/- संबंधितांकडून वसुल करुन शासन लेखाशिर्षाखाली जमा करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, क्रमांक बीसीए-2009/ प्र.क्र.108/कामगार-7अ,दिनांक 17/06/2010 नुसार बांधकामावरील खर्चाच्या 1 टक्के कामगार कल्याण उपकरासाठी वसुल करुन संबंधित लेखाशिर्षाखाली भरणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार उपरोक्त विवरणपत्रात नमूद केलेली कामगार कल्याण उपकराची रक्कम रुपये 26,403/- संबंधितांकडून वसुल करुन शासन लेखाशिर्षाखाली जमा करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक गौखनि/10/02/06/ प्र.क्र.57/ख, दिनांक 15/12/2006 नुसार रेती, खडी व मुरुम या गौणखनिजांवर स्वामित्वधनाची रक्कम रुपये 70.67 प्रति घ.मी. (रुपये 200 प्रति ब्रास) दराने वसुल करुन शासनखाती जमा करणे आवश्यक आहे. त्यानुसार उपरोक्त विवरणपत्रात नमूद केलेली रक्कम रुपये 61,569/- संबंधितांकडून वसुल करुन शासन लेखाशिर्षाखाली जमा करावी.

4) सुरक्षा अनामत रक्कम रुपये 7,496/- यासह विमा, उपकर व रॉयल्टी यांची एकूण रक्कम रुपये 1,27,295/- वसुल करावी.

**4.150 गायमाळ येथे अंगणवाडी इमारत बांधणे.**

**पंचायत समिती सुधागड पाली, जिल्हा रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती सुधागड पाली बांधकाम विभागांतर्गत गायमाळ येथे डोंगरी विकास कार्यक्रम अंतर्गत अंगणवाडी बांधकाम करण्यात आलेले असून सदर बांधकामावर रूपये 3,78,186/- इतकी रक्कम खर्च केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण परिपत्रक क्रमांक झेडपी/2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 मधील अनुक्रमांक 3 नुसार मोजमाप नोंदवहीत दिनांक नमुद केलेला नाही.

2) कार्यारंभ आदेशानुसार दिनांक 28/01/2014 रोजी काम पुर्ण होणे बंधनकारक असतांना मुदतीत काम पुर्ण झालेले नाही. दंडात्मक कार्यवाही केलेली नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक ग.वि.अ.-2000/प्र.क्र.847/35, दिनांक 08/05/2002 अन्वये कामगारांचा विमा रक्कम 3,781/- वसूल होणे आवश्यक आहे.

4) ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग क्रमांक पं.रा.स./1088/सी.आर./3041/26, दिनांक 14/09/1988 नुसार जागेची मालकी बाबचे कागदपत्र नस्तीसोबत आढळून आलेले नाहीत.

5) प्रशासकिय मान्यता नस्तीसोबत उपलब्ध नाही, तरी प्रशासकिय मान्यतेशिवाय काम सुरू करणे अयोग्य आहे.

6) करारनामा न करताच कार्यादेश देण्यात आला आहे.

**4.151 पत्र्याची ठाकूरवाडी अंगणवाडी इमारत बांधकाम करणे.**

**पंचायत समिती सुधागड पाली, जिल्हा रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती सुधागड पाली बांधकाम विभागाने डोंगरी विकास कार्यक्रम अंतर्गत पत्र्याची ठाकूरवाडी इमारत बांधकामासाठी रक्कम रूपये 4,50,000/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशासकिय मान्यता नियमानुसार घेण्यात आलेली नाही,

2) करारनामा पुर्ण केलेला नसतांना कामाचे आदेश दिले आहेत.

3) काम पुर्णत्वाचा दाखला तपासणीस उपलबध झाला नाही.

4) प्रकल्प अधिकारी एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प सुधागड यांचे पत्र क्रमांक ए.बा.वि.से.यो./सु.पा./2013/458 दिनांक 05/12/2014 ने सदरचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबतचे पत्र गट विकास अधिकारी यांना दिले असतांनाही अंतिम प्रदान केलेले आहे.

5) ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्र.क्र.4433, दिनांक 22/12/2000 मधील 3 नुसार मोजमाप घेतल्याचा दिनांक नमुद केलेला नाही.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक ग.वि.अ.-2000/प्र.क्र.847/3 /दिनांक 08/05/2002 अन्वये 1 टक्के विमा रक्कम रूपये 3,842/- वसूल केलेली नाही.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक पं.रा.स.1088/सी.आर./304/26, दिनांक 14/09/1988 नुसार जागा जिल्हा परिषद/शासन मालकिची असल्याची खात्री न करता करारपत्र करून अंगणवाडी बांधकाम केलेले आहे.

8) ग्रामपंचायत काम करण्यास आर्थीकदृष्टया सक्षम असल्याचा दाखला गटविकास अधिकारी यांचेकडून घेण्यात आला नाही.

9) सिमेंट खरेदी पावतीवर दिनांक नमुद नाही. त्यामूळे सिमेंट केव्हा खरेदी केले याची माहिती लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही.

10) काम सुरू होण्यापूर्वी, काम प्रगतीपथावर असतांना काम पुर्ण झाल्यावर असे तीन फोटो आवश्यक असतांना फक्त काम पुर्ण झाल्याचा एक फोटो नस्तीत उपलब्ध आहे.

11) मोजमाप नोंदवहीत फक्त मोजमापाच्या नोंदी घेतल्या आहेत परंतू दिनांक नमुद नाही.

12) मोजमाप नोंदवहीत शेवटी कामावर वापरलेल्या साहित्याचा एकत्रीत गोषवारा काढला नाही.

**4.152 फलाणी बौध्दवाडी रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.**

**पंचायत समिती माणगांव, जिल्हा रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती माणगांव मधील पंचायत समिती सेस मधून फलाणी बौध्दवाडी रस्त्याच्या कामावर रक्कम रूपये 99,800/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जिपर/2009/ प्र.क्र.180/पंरा-8, दिनांक 04/07/2009 अन्वये कामाच्या ठिकाणी कामाच्या नावाचा फलक लावणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 140 नुसार ठेकेदाराने बी 1 मधील मजकूर भरणे आवश्यक आहे व बी-1 निविदेच्या मागील पृष्ठावर कार्यकारी अभीयंता यांची स्वाक्षरी असणे आवश्यक असतांना बी 1 निविदा फॉर्म भरलेला नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार कामासाठी वापरलेल्या साहित्याचे चाचणी अहवाल लेखापरिक्षणास प्राप्त झालेले नाहीत.

4) महाराष्ट्र बांधकाम नियम पुस्तीका 1984 च्या परिशीष्ट 24 मधील 13 व 15 प्रमाणे देयक मंजूर केल्यानंतर लाल शाहीने मोजमाप पुस्तीका क्रोस करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) काम केलेली जागा ही ग्रामपंचायत मालकीची असल्याबाबत कोणतेही अभीलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

6) कार्यादेशात नमुद केल्याप्रमणे काम सुरू होण्यापूर्वी फोटो, काम चालू असतांनाचे फोटो व काम पुर्ण झाल्यानंतरचे फोटो नस्तीसोबत नाहीत.

7) सदर काम दिनांक 17/01/2015 रोजी सुरू होऊन दिनांक 17/01/2015 रोजीच पुर्ण झाल्याची नोंद मोजमाप पुस्तीकेत घेतल्याने कामाच्या गुणवत्तेबाबत खात्री पटवावी.

### 4.153 ग्रामपंचायत धामणे येथे अंगणवाडी इमारत बांधणे.

**पंचायत समिती महाड, जिल्हा रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** पंचायत समिती महाड अंतर्गत ग्रामपंचायत धामणे येथे 13 व्या वित्त आयोगातून शासन निधीतून अंगणवाडी इमारत बांधणे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नस्तीसोबत रक्कम रुपये 100/- दिनांक 13/06/2014 चे मुद्रांक पेपर जोडण्यात आले असून त्यावर कामाच्या अटी, शर्ती, गटविकास अधिकारी सरपंच स्वाक्षरी इ. तपशिल नमुद नसल्याने तपशिलात स्वाक्षरी नसलेले मुद्रांक पेपर जोडल्याने करारपत्राशिवाय कामाचे आदेश देण्याबाबत खुलासा आवश्यक आहे.

2) शासन परिपत्रक, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई क्रमांक बी.सी.ए.2009/ प्रक्र.108/कामगार-7अ,दिनांक 09/06/2010 नुसार देयकातून कामगार उपकर 1 टक्के रक्कम रुपये 1,500/- वसुलात आणून शासननिधीत जमा करण्यात यावे.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक व्हि.पी.एस.1099/प्र,शा.99/08,दिनांक 20/05/1998 नुसार कामाच्या ठिकाणी संपूर्ण माहितीचा फलक लावणे आवश्यक असताना सदर कामाबाबत उचित कार्यवाही केलेली नाही.

4) सदर काम यापूर्वी कोणत्याही शासकिय निधीतून / ग्रामनिधीतून न झालेबाबतचे प्रमाणपत्र नस्तीसोबत नसल्याने इतर योजनेतून काम झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. आवश्यक अभिलेखे / प्रमाणपत्र उपलब्ध करुन खात्री पटवावी.

5) देयकासोबतच्या सरपंच / ग्रामसेक धामणे यांनी दिलेले प्रमाणपत्रावर जावक क्रमांक,दिनांक इत्यादी नमुद नाही, तरी सदरचे प्रमाणपत्र कसे स्वीकृत केले.

### 4.154 दलित वस्ती योजनेअंतर्गत चरई बौध्दवाडी येथे रस्ता तयार करणे.

**पंचायत समिती पोलादपूर, जिल्हा रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 18) -** पंचायत समिती पोलादपूर यांनी शासन निधीतून दलित वस्ती अंतर्गत चरई बौध्दवाडी रस्ता तयार करणेकामी सरपंच ग्रामपंचायत चरई यांना मक्त्याने काम दिले असून त्यावर एकूण रूपये 2,44,190/- खर्च केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामाचा मक्ता ग्रामपंचायतीस मंजूर करण्यात आला असून गट विकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत काम करण्यास सक्षम असल्याचा दाखला दिलेला असतांना ग्रामपंचायतीने स्वत: न करता इतर अनोंदणीकृत ठेकेदाराकडून काम करून घेतले आहे.

2) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 नुसार रूपये 10 लाखापर्यंतच्या कामासाठी रूपये 100/- इतके मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक असतांना ते वसूल केले नाही. रूपये 100/- मक्तेदार यांचेकडून वसूल करावे.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग परिपत्रक क्रमांक विकास-1998/प्र.क्र.43/कराधान-1,दिनांक 05/05/1999 व महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक बी.डी.जी./2005/ प्र.क्र.324/इमारती-2,दिनांक 03/03/2006 मधील अट क्र.5 नुसार कार्यकंत्राट व मुल्यवर्धीत कर अधिनियम 2005 खाली नोंदणी झालेल्या कंत्राटदाराच्या देयकातून 2 टक्के मुल्यवर्धीत कर वसूल करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर कंत्राटदार नोंदणीकृत नसल्याने एकूण देयकाच्या 5 टक्के मुल्यवर्धीत कर रूपये 12,209/- व्याजासह वसूल करावे.

4) महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बी.सी.ए.2009/ प्र.क्र.108 कामगार 7अ, दिनांक 17/02/2010 अन्वये 1 टक्के कामगार उपकराची रक्कम रूपये 2,442/- वसूल केली नसून व्याजासह वसूल करावी.

5) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक आयकर-1007/प्र.क्र./105/कोष प्र.5 दिनांक 22/02/2008 नुसार व आयकर कपाती बाबतचे कलम 194(सी) नुसार मक्तेदार यांचे देयकातून 2 टक्के आयकर कपात करणे आवश्यक असतांना कपात केल्या नाही. सबब रूपये 4884/- व्याजासह वसूल करावा.

6) साहित्याचा तपासणी अहवाल घेण्यात आलेला नाही. व जागा मालकिचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.

7) कामाला व्यापक प्रसिध्दी देण्यात आली नाही. त्यामूळे स्पर्धात्मक दराचा लाभ ग्रामपंचायतीस झाला नाही.

8) सुरक्षा अनामत रक्कम रूपये 24,419/- संबंधीत कंत्राटदाराकडून वसूल करावी.

9) कामावरील मजूरांचा विमा 1 टक्के रक्कम रूपये 2,442/- वसूल करून शासन खाती जमा करावे.

10) करारनाम्यावर दिनांक नमुद नाही. व ठेकेदार व सरपंच यांची स्वाक्षरी नाही.

11) रस्ता ज्या जागेवर केला ती जागा ग्रामपंचायतीच्या मालकीची असल्याबाबतचे लेखे तपासणीस उपलब्ध झाले नाहीत.

**4.155 ग्रामपंचायत वावडुंगी वरचीवाडी येथे अंगणवाडी इमारत बांधणे.**

**पंचायत समिती मुरूड, जिल्हा रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती मुरूड मधील ग्रामपंयात वावडुंगी येथे अंगणवाडी बांधणे या कामात शासन निधीतून रक्कम रूपये 4,50,000/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निविदा फॉर्म B-1 कोरा ठेवण्यात आला करानाम्यावर दिनांक नमुद नाही,

2) जमीनीचे अधिगृहण झाल्याचे दर्शविण्यासाठी जागेचे संमतीपत्र उपलब्ध झाले नाही.

3) कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याचे टेस्ट रिपोर्ट नाही.

4) पुर्ण झालेल्या कामाची नोंद नमुना क्रमांक 69 मध्ये घेतली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 118 (3) नुसार कामात वाढ झाल्यास पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. परंतू त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

6) लेखासंहिता 1968 चे नियम 120(2) नुसार कामातील एखादया बाबीवर होणारी बचत ही इतर बाबीवर खर्च करता येणार नाही. तथापि सदर कामामध्ये झालेली बचत रक्कम इतर कामावर खर्च केल्याचे दिसून येते.

7) शासन निर्णय 02/01/1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.6 नुसार साहित्याची तपशिलवार तपासणी केल्याशिवाय देयकाची 10 टक्के रक्कम प्रदान करू नये असे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

8) ठेकेदाराबरोबर करण्यात आलेल्या करारनाम्यामध्ये दिनांक नमुद करण्यात आलेला नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासहिता 1968 मधील नियम 119 नुसार कामाचे आदेश देण्यापूर्वी करारनामा करून त्यावर दिनांक नमुद न केल्याने करानामा विधीग्राहय होऊ शकत नाही.

9) ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील दिनांक 26/08/2000 च्या शासन निर्णयानुसार ग्रामपंचायतीकडे हत्यारे व यंत्र सामुग्री असणे आवश्यक आहे. सदर बाबतची कागदपत्रे नस्तीमध्ये लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 191 नुसार पुर्ण झालेल्या कामाची नोंद नमुना नंबर 69 मध्ये घेण्यात आलेली नाही.

11) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 147 नुसार करारनामे नोंदवही नमुना नंबर 48 मध्ये ठेवणे आवश्यक असतांना ती ठेवण्यात आलेली नाही.

**4.156 आगरनरळ बौध्दवाडी भातडेवाडी रस्ता मजबूतीकरण व डांबरीकरण करणे (भाग - 2).**

**पंचायत समिती रत्नागिरी, जिल्हा रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** सन 2014-2015 मध्ये विकासकामावर रक्कम रुपये 4,99,945/- इतका खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखा संहिता, 1968 चे नियम 154 (5) तसेच, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/1093/प्र.क्र.1516/ भाग-2/33, दिनांक 27/04/2000 अन्वये कामाचे भाग करण्यात येऊ नयेत, असे निर्देश असतांना देखील कामाचे भाग करण्यात आलेले आहेत.

2) गटविकास अधिकारी यांचा ग्रामपंचायत सक्षमतेचा दाखला घेण्यात आलेला नाही.

3) ग्रामपंचायत मालकीचा रस्ता असलेबाबत नमुना नंबर 26 वर नोंद घेतल्याचा दाखला नाही.

4) कामासाठी बाब क्रमांक 4(ब), 5, 6 व 13 नुसार एकूण 386 घनमीटर गौण खनिज वापरण्यात आलेले आहे. परंतु गौण खनिजांच्या स्वामित्वधनाची महसूल विभागाची चलने जोडण्यात आलेले नाहीत. महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, शासन अधिसूचना दिनांक 11/02/2010 नुसार प्रति घनमीटर रुपये 70.67 प्रमाणे रुपये 27,278/- वसूल करणे आवश्यक आहे.

**4.157 करबुडे, काजरेकोंड, गोताडवाडी रस्ता डांबरीकरण करणे.**

**पंचायत समिती रत्नागिरी, जिल्हा रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदर रस्त्याच्या डांबरीकरणासाठी पंचायत समिती सेसमधून रक्कम रुपये 4,99,950/- खर्च करण्यात आलेला आहे. या खर्च प्रक्रियेत पुढील अनियमितता आहेत.

1) कामाचे आदेश जावक क्रमांक 1692/2014, दिनांक 22/07/2014 रोजी दिलेले आहेत. ग्रामपंचायत करबुडे यांचा काम मिळविण्याचा मागणी ठराव क्रमांक 10,दिनांक 30/07/2014 रोजीचा आहे. परंतु, गटविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत सक्षमतेचा दाखला दिनांक 27/09/2014 रोजी दिलेला आहे. म्हणजेच प्रस्तावापुर्वीच कामाचे कार्यादेश दिलेले आहेत.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जिपर/2000/प्र.क्र.837/35, दिनांक 08/05/2002 नुसार कामावर नेमलेल्या कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविलेला नाही. तरीसुध्दा देयकाचे प्रदान केलेले आहे.

3) कामातील बाब क्रमांक 4(ब), 5, 6 व 13 नुसार एकूण 148 घनमीटर गौणखनिज वापरलेले आहे. महसूल व वनविभाग अधिसूचना दिनांक 11/02/2010 नुसार गौण खनिजाची रॉयल्टी शासनाकडे भरण्याची चलने लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे सदर अधिसूचनेनुसार गौणखनिज रॉयल्टी रुपये 70.67 घनमीटर प्रमाणे रुपये 10,459/- ची वसूली देयकातून करणे आवश्यक होते.

4) मोजमाप नोंदवहीमध्ये कामाचे चेनेज नमूद केलेले नाही.

**4.158 हर्चे तांबेवाडी स्मशानभूमी रॅम्प बांधणे.**

**पंचायत समिती लांजा, जिल्हा रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदर कामासाठी प्रमाणक क्रमांक 32, दिनांक 31/03/2015 अन्वये रक्कम रुपये 50,000/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) सदर कामाच्या पंजिकेसोबत जोडलेल्या गाव नमुना सात मधील भूमापन क्रमांक 412 प्रमाणे जमिन सरपंच, ग्रामपंचायत हर्चे यांचे मालकीची असलेबाबतचे तलाठी यांचे नमुना 7अ चे प्रमाणपत्रावर सही शिक्का नाही.

2) स्मशानभूमी रॅम्प बांधकामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल सोबत जोडलेला नाही.

**4.159 पंचायत समिती मालवण, चिंदर साटमवाडी रस्ता डांबरीकरण करणे.**

**पंचायत समिती मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** चिंदर साटमवाडी रस्ता डांबरीकरणाचे काम पंचायत समिती मालवण यांनी तेरावा वित्त आयोगातून रुपये 98,515/- खर्च करुन केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंदाजपत्रकात चाचणी अहवालासाठी रक्कम रुपये 4,275/- इतकी तरतुद केली आहे व ती रक्कम मक्तेदारास अदा केली आहे. प्रत्यक्षात नस्तीसोबत अंदाजपत्रक प्रमाणे रक्कम रुपये 1,075/- चे अहवाल प्राप्त आहेत. सबब जादा रक्कम रुपये 3,200 प्रदान झाले आहे. संबंधित बाबींचे चाचणी अहवाल का प्राप्त करुन घेतले नाहीत. सदर अतिप्रदान रक्कम रुपये 3,200/- संबंधितांकडून वसूल करुन शासन सदरी भरणा करावी.

2) महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग अधिसूचना दिनांक 11/02/2010 अन्वये सदर कामावर वापरलेल्या साहित्यावरील स्वामित्वधनाच्या रक्कमेची गणना करुन वसुली करावी.

**4.160 पंचायत समिती मालवण, कोळंब शाळा ते टेंबवाडी रस्ता संरक्षक भिंत बांधणे.**

**पंचायत समिती मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदर कामावर तेरावा वित्त आयोगातून रुपये 98,932/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंदाजपत्रकात चाचणी अहवालासाठी रक्कम रुपये 5,000/- तरतुद केली आहे व ती रक्कम मक्तेदारास अदा केली आहे. प्रत्यक्षात नस्तीसोबत अंदाज पत्रक प्रमाणे रक्कम रुपये 1,625/- चे अहवाल प्राप्त आहेत. सबब जादा रक्कम रुपये 3,375/- प्रदान झाले आहे. संबंधित बाबींचे चाचणी अहवाल का प्राप्त करुन घेतले नाहीत. सदर अतिप्रदान रक्कम रुपये 3,375/- संबंधितांकडून वसूल करुन शासन सदरी भरणा करावी.

2) सदरचे काम दिनांक 25/03/2015 रोजी पूर्ण झालेले असून बांधकाम साहित्याचे चाचणी अहवाल दिनांक 31/03/2015 रोजीचे विलंबाने आढळून येतात.

**4.161 सावंतवाडा ते गणपती मंदिर पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणेबाबत.**

**पंचायत समिती दोडामार्ग, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती दोडामार्ग, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 तेरावा वित्त आयोगातून सावंतवाडा ते गणपती मंदिर पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणेकरीता रक्कम रुपये 1,49,955/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामपंचायतीकडे यंत्रसामग्री व कुशल कामगार असल्याबाबतचा दाखला उपलब्ध झालेला नाही.

2) कामाचे जागेचे 7/12 उतारे उपलब्ध झालेले नाहीत.

3) काम पूर्ण झाल्यानंतर कामाचे फोटो, कामाचा बोर्ड उपलब्ध झालेला नाही.

4) विमा काढल्याबाबतची कागदपत्रे उपलब्ध झालेली नाहीत.

5) कामाचा तपशील नमुना नंबर 26 चा उतारा उपलब्ध नाही.

6) अंदाजपत्रकामध्ये बाब क्रमांक 11 मध्ये बोर्डसाठी रुपये 4,831/- दर्शविलेली असून मुल्यांकनामध्ये रुपये 4,831/- आहे. परंतु कामाच्या बोर्डाचा फोटो उपलब्ध झालेला नसल्याने तो बोर्ड लावला किंवा कसे याबाबत खात्री करता आली नाही. तरी बोर्डाची रक्कम रुपये 4,831/- वसूल करावी.

**4.162 पंचायत समिती दोडामार्ग सावंतवाडा ते गणपती मंदिर रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. (0/50 ते 0/200)**

**पंचायत समिती दोडामार्ग, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** तेरावा वित्त आयोग निधीतून रक्कम रुपये 1,69,089/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंदाजपत्रकाप्रमाणे साईड गटार खोदाई 13.77 घन मीटर इतके करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात साईड गटार खोदाई 7.20 घन मीटर इतके केलेले आहे. म्हणजेच गटार खोदाई कमी करणेत आलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 118 (1) व 153 नुसार कंत्राटदाराने अंदाजपत्रकानुसार काम केल्याचे दिसून येत नाही. तरी कमी गटार खोदाईची रक्कम रुपये 1,327/- वसूल करावी.

2) ग्रामपंचायतीकडे कुशल कामगार व यंत्रसामग्री असल्याबाबतचा दाखला उपलब्ध झालेला नाही.

3) कामगारांचा विमा, विमा संचालनालयाकडे काढले बाबतची कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत.

4) कामापूर्वीचे व काम पूर्ण झाले नंतरचे 7/12 उतारे उपलब्ध झाले नाहीत.

5) कार्यारंभ आदेश सरपंच ग्रामपंचायत कसई-दोडामार्ग यांची आदेश प्राप्त झालेबाबत पोहोच उपलब्ध झाली नाही.

**4.163 यशवंत ग्रामसमृदधी योजना निधीबाबत.**

**पंचायत समिती सिन्नर, जिल्हा नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 31) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, सिन्नर यांचेकडील यशवंत ग्रामसमृदधी योजना निधी रोखवही नमुना नंबर 7 ची पडताळणी केली असता रोखवही अपुर्ण असून दिनांक 31/03/2015 अखेर रूपये 46,02,254/- शिल्लक आहेत. सदर निधीचे बँक पासबुक अदयावत भरून घेणेत आलेले नाही. तसेच रोखवही व बँक पासबुक शिल्लक यांचा ताळमेळ घेतला नाही.

2) सदर योजना सन 2007-2008 पासुन बंद झालेली असल्याने शिल्लक अनुदान त्वरित शासनास परत करणे आवश्यक होते. परंतु याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. निधी अनावश्यक पडून आहे. पंचायत समितीने दिलेल्या माहितीनुसार योजनेअंतर्गत भोकणी, औंढेवाडी, शिवडे व मुसळगांव येथील कामे अपुर्ण आहेत. सदरची कामे दिर्घ कालावधीपासून अपुर्ण असल्याने तांत्रिकदृष्टया परिपुर्ण राहु शकत नाही. अनुदान विनाकारण पडून राहिल्याने सदर अनुदानाचा मिळणा-या लाभापासून जनता वंचित राहिलेली आहे. तरी याबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

3) रोखवही व बँक पासबुक अद्यावत करून शिल्लक रक्कम शासन सदरी भरणा करणेत यावी.

**4.164 साकूर ते पिंपळपाटी ते केवटा दारना नदी रस्त्या बाबत.**

**पंचायत समिती इगतपुरी, जिल्हा नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** बांधकामाची अनुषंगीक माहीती मुळ अहवालासोबतचे परिशिष्ट क्रमांक 1 व 2 मध्ये दिलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) यादीतील अनुक्रमांक 02 च्या बांधकामासाठी बाब क्रमांक 2 ते 5 या बांबींना आवश्यक नसतांना चाचणी आकार लावण्यात आलेला आहे. याबाबत खुलासा करुन संबंधितांकडून रुपये 1048/- वसुल करण्यात यावेत.

2) बाब क्रमांक 4 रस्ता खोदाई मधून निघालेली सामुग्री वाहतूक करणेसाठी 1 कि.मी. वाहतूक आकार अंदाज पत्रकात लावलेला आहे.त्यानुसार प्रती घन मीटर 124.63/- रुपये प्रमाणे 1,279.48/- घन मीटरसाठी 1,59,461.59/- रुपये खर्च झालेला आहे. जिल्हा दर सुची नुसार खोदाईतून निघालेली सामुग्री 50 ते 300 मीटर अंतरापर्यत टाकणेसाठी खालीलप्रमाणे प्रती घनमीटर 28.73/- रुपये दर अंदाज पत्रकात घेणे आवश्यक असतांना

अनावश्यक रित्या खोदाईचे साहीत्य 1 कि.मी. अंतरापर्यंत वाहतूक केल्यामुळे प्रती घनमीटर 95.90 रुपये प्रमाणे 1,279.48/- घनमीटर साठी रुपये 1,22,702/- जादा खर्च झाला आहे. याबाबत अनावश्यक खर्चाची रक्कम वसुल करावी.

**4.165 झाडे झुडपे तोडण्यावरील खर्चाबाबत.**

**पंचायत समिती इगतपुरी, जिल्हा नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** बांधकामाची अनुषंगीक माहीती मुळ अहवाल परिशिष्ट क्रमांक 1 व 2 मध्ये दिलेली आहे व झाडे झुडपे तोडण्यावरील खर्चाचा तपशिल परिशिष्ट क्रमांक 13 मध्ये देण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती इगतपुरी उपविभाग बांधकाम यांचे आस्थापनेवर 27 मैल मजुर कार्यरत आहे. सदरचे मजुर झाडे-झुडपे तोडणे, रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे कामे करीत असतात.

13 वा वित्त आयोग व पंचायत समिती सेस निधीतुन हाती घेतलेल्या रस्ता कामांच्या प्राकलनात झाडे झुडपे तोडणे याबाबींसाठी तरतुदी केलेली आहे व त्यानुसार खर्च केलेला आहे. सदरचे काम मैल मजुरांकडुन करुन घेणे आवश्यक असतांना ते न केल्यामुळे परिशिष्ठात नमूद बांधकामांवर रक्कम रुपये 7,77,188/- खर्च झाला आहे.

**4.166 अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न करुन दिलेबाबत. (बिगर आदिवासी उपयोजना अंतर्गत अंगणवाडी बांधकामे).**

**पंचायत समिती शिंदखेडा, जिल्हा धुळे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती शिंदखेडा सन 2014-2015 च्या लेखापरीक्षणात बांधकाम विभागाकडील बिगर आदिवासी उपयोजना सन 2012-13 अंतर्गत अंगणवाडयांचे सन 2014-15 अखेर रक्कम रुपये 49,23,933/- ची बांधकामे पूर्ण झालेले असून मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 (सुधारणा अध्यादेश एप्रिल -2011) च्या कलम 6 अन्वये अर्धसमास पत्र क्रमांक 12, दिनांक 24/09/2015 अन्वये पूर्ण बांधकामाच्या नस्त्या मोजमाप पुस्तिका उपलब्ध करुन दिल्या नाहीत. त्यामुळे बांधकामावर झालेल्या खर्चाची पडताळणी करता आलेली नाही.

**4.167 आदिवासी उपाययोजनेंतर्गत अंगणवाडी बांधकामाची जागा उपलब्ध नसल्याने रक्कम परत करणेबाबत. (ग्राम पंचायत डाब, तालुका अक्कलकुवा)**

**पंचायत समिती अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 23) -** आदिवासी उपाययोजनेंतर्गत अंगणवाडी बांधकामाची जागा उपलब्ध् नसतांना रक्कम रुपये 4,64,000/- इतकी परत केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 99 नुसार अधिनियमाच्या उपबंधाना अधीन राहुन ग्राम पंचायतीने परिषदेच्या किंवा समितीच्या वतीने हाती घेतलेल्या बांधकामांच्या कार्यवाहीस आणि परिरक्षणास संबंधित गटाचा उपअभिंयता जबाबदार असेल.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रंमांक पंरास-1088/सीआर/ 30412,दिनांक 14/09/1988 नुसार बांधकामाची जमीन ताब्यात घेतल्याशिवाय कामांना मंजुरी देवु नये व प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेनंतर महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 146 नुसार कामाचा करारनामा व नियम 147 नुसार कामाचे आदेश जागा उपलब्ध नसतांना गटविकास अधिकारी यांनी कसे दिले यांचा बोध होत नाही.

3) सदर पंचायतीकडे जागा उपलब्ध नसतांना कनिष्ठ अभिंयता यांनी बांधकामाचा सर्वसाधारण अहवाल व बांधकामाचे अंदाजपत्रक कसे तयार करण्यात आले. उपअभिंयतानी सदर पंचायतीकडे जागा उपलब्धतेबाबतची खात्री न करता तांत्रिक मंजुरी कशी देण्यात आली.

4) सदर काम सुरु करण्यापुर्वी कामास जागा उपलब्ध असल्याबाबतचा ग्रामसभा ठराव व नमुना नंबर 8 चे प्रमाणपत्र संबंधित ग्रामसेवक व सरपंच यांनी कसे दिले.

**4.168 मौजे सजननगर भालगांव पासुन जळुकडे जाणाऱ्या रस्त्याच्या साईटपट्टया भरणे 00/00 ते 1/350 कामाबाबत.**

**पंचायत समिती एरंडोल, जिल्हा जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 32) -** उपरोक्त कामावर रक्कम रुपये 1,88,275/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बाब क्र.9 excavation for roadway in by mechanical means वर मॅकॅनिकल मिन्स ऐवजी मानवी दर घेण्यांत आल्याने 945 घ.मी. साठी रक्कम रुपये 56,029/- अतिप्रदान झाले आहे.

2) नमुना नं 39 /40 मध्ये सदर कामांची नोद नाही.

3) बांधकाम नियमपुस्तिका परि.क्र.132 नुसार अटींचे पालन झालेले नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जल संधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीसीएम-1099/ प्र.क्र.54/08,दिनांक 20/5/1999 नुसार रुपये 2,000/- वरील कामांची माहिती फलक बसविणेची कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/ प्र.क्र.44/33,दिनांक 21/12/2000 नुसार काम पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तकात नोंदविण्यांत आलेला नाही.

6) महाराष्ट्र राज्य, राजपत्र अध्यादेश दिनांक 4/4/2012 नुसार 1 टक्का कमी कपात केलेली व्हॅट रक्कम रुपये 1,883/- वसुल करण्यांत यावी.

**4.169 13 वा वित्त आयोग निधीतुन हायमॅक्सदिवे उभारणी कामी केलेल्या खर्चाबाबत.**

**पंचायत समिती अहमदनगर, श्रीरामपुर, पाथर्डी, श्रीगोंदा, पारनेर, अकोले, कोपरगांव, जिल्हा अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 21,6,23,6,4,8,18) -**

| **पंचायत समिती** | **अहमदनगर** | **सन 2014-2015** | **परिच्छेद क्रमांक** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| पंचायत समिती | अहमदनगर | सन 2014-2015 | 21 | रु.9,13,904/- |
| पंचायत समिती | श्रीरामपुर सन | 2014-2015 | 6 | रु.12,37,749/- |
| पंचायत समिती | पाथर्डी | सन 2014-2015 | 23 | रु.3,12,544/- |
| पंचायत समिती | श्रीगोंदा | सन 2014-2015 | 6 | रु.53,54,831/- |
| पंचायत समिती | पारनेर | सन 2014-2015 | 4 | रु.32,44,751/- |
| पंचायत समिती | अकोले | सन 2014-2015 | 8 | रु.29,58,115/- |
| पंचायत समिती | कोपरगांव | सन 2014-2015 | 18 | रु.2,23,014/- |
| | | | एकूण | रु.1,43,44,908/- |

अहवाल वर्ष 13 वा वित्त आयोग निधी खात्यातुन हायमॅक्स दिवे उभारणी कामी वरील प्रमाणे पंचायत समिती निहाय खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचा महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रंमांक तेविओ 2010/प्र.क्र.22/ वित्त-4, दिनांक 30/08/2010 मध्ये 13 वा वित्त आयोगातुन हाती घ्यावयाच्या कामात समावेश नसल्याने सदर हायमॅक्स दिवे बसवीणे कामी केलेला खर्च नियमबाहय असल्याने दिसून येते.

2) सदर कामावरील खर्चास उपरोक्त नमुद शासन निर्णयातील अनुक्रमांक इ 11 नुसार शासनाची मान्यता घेवून पूर्तता दर्शवावी.

3) हायमॅक्स साहित्याची शासन निर्णयानुसार शासकिय प्रयोग शाळेकडून तपासणी करण्यात आलेली नाही. हायमॅक्स कामाबाबत कंपनीकडून विहीत कालावधीतील दुरुस्तीबाबत कराराचे कागदपत्र नस्तीसोबत आढळून आलेले नाही.

4) सदर कामाच्या पोहच ग्रामपंचायतींकडून प्राप्त करण्यात आलेल्या नाहीत.

5) ठेकेदार कंपनीकडून करारपत्र आढळून आले नाही.

**4.170 कांगोणी ते पुंडवाडी रस्ता भराव व खडीकरण करणे.**

**पंचायत समिती नेवासा, जिल्हा अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 30) -** प्रमाणक क्रमांक-587, दिनांक 11/8/2014 रक्कम रूपये 3,19,529/- इतका खर्च नोंदवीलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामाची प्रस्तावना व टिपणी प्राकलनासोबत नाही. त्यामुळे सदर काम कोठे किती काम करावयाचे याची पडताळणी झालेली नाही.

2) डी.एस.आर पान नंबर 172/30 (9) वर 60 मी.मी. खडीचे दर रक्कम रूपये 143/- असताना प्रत्यक्षात अदा करतांना रक्कम रूपये 159/- ने अदा केल्याने जादा अदा रक्कम रूपये 16 x 265.35= रुपये 4,246/- संबंधीतांकडून वसुल पात्र ठरते.

3) डी एस आर पान नंबर 172/38 वर 60 मी मी खडी पसरवण्याचे दर रक्कम रूपये 29/- असतांना प्रत्यक्षात अदा रक्कम रूपये 30/- ने केल्याने जादा रक्कम रूपये 1 x 265.35= रूपये 265.35 वसुलपात्र ठरते.

4) डी एस आर पान नंबर 172/36 ला कडक मुरूम पसरवण्याचे दर रक्कम रूपये 17/- असतांना प्रत्यक्षात अदा रक्कम रूपये 18/- ने केल्याने जदा अदा रक्कम रूपये 1 x 395.28= रुपये 395.28 वसुल पात्र ठरते.

5) मोजमाप पुस्तीका पान नंबर 11,दिनांक 05/07/2014 रोजी बाब क्रमांक 6 दबाईचा दर 1275 स्केअर मी. केलेला आहे. त्यानंतर दिनांक 11/7/2014 कठीन मुरूम 38.88 घन मीटर आनलेला आहे. परंतु मुरूम दबाईचा खर्च नमुद नाही. त्यामुळे कठीण मुरूम आणल्याची सत्यता होत नाही.

6) कामाचा पुर्वीचा, प्रगतीचा व पुर्णत्वाचा फोटो नस्तीसोबत नाही.

**4.171 13 वा वित्त आयोगातुन केलेल्या वेगवेगळया तीन कामातील लिंपनगाव सिध्देश्वर मंदीर येथील कामातील अनियमीततेबाबत.**

**पंचायत समिती श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती श्रीगोंदाचे सन 2014-2015 मध्ये 13 वा वित्त आयोग निधीतून 1) लिंपनगांव येथे सिध्देश्वर मंदिर परिसर सुधारणा करणे रक्कम रुपये 2,32,996/- 2) लिंपनगांव येथे सिध्दश्वर मंदिर परिसर संरक्षक भिंत बांधणे रक्कम रुपये 2,94,687 3) लिंपनगांव येथे सिध्देश्वर मंदिर परिसर संरक्षक भिंत दुरुस्त करणे रक्कम रुपये 44,762/- असे एकूण 5,72,355/- रुपये खर्च करण्यांत आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, तेविआ/2010/प्र.क्र.22/वित्त-4,दिनांक 30/08/2010 नुसार पंचायत समिती स्तरावर करावयाच्या बाब क्रमांक 4, नुसार जिल्हा नियोजन मंडळाने (डीपीसी) ज्या 'क' वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा दिला असल्याचे कोणतेही कागदपत्र लेखा परीक्षणास उपलब्ध नाही. अर्धसमासपत्र क्रमांक 2, दिनांक 05/11/2015 अन्वये लिंपनगांव मंदिर 'क' दिला असल्याचे मागणी केली होती. परंतू ती उपलब्ध झाली नाही. त्यामुळे सदर कामावर झालेला खर्च रक्कम रुपये 5,72,355/- लेखापरीक्षणास अमान्य करण्यांत येत आहे. याबाबत संबंधीतांची जबाबदारी निश्चीत करुन रुपये 5,72,355/- वसुल करुन योग्य त्या लेखाशीर्षखाली भरणा करावी.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय व्हीपीएम/ 1099/प्रक्र54/05,दिनांक 20/08/1999 व शासन निर्णय क्रमांक स्थाविका/2003/प्र.क्र.369/ 1445,दिनांक 28/11/2003 नुसार कामाचा माहिती फलक बसविल्या शिवाय अंतीम देयक अदा करून नये असे आदेश असतांना तशी कार्यवाही करण्यांत आली नाही.

3) साहित्य चाचणी अहवाल घेण्यांत आला नाही.

4) मोजमाप पुस्तिकेत माहिती फलक बसविणे व फोटो याबाबीवर खर्च नोंदविला आहे. नस्तीसोबत फोटो आढळुन आले नाही.

**4.172 मौजे सायखींडी येथील मोठेबाबा रस्ता दुरुस्ती करणे.**

**पंचायत समिती संगमनेर, जिल्हा अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदर कामाचे अंदाजपत्रकीय रकमेच्या 2 टक्के दराने एकूण रक्कम रुपये 3,460/- एवढी सुरक्षा अनामत वसुल करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करणेत आलेली नाही.

महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा सहिता 1968 चे नियम 51 (3) अन्वये देयके अनुक्रमवार नमुना नंबर 12 मधील नोंदवही नोंदवुन लेखासंहिता नियम 37 (1) नुसार प्रत्येक देयकाची लेखा विभागाने छाननीकरणे आवश्यक असुन 37 (2) नुसार पुर्तता केल्यानंतरच देयके पारित करणे क्रमप्राप्त आहे. महाराष्ट शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1001/प.क्र60/38,दिनांक 18/08/2001 अन्वये देयके तपासणीकरीता निर्देशीत केलेल्या मुद्यानुसार पडताळणी न करता देयक पारीत झाल्याचे दिसुन येते. सदर अनियमिततेमुळे देयकाचे दुबार प्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

बाब क्रमांक 4 रस्त्याच्या कामासाठी 153 घनमीटर मुरुम वापरणेत आलेला आहे. तथापि, मुरुमाचे ढीग फेऱ्यामध्ये मोजून मुरुम वापरवही मध्ये नोंद घेणे आलेली नाही. त्यामुळे वापरणेत आलेल्या मुरुमाची खात्री करता आली नाही.

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी/1087/ प्र.क्र.97/इमा-2,दिनांक 14/06/1989 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिप-2009/प्र.क्र.180 पंरास 08,दिनांक 31/12/2009 मध्ये सुचित केल्याप्रमाणे ग्रामिण रस्त्याच्या बाबतीत दोष निवारण कालावधी कामांच्या निविदेमध्ये तंतोतंत नमुद करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करणेत आलेली नाही.

**4.173 मौजे कोकमठाण शामवाडी कपांऊड व बलसाड वस्ती रस्ता मुरुमीकरण करणे.**

**पंचायत समिती कोपरगांव, जिल्हा अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 38) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर निवीदेतील विवरणपत्रांमधील माहिती निविदाकारींनी पुर्ण भरलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिष्द व पंचायत स मिती लेखा संहिता 1968 चे नियम 150 नुसार तांत्रिक मंजुरी देण्यापुर्वी तपशीलवार नकाशे व अंदाज तयार करून त्याचे तंत्र शाखेत परिनिरीक्षण करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 164 मध्ये नमुद केल्याप्रमाणे मोजमाप पुस्तक हा अतिशय महत्वाचा दस्तऐवज असताना मोजमाप पुस्तकाच्या पृष्ठ क्रमांक 5 वरील माहिती कामाचा मासिक प्रगती अहवाल नोंदविलेला नाही. तसेच नियम 147 नुसार नमुना क्रमांक 48 मध्ये करार नोंदवही, नियम 67 नुसार कामाच्या प्रगतीची नोंदवही नियम 197 नुसार पुर्ण झालेल्या बांधकामाची नोंदवही नमुना नंबर 69 मध्ये केलेली नाहीत.

4) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक 1012/प्र.क्र.56/35,दिनांक 30/06/2000 नुसार बांधकामासाठी वापरलेल्या साहित्याची शासकीय प्रयोगशाळेतुन तपासणी करून चाचणी अहवाल प्राप्त करणे आवश्यक असतांनाही तपासणी अहवाल प्राप्त केलेला नाही. त्यामुळे कामाचा दर्जा व गुणवत्ता बाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विवरण क्रमांक सीएटी/1987/प्र.क्र.94/इमाव 2, दिनांक 14/06/1989 अन्वयेदिलेल्या सुचनांनुसार दोष निवारण कालावधीमध्ये कंत्राटदारांकडून रस्त्याच्या खराब झालेल्या भागाची दुरूस्ती होणे आवश्यक आहे. तथापि, करार नामा करताना या बाबीचा समावेश करण्यात आलेला नाही.

6) सदर रस्ता हा जिल्हा परिषद / ग्रामपंचायत मालकीच्या जागेतील असल्याबाबतची कागदपत्रे नस्तीत जोडलेली नाहीत.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक व्हीपीए 1099/सीआर54/03,दिनांक 20/05/99 अन्वये सर्व प्रकारची काम व दुरूस्ती कामे करताना कामाचा लोखंउ फलक लावणे आवश्यक आहे. नस्ती सोबत फलक लावणेबाबतचा तपशील छायाकिंत नसल्यामुळे मोजमाप पुस्तकात बाब

क्रमांक 17 फलक पुरविणे बाब क्रमांक 18 फलक लावणे, व बाब क्रमांक 19 फोटो काढणे याबाबीवरील खर्च रुपये 2,719/- वसुल करावे.

8) नस्तीसोबत जोडलेला वाढ घट तक्ता पाहता बाब क्रमांक 6 व 11 वर जादा खर्च दिसतो. जादा कामासाठी 25 टक्के किंवा रूपये 5,000/- इतका खर्च अनुदेय आहे. त्यामुळे उपरोक्त बाब क्रंमांक 6 चे रुपये 1,225.31/- बाब क्रमांक 31 व बाब क्रमांक 11 चे रुपये 11418.5/- अशी एकुण रुपये 12,643.81/- वसुल करावे.

**4.174 पंचायत समितीकडील बांधकाम विभागाकडे असलेल्या निवासस्थानाबाबत व निवासस्थानावर केलेल्या अनावश्यक खर्चाबाबत.**

**पंचायत समिती वेल्हा, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती, वेल्हा यांनी जिल्हा परिषद निधीमधून बांधकाम विभागाकडे असलेल्या दोन निवासस्थाने दुरूस्तीबाबत प्रमाणक क्रमांक 253 व 254 दिनांक 31/03/2015 अन्वये खर्च रक्कम रूपये 1,98,928/- याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, वेल्हे यांचेकडील दोन निवासस्थान तीन ते चार वर्षापासून बंद असल्यामुळे व कर्मचारी निवासस्थान वापरात नसलेने अनुज्ञप्ती शुल्काबाबतची कार्यवाही करणेत येत नाही व अनुज्ञप्ती शुल्काची नोंदवही ठेवणेत आलेली नाही.

2) सदर दोन निवासस्थाने तीन ते चार वर्षापासून बंद असून प्रत्येक निवासस्थानासाठी रूपये 99,464/- असे दोन निवासस्थानासाठी एकूण रूपये 1,98,928/- असा अनावश्यक खर्च करणेत आलेला आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखासंहिता 1968 च्या नियम 97 नुसार नमुना नंबर 39 प्रमाणे सदर खर्च इमारत नोंदवहीला नोंदवला आहे का, सदर निवासस्थानाचे बांधकाम कधी केले, यापूर्वी केलेल्या दुरूस्ती व विद्‌युतीकरणाचे काम व खर्च तसेच निवासस्थानाबाबतची इमारत नोंदवही याचा तपशील उपलब्ध केला नाही.

4) सदर निवासस्थान दुरूस्ती बिलामध्ये जुने विद्‌युतीकरणाचे काम काढल्याचा उल्लेख नाही. जुने साहित्याची नोंद, सदर साहित्य नादुरूस्त झाले याबाबतचा अहवाल सादर नाही. पहिले काम झाले असताना पुन्हा त्याच ठिकाणी विद्‌युतीकरणाचे काम दाखविणे नियमबाह्य आहे

5) निवासस्थान दुरूस्तीकरणा नंतर ज्या कर्मचा-यांना निवासस्थान वापरात देण्यात आले त्याबाबत नोंदवही ठेवलेली नाही व अनुज्ञप्ती शुल्क वसुल होत नसताना दुरूस्तीचे प्रयोजन स्पष्ट होत नाही. निवासस्थान वापरात नसल्याने त्यावर केलेला खर्च वाया जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**4.175 गट विकास अधिकारी यांचे कक्ष विस्तारीकरण व दुरूस्ती करणे कामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती मावळ, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती मावळ यांनी प्रमाणक क्रमांक 17 दिनांक 15/10/2015 अन्वये रूपये 2,51,554/- गट विकास अधिकारी यांचे कक्ष विस्तारीकरण व दुरूस्तीकामी खर्च केलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 101 चे अनुसुची 2 प्रमाणे पंचायत समितीला त्याचे उपकरातून ठरवून दिलेली कामे करता येतात. सदरचे कामाचा समावेश अनुसूची 2 मध्ये नसल्याने सदरचा नियमबाहय खर्च वसुल करावा.

2) सदर इमारतीचे नोंदवहीमध्ये सदर इमारतीची नोंद व वर्णनाची नोंद केलेली नाही.

**4.176 कालेलकर आस्थापनेवरील कामगारांबाबत.**

**पंचायत समिती कोरेगांव, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 20) -** बांधकाम विभाग कोरेगावमधील कालेलकर आस्थापनेवर कार्यरत 26 कर्मचाऱ्यांपैकी आक्षेपात नमूद केलेले कर्मचारी मैल कामगार असून शासन परिपत्रक बांधकाम विभाग क्रमांक आरजेआर-1082/(214)/का-आर-1, दिनांक 08/10/1984 मधील जोडपत्र (1) मध्ये ठरवून दिलेल्या मैल कामगारांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या निश्चित करुन कामगारांचा आठवडा,

पाक्षिक तसेच मासिक अहवाल तयार केलेले नाहीत व मुकादमाचे अहवालानुसार हजेरी ठेवण्यात आलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 163 नुसार या मैल कामगारांनी केलेल्या कामाची मोजमाप नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. यामुळे वर्षभरात सदर मैल कामगारांच्या वेतनावर झालेला एकूण खर्च रक्कम रुपये 1,25,29,258/- तात्पुरता अमान्य ठेवण्यात आला आहे.

**4.177 मौजे गुणवरे अंतर्गत पाचबिघा रस्ता खडीकरण करणे.**

**पंचायत समिती फलटण, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 23) -** पंचायत समिती फलटण, जिल्हा परिषद सातारा यांनी 2515 इतर ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत मौजे गुणवरे अंतर्गत पाचबिघा रस्ता खडीकरणासाठी रक्कम रुपये 3,83,095/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मोजमाप पुस्तक क्रमांक 4439 पान क्रमांक 66 वर बाब क्रमांक 2 Labour Charges for removing grass या बाबीचे 1152 चौरस मीटर काम केले असून त्याकरीता रुपये 13,363/- एवढा खर्च केला आहे. सदर काम बांधकाम विभागाच्या 9 मैलकुलींकडून करणे आवश्यक होते. त्यामुळे सदर खर्च मान्य करता येत नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 166(4) मोजमापे विस्तृतपणे नोंदणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

3) सदर रस्ता गावाअंतर्गत असून ग्रामपंचायत नमुना नंबर 26 रस्ता नोंदवहीचा उतारा जोडलेला नसल्याने केलेल्या कामाची परिमाणाची पडताळणी करता आली नाही.

4) अंदाजपत्रकात तरतूद नसतांना बाब क्रमांक 6, 7, 9 नुसार 259.08 घनमीटर कठीण मुरुम पसरुन दबाई केली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 168 नुसार सुधारीत मान्यता घेणे आवश्यक असूनही तसे न करता अंतिम देयक आदा केले आहे.

5) महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग परिपत्रक दिनांक 11/02/2010 अनुसार गौण खनिज स्वामीत्व धन कमी कपात रुपये 141/- वसुली करुन शासनास भरणे आवश्यक आहे.

6) सार्वजनिक बांधकाम नियमावली 1984 अनुसार विहीत निकषापेक्षा 11.30 घनमीटर जादा कठीण मुरुम वापरल्याने रुपये 3,985/- जादा खर्च झालेला आहे. तो लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

**4.178 मौजे औंध येथे ग्रामसचिवालय बांधणे.**

**पंचायत समिती खटाव, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 35) -** पंचायत समिती खटाव (वडूज) यांनी नागरी सुविधा योजनेअंतर्गत सदर कामासाठी रक्कम रुपये 1,12,50,000/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निधी वितरण आदेश क्रमांक ग्रापं-4/सीआर/वशि/665/2013, दिनांक 30/03/2013 मधील अ.क्र. 4 नुसार सदर काम प्राधान्याने ग्रामपंचायतीने करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत काम करण्यात तयार नसल्यास तसे लेखी घेऊन गटविकास अधिकारी व उपअभियंता यांनी काम वाटप व निविदा प्रक्रियेबाबत विहीत कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करणे बंधनकारक असतांना नियमबाहयपणे ग्रामपंचायतीने कामाचे आदेश दिलेले आहेत.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/2010/275/प्रमा172/पंस7, दिनांक 19/10/2011 अनुसार सदर कामासाठी ई निविदा कार्यपध्दती अवलंबणे बंधनकारक आहे. तथापि निविदा नस्ती उपलबध नसल्याने शासनाचे निर्देशानुसार ई निविदा पध्दती व योग्य मक्तेदार व दर असल्याची पडताळणी करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 152 नुसार कंत्राटदाराने मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे काम करणे बंधनकारक आहे. एखाद्या बाबीवर 25 टक्के किंवा रुपये 5,000/- पेक्षा जास्त काम झाल्यास निविदेतील अट क्रमांक 38 (2) नुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडून मंजूरी घेणे आवश्यक आहे. तशी मंजूरी न घेता 24 बाबींची रक्कम रुपये 3328195/- मक्तेदारास आदा केली आहे.

4) प्रमाणक क्रमांक 118, दिनांक 30/01/2014 रक्कम रुपये 33,15,313/- या रकमेचे स्टील जमा केल्याबाबत रक्कम प्रदान केली आहे. काम सुरु नसतांना साहित्य जमा केल्याबाबत अदायगी अग्रीम स्वरुपात दिल्याने नियमबाहयता झाली आहे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-2009/ प्र.क्र.514/वित्त-1, दिनांक 20/11/2009 अनुसार 10 लक्षपर्यंतच्या कामावर रक्कम रुपये 100/- व त्यापुढील 1 लाखावर रुपये 100/- प्रमाणे स्टँपपेपरवर करारनामा केला नाही.

6) सदर कामासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला कामाचा आदेश पहावयास मिळाला नाही. त्यामुळे मुदतीत काम सुरु व पुर्ण केल्याची पडताळणी करता आली नाही.

7) सदर कामाचे चाचणी अहवालासाठी रक्कम रुपये 3,615/- आदा केले आहेत. तथापि चाचणी अहवाल पहावयास मिळाले नाहीत. तसेच अंदाजपत्रक रुपये 87,600/- च्या चाचण्यांची तरतूद असतांना तशा चाचण्या घेतल्या नसल्याने दर्जाबाबत पडताळणी करता आली नाही.

8) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय व्हीपीएम1099/ प्र.क्र.54/08,दिनांक 20/05/1999 अनुसार कामाचा माहितीदर्शक फलक बसविणेबाबत गटविकास अधिकारी व उपअभियंता यांचे संयुक्त स्वाक्षरीचे प्रमाणपत्र जोडण्यात आलेले नाही.

9) कामाची नोंद ग्रामपंचायत नमुना नंबर 25, 26 वर घेणे आवश्यक आहे.

**4.179 आचली येथील तिर्थक्षेत्र सुभोभिकरण व दुरुस्ती करणे, तालुका महाबळेश्वर.**

**पंचायत समिती महाबळेश्वर, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती महाबळेश्वर यांनी 13 व्या वित्त आयोग निधीतून मौजे आचली येथील तिर्थक्षेत्र सुशोभिकरण व दुरुस्तीसाठी रक्कम रुपये 4,94,561/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 1093/ प्र.क्र.1516/भाग2/33,दिनांक 27/06/2000 अनुसार एकाच कामाचे तुकडे करता येत नाहीत. असे असतांना आचली तिर्थक्षेत्र सुशोभिकरण व आचली येथे सभागृह देखभाल व दुरुस्ती ही कामे एकाच ठिकाणी असूनही दोन वेगळया प्रक्रिया राबविल्या आहेत. तसेच कामाचा आदेश दिनांक 04/03/2014 पूर्वी म्हणजेच काम दिनांक 24/12/2013 रोजी चालू झाले आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम क्रमांक 152 (2) (अ) अनुसार बांधकामात बाबनिहाय 10 टक्के वाढ झाल्याने सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 120 अनुसार एखाद्या बाबीवरील बचत दुसऱ्या बाबींवर नियमबाहयपणे वापरली आहे.

4) आचली तिर्थक्षेत्र सुशोभिकरण व आचली येथील सामाजिक सभागृह देखभाल, दुरुस्तीकडे हया दोन्ही कामांना प्रशासकीय मान्यता दिनांक 08/07/2013 ठराव क्रमांक 770 ने दिली आहे. सदर कामे एकाच ठिकाणी असूनही कामाचे तुकडे पाडून काम केलेले आहे.

**4.180 मौजे भिलार येथे मागासवर्गीय वस्तीत रस्ता तयार करणे, सुधारणा करणे. (VR57) चेनेज 0/00 ते 1/300**

**पंचायत समिती महाबळेश्वर, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 28) -** पंचायत समिती महाबळेश्वर यांनी मौजे भिलार येथे मागासवर्गीय वस्तीत रस्ता सुधारणा करण्यासाठी रक्कम रुपये 3,19,327/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बाब क्रमांक 3 पहाता पाईप बसविण्याकरीता कोणत्याही प्रकारची खुदाई केलेली नाही. तरीही PCC चे काम केल्याचे दर्शविले आहे. सदर बाब तांत्रिक दृष्टया योग्य नसल्याने रुपये 19,794/- मान्य करता येत नाही.

2) बाब क्रमांक 1 मध्ये मोजमापाचे अंकगणितीय चुक झाली आहे. त्यामुळे 0.228 m3 खुदाईचे रक्कम रुपये 142.20 प्रमाणे रुपये 32/- मान्य करता येत नाहीत.

3) मोजमाप पुस्तक व कामाचे छायाचित्र पहाता Cement Contrete Pipe हा रस्ता क्रॉसिंगसाठी न वापरता पाण्याच्या प्रवाहासाठी बसविलेली आहे.

4) सदर रस्त्याचे स्टेटमेंट बी उपलब्ध न झाल्याने ग्रामीण मार्ग 57 ची रुंदी, त्यावरील क्रॉसिंग ब्रीज व केलेल्या कामाच्या साईजची पडताळणी करता आली नाही.

5) महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग, अधिसुचना दिनांक 11/02/2010 नुसार रुपये 360/- रॉयल्टी वसुली करणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार चाचणीसाठी रुपये 1,000/- आदा केले असून चाचणी अहवाल उपलब्ध नाहीत यास्तव रक्कम वसुली करणे आवश्यक आहे.

**4.181 सुरूल तालुका वाळवा येथे समाजमंदीर सुधारणा करणे.**

**पंचायत समिती वाळवा, जिल्हा सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** सुरूळ तालुका वाळवा येथे समाजमंदीर सुधारणा करणे कामासाठी रक्कम रुपये 1,24,874/- इतका खर्च केला आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामातून कपात केलेल्या रक्कमांची चलने पहावयास मिळाली नाहीत. (उदा. रॉयल्टी, आयकर, विमा, व्हॅट, लेबरसेस इत्यादी.

2) प्रस्तावित कामापेक्षा जास्त काम केलेने रक्कम रुपये 21,664/- जादा अदाई झाली आहे.

3) लेखासंहितेमधील 153 (1) व निविदा अट क्रमांक 38 नुसार सक्षम तांत्रिक अधिकाऱ्यांची मंजूरी न घेता वाढीव परिमाणावर केलेल्या खर्चाबाबत व लेखासंहिता मधील नियम 114,118, 120 व 152 (2) प्रमाणे सक्षम अधिकाऱ्यांची मंजूरी घेतलेली नाही व लेखासंहिता 1968 मधील नियम 120 (2) नुसार कार्यवाही केलेली नाही.

4) सदर कामाचा चाचणी अहवाल काम पूर्ण झाल्यानंतरचा दाखला नाही.

**4.182 ओझर्डे, तालुका - वाळवा येथे स्मशानभूमी सुधारणा करणे.**

**पंचायत समिती वाळवा, जिल्हा सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** ओझर्डे, तालुका - वाळवा येथे स्मशानभूमी सुधारणा करणे कामासाठी रक्कम रुपये 1,74,784/-इतका खर्च केला आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामातून कपात केलेल्या रकमांची चलने पहावयास मिळाली नाहीत. (उदा. रॉयल्टी, आयकर,विमा, व्हॅट, लेबरसेस इ.

2) प्रस्तावित कामापेक्षा जास्त काम केलेने रक्कम रुपये 24,956.57 जादा आदाई झाली आहे.

3) लेखासंहितेमधील 153 (1) व निविदा अट क्रमांक 38 नुसार सक्षम तांत्रिक अधिकाऱ्यांची मंजूरी न घेता वाढीव परिमाणावर केलेल्या खर्चाबाबत व लेखासंहिता मधील नियम 114,118,120 व 152 (2) प्रमाणे सक्षम अधिकाऱ्यांची मंजूरी घेतलेली नाही व लेखासंहिता 1968 मधील नियम 120 (2) नुसार कार्यवाही केलेली नाही.

4) कामाचा चाचणी अहवाल काम पूर्ण झाल्यानंतरचा आहे.

**4.183 उचगाव तालुका करवीर येथे तरुण मंडळाकरीता सांस्कृतीक हॉल व व्यायामशाळा बांधणे.**

**पंचायत समिती करवीर, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 31) -** ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत उचगाव तालुका करवीर येथे तरुण मंडळाकरीता सांस्कृतीक हॉल व व्यायामशाळा बांधणेकरिता रक्कम रुपये 5,49,802/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम क्रमांक 120 अन्वये एखाद्या बाबीवर झालेली बचत इतर बाबींसाठी वापरु नये असे असताना सुधारीत अंदाजपत्रक न करता रक्कम रुपये 39,307/- इतरत्र वापरण्याचे प्रयोजन स्पष्ट करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 153 (1) व बी 1 टेंडर फॉर्म मधील कलम 38 (1) (2) तरतुदी नुसार कामाच्या परिमाणाच्या 25 टक्के किंवा रुपये 5,000/- पर्यंतचे जादा काम करण्याची तरतूद असताना रक्कम रुपये 1,33,545/- इतक्या रकमेचे जादा काम करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक संकिर्ण/2004/ प्र.क्र.85/रस्ते 2,दिनांक 11/06/2004 नुसार तांत्रिक अधिकाऱ्याची मान्यता प्राप्त झाल्यानंतरच वाढीव परिमाणाचे प्रदान करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न केल्याने वाढीव परिमाणाचा खर्च रुपये 1,33,545/- मान्य करता येत नाही.

3) सदर हॉल बांधकामामध्ये बाब क्रमांक 1 प्रमाणे खुदाईचे काम करण्यात येवून रक्कम रुपये 2,738/- आदा करण्यात आले आहे. सदर साहित्य फिलिंग करिता न वापरता बाहेरुन साहित्य मागवून केलेल्या कामाकरिता केलेला खर्च रक्कम रुपये 8,802/- अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

4) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक पीडब्लू डिआर/ डीएसआर/1091/सीआर/6577/प्लॅनिंग 3,दिनांक 08/07/2003 अन्वये कामासाठी जादा टक्केवारी देय नसताना दरपृथ:करणात पूर्ण बाबीवर 10 टक्के डोंगराळ भागासाठीचा वाढीव दर आकारल्याने जादा आदा रक्कम रुपये 11,992/- अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

5) सदर कामाचे मोजमाप पुस्तक उपलब्ध करणे आवश्यक आहे.

**4.184 वरणगे तालुका करवरी येथे सांस्कृतीक हॉल बांधकाम करणे.**

**पंचायत समिती करवीर, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 33) -** ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत वरणगे ता. करवीर येथे सांस्कृतीक हॉल बांधणेकरिता रक्कम रुपये 9,99,765/-/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम क्रमांक 120 अन्वये एखाद्या बाबीवर झालेली बचत इतर बाबींसाठी वापरु नये असे असताना व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 120, 153 (1) व (2), 148 व 156 अन्वये अंदाजपत्रक तंतोतंत करुन मंजूर बाबीप्रमाणे काम करणे आवश्यक असताना सुधारीत अंदाजपत्रक न करता रक्कम रुपये 90,942/- इतरत्र वापरण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 153 (1) व बी 1 टेंडर फॉर्म मधील कलम 38 (1) (2) च्या तरतुदीनुसार कामाच्या परिमाणाच्या 25 टक्के किंवा रुपये 5,000/- पर्यंतचे जादा काम करण्याची तरतुद असताना रक्कम रुपये 1,08,987/- इतक्या रमेचे जादा काम करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक संकिर्ण/2004/ प्र.क्र85/रस्ते 2,दिनांक 11/06/2004 नुसार तांत्रिक अधिकाऱ्यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतरच वाढीव परिमाणाचे प्रदान करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न केल्याने वाढीव परिमाणाचा खर्च रक्कम रुपये 1,08,987/- मान्य करता येत नाही.

3) सदर सांस्कृतिक हॉल बांधकामामध्ये खुदाईतून न्घिालेले 60.92 Cum परिमाणाचे साहित्य Filling साठी वापरणे आवश्यक असताना मक्तेदाराकडून 50.49 Cum चे साहित्य घेवून वापरल्याने रक्कम रुपये 22,625/- अंतिम मान्य करता येत आहे.

4) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक पीडब्लूडीआर/डीएसआर/ 1091 सीआर/6577/प्लॅनिंग-3,दिनांक 08/07/2003 अन्वये कामासाठी जादा टक्केवारी देय नसताना दर पृथ:करणात पूर्ण बाबींवर 10 टक्के डोंगराळ भागासाठीचा वाढीव दर आकारल्याने जादा आदा रक्कम रुपये 24,485/- अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

**4.185 आळते भांडारगृह इमारत विश्रामगृह म्हणून नियमबाह्य वापर व साहित्य खरेदीबाबत.**

**पंचायत समिती हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती हातकणंगले, बांधकाम विभागाने जिल्हा परिषद स्वनिधी मधून आळते येथील भांडारगृहासाठी डायनिंग साहित्य, फर्निचर, ब्लाकेंट, स्वयंपाक भांडी इत्यादी साहित्याच्या खरेदी करिता रक्कम रुपये 1,86,400/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आळते येथील इमारत मालमत्ता नोंदवही नमुना 39 पृष्ठ क्रमांक 55 वर भांडारगृह म्हणून नोंद असताना विश्रामधाम करिता साहित्य खरेदी केले आहे. सदर भांडारगृहाचा वापर विश्रामगृह म्हणूर करणेस शासनाची मंजूरी आवश्यक आहे. त्यामुळे सदर साहित्य खरेदीवर केलेला खर्च लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखंस/1088/ 2512/उद्योग 6,दिनांक 02/01/1992 नुसार रक्कम रुपये 50,000/- वरील खरेदी जाहिर प्रसिध्दी द्वारे करणे आवश्यक असताना नियमबाह्यपणे तुकडे पाडून दरपत्रके मागवून साहित्य खरेदी केले आहे.

3) उपरोक्त शासन निर्णय परिशिष्ट 4 व 5 प्रमाणे शासन अंगीकृत संस्थेकडून साहित्य खरेदी बंधनकारक असताना नियमबाह्य खरेदी करण्यात आली आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2010/ 275/प्र.क्र.172/परा-7,दिनांक 19/10/2011 व शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2013/प्र.क्र49/परा-7,दिनांक 07/02/2013 प्रमाणे रुपये 1 लाख वरील खरेदीस ई-निविदा पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही नाही.

**4.186 मौजे कबनूर तालुका हातकणंगले हाफ राऊंड गटर्स व काँक्रीटीकरण करणे.**

**पंचायत समिती हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती हातकणंगले यांनी 13 वा वित्त आयोग निधीमधून मौजे कबनूर तालुका हातकणंगले येथे हाफ राऊंड गटर्स व काँक्रीटीकरणे करणे करिता रक्कम रुपये 2,00,506/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामातील बाब क्रमांक 1 गटर खुदाई ही रस्त्याकडील गटरचे असल्याने डीएसआर (DSR) मधील Rd.Secton मधील दर घेणे आवश्यक असताना Bd.Section मधील दर घेतल्याने रक्कम रुपये 565/- अतिप्रदान झाल्याने संबंधिताकडून वसुल होणे आवश्यक आहे.

2) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम क्रमांक 153 (1) व B1 निविदा खंड 38 (1) नुसार एखाद्या बाबीवर परिमाणापेक्षा 25 टक्के किंवा रक्कम रुपये 5,000/- मुल्यांपेक्षा जादा काम न करण्याची अट नमूद असताना बाब क्रमांक 3 C.C.M-15 व बाब क्रमांक 7 सोलींग 80 mm ट्रॅप मेटल या बाबीवर रक्कम रुपये 23,929/- वाढीव खर्च झाला आहे. तो अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

3) बाब क्रमांक 300mm dia. हाफ राऊंड गटर्स NP-2 क्लास 162.00 रनिंग मीटरचा वापर केला आहे. परंतु सदर पाईप ISI मार्कचे असल्याची पडताळणी करता आली नाही.

**4.187 13 वा वित्त आयोग निधीमधून मंदिर दुरुस्ती व सुशोभिकरणा करिता केलेल्या खर्चाबाबत.**

**पंचायत समिती हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती हातकणंगले यांनी 13 वा वित्त आयोग निधीमधून मंदिर दुरुस्ती व सुशोभिकरणाकरिता रक्कम रुपये 5,84,000/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तेविआ-2010/ प्र.क्र.22/वित्त 4,दिनांक 30/08/2010 अन्वये 'क' वर्ग दर्जा प्राप्त झालेल्या मंदिरासाठीच 13 वा वित्त आयोग निधीतून खर्च करता येत असलेने व सदर मंदिरांना 'क' वर्ग दर्जा प्राप्त नसल्याने सदरचा खर्च अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

**4.188 औरवाड, तालुका शिरोळ येथील दलित समाजमंदिर सुधारणा करणे.**

**पंचायत समिती शिरोळ, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती, शिरोळ बांधकाम विभागाने 13 वा वित्त आयोग निधी मधून औरवाड तालुका शिरोळ येथील दलित समाज मंदिर सुधारणा करणेकरिता रक्कम रुपये 1,49,382/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2000/ प्र.क्र.4438, दिनांक 22/12/2000 नुसार प्रत्येक कामाकरीता स्वतंत्र मोजमाप पुस्तिका ठेवणे आवश्यक असताना एकाच मोजमाप पुस्तिकेत वेगवेगळ्या कामाच्या नोंदी घेतलेल्या आहेत.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 नुसार नमुना नंबर 69 मध्ये पूर्ण बांधकामाची नोंदवही ठेवणे आवश्यक असताना तशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक 1069/प्र.क्र56/35 दिनांक 30/06/2000 अन्वये बांधकामावर वापरलेल्या साहित्य खरेदीच्या पावत्या कंत्राटदाराकडून प्राप्त करुन घेवून संचिकेत जोडणे आवश्यक असतना त्याप्रमाणे कार्यवाही नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 147 अन्वये मंजूर करण्यात आलेला प्रत्येक करार नमुना नंबर 48 मध्ये नोंदविणे आवश्यक असताना नमुना नंबर 48 नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक पंरास/1088/सीआर 3041/26, दिनांक 14/09/1988 अन्वये जागेची मालकी शासनाची/जिल्हा परिषदेची असल्याशिवाय कोणतेही बांधकाम करु नये असे असताना जागेच्या मालकीची अभिलेखे नस्तीसोबत नाहीत.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 97 नुसार नमुना नंबर 40 मध्ये रस्त्याची नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 व नमुना नंबर 69 मध्ये पूर्ण झालेल्या बांधकामाची नोंदवही ठेवणे आवश्यक असताना तशी कार्यवाही नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 67 अन्वये नमुना नंबर 23 मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166 (7) (2) व 180 अन्वये तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग नियमपुस्तिका परिच्छेद क्रमांक 24 (12) (13) नुसार मोजमाप पुस्तिकेत परिमाणाचा हिशोब व गोषवारा काढून ज्या प्रमाणकाद्वारे आदा केली तो प्रमाणक क्रमांक नमुद करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही नाही.

10) विक्रीकर विभाग अधिसूचना दिनांक 04/04/2012 नुसार अनोंदणीकृत कंत्राटदाराकडून 5 टक्के मुल्यवर्धित कर कपात करणे आवश्यक असताना कमी कपात केलेला मुल्यवर्धित कर रक्कम रुपये 8,285/- वसूल करुन भरणा करणे आवश्यक आहे.

11) उपकराची रक्कम रुपये 1,657/- व कामगार विमा रुपये 1,657/- वसूल करुन शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

**4.189 विकास कामाबाबत.**

**पंचायत समिती शिरोळ, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** पंचायत समिती शिरोळ बांधकाम विभागाने 13 वा वित्त आयोग निधीमधून रक्कम रुपये 11,98,136/- इतक्या रकमेची विकास कामे केली आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/ 2000 / प्र.क्र.4438,दिनांक 22/12/2000 नुसार प्रत्येक कामाकरीता स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक असताना एकाच मोजमाप पुस्तिकेत वेगवेगळ्या कामाच्या नोंदी घेतलेल्या आहेत.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 नुसार नमुना नंबर 69 मध्ये पूर्ण बांधकामाची नोंदवही ठेवणे आवश्यक असताना तशी कार्यवाही नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय 1069/प्र.क्र.56/35,दिनांक 30/06/2000 अन्वये बांधकामावर वापरलेल्या साहित्य खरेदीच्या पावत्या कंत्राटदाराकडून प्राप्त करुन संचिकेत जोडणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 147 अन्वये मंजूर करण्यात आलेला प्रत्येक करार नमुना नंबर 48 मध्ये नोंदविणे आवश्यक असताना नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1088/सीआर/ 3041/26,दिनांक 14/09/1988 अन्वये जागेची मालकी शासनाची / जिल्हा परिषदेची असल्याशिवाय कोणतेही बांधकाम करु नये असे असताना जागेच्या मालकीचे अभिलेखे नस्तीसोबत नाहीत.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 97 नुसार नमुना नंबर 40 मध्ये रस्त्याची नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 प्रमाणे नमुना नंबर 69 मध्ये पूर्ण झालेल्या बांधकामाची नोंदवही ठेवणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 67 अन्वये नमुना नंबर 23 मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166 (7) (2) व 180 अन्वये तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तिका परिशिष्ट 24 (12)(13) प्रमाणे मोजमाप पुस्तिकेत परिमाणाचा हिशोब व गोषवारा काढून त्यावर प्रमाणक क्रमांक नमुद करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही नाही.

10) कामाचा माहिती फलक न लावल्याने सदर बाबीवरील खर्च रक्कम रुपये 8,309/- वसूल होणे आवश्यक.

11) विक्रिकर विभाग अधिसूचना दिनांक 04/04/2012 नुसार अनोंदणीकृत कंत्राटदाराकडून 5 टक्के मुल्यवर्धित कर कपात करणे आवश्यक असता कमी कपात रक्कम रुपये 24,000/- वसूल करणे आवश्यक आहे.

**4.190 मौजे पेरीड तालुका शाहूवाडी येथे रस्ता खडीकरण करणे.**

**पंचायत समिती शाहूवाडी, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती शाहूवाडी यांनी 13 वा वित्त आयोग निधीमधून मौजे पेरीड तालुका शाहूवाडी येथे रस्ता खडीकरण करणे करिता रक्कम रुपये 2,50,000/- इतका खर्च नोंदविला आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 168 नुसार कार्यकारी अभियंता यांनी रक्कम रुपये 50,000/- वरील रकमेच्या कामाची 50 टक्के तपासणी करणे अनिवार्य असताना त्याप्रमाणे कार्यवाही नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नुसार नमुना नंबर 69 मध्ये पूर्ण बांधकामाची नोंदवही ठेवणे, नमुना नंबर 23 मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवणे तसेच नमुना नंबर 48 मध्ये मंजूर करार नोंदविणे आवश्यक असताना तशी नोंदवही ठेवलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1069/प्र.क्र.56/35 दिनांक 30/06/2000 अन्वये बांधकामावर वापरले त्या साहित्य खरेदीच्या पावत्या कंत्राटदाराकडून प्राप्त करुन संचिकेत जोडणे आवश्यक असताना तशी कार्यवाही नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 147 नुसार नमुना नंबर 48 मध्ये मंजूर करार नोंदविणे आवश्यक असताना तशी नोंदवही ठेवलेली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 150 अन्वये कामास तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी तपशीलवार नकाशे व अंदाजपत्रके तयार करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 120 अन्वये एखाद्या बाबीवर झालेली बचत इतर बाबीसाठी वापरु नये असे असताना बचत झालेली रक्कम रुपये 23,357/- अन्य बाबी करिता वापरलेने मान्य करता येत नाही.

7) अंदाजपत्रकात 266 मीटर लांब व 3.30 मीटर रुंदीचे रस्त्याचे काम करणेबाबत तरतुद असताना प्रत्यक्ष काम 2.50 मीटर लांब व 4.00 मीटर रुंदीचे करण्यात आल्याने 0.70 मीटर रस्ता रुंदीचा अतिरिक्त खर्च रक्कम रुपये 30,687/- मान्य करता येत नाही.

8) सुरक्षा ठेव 5 टक्के दराने रक्कम रुपये 12,500/- कपात करणे आवश्यक असताना रक्कम रुपये 7,500/- वसूल केल्याने रक्कम रुपये 5,000/- कमी वसूल रक्कम वसूलात आणणे आवश्यक आहे.

**4.191 नांदगाव पैकी खराडेवाडी येथे रस्ता कॉक्रींटीकरण करणे.**

**पंचायत समिती शाहूवाडी, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती शाहूवाडी यांनी 13 वा वित्त आयोग निधीमधून नांदगाव पैकी खराडेवाडी येथे रस्ता कॉंक्रीटीकरण करणे करिता रक्कम रुपये 1,99,265/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नस्तीसोबत कार्यारंभ आदेश जोडलेला नाही. त्यामुळे काम सुरु दिनांक व काम विहित मुदतीत पूर्ण झाल्याचे स्पष्ट होत नाही.

2) कंत्राटदाराचे नोंदणी प्रमाणपत्र व कामाचे प्रशासकीय मान्यता आदेश नस्तीसोबत जोडलेले नाहीत.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त न करताच देयकाचे अंतिम प्रदान केलेले आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नुसार नमुना नंबर 69 मध्ये पूर्ण बांधकामाची नोंदवही ठेवणे, नमुना नंबर 23 मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवणे तसेच नमुना नंबर 48 मध्ये मंजूर करार नोंदविणे आवश्यक असताना तशी नोंदवही ठेवलेली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 148 प्रमाणे कंत्राटदारास कामाची मुदत वाढवून हवी असल्यास मुदत संपण्यापूर्वी लेखी अर्ज करणे आवश्यक अन्यथा नियम 149 अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून नुकसान भरपाईचा दर निश्चित करुन दंड वसुल करणे आवश्यक असताना दंड वसुल केलेला नाही.

6) विक्रीकर विभाग, अधिसूचना दिनांक 04/04/2012 नुसार अनोंदणीकृत कंत्राटदाराकडून 5 टक्के मुल्यवर्धित कर कपात करणे आवश्यक त्यानुसार कमी कपात मुल्यवर्धित कर रक्कम रुपये 5,978/- वसूल करणे आवश्यक आहे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 150 अन्वये कामाचे तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी तपशिलवार नकाशे व अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असताना त्या प्रमाणे कार्यवाही नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 152(1) प्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी प्रारंभिक नकाशे, जागा बदलाची माहिती, प्रस्तावाची कारणे अर्जासोबत असणे आवश्यक असताना नस्तीसोबत सदर बाबींचा समावेश नाही.

9) मुख्य अभियंता महाराष्ट्र राज्य, पुणे परिपत्रक मअ/स्थास/पुवाअ/ 2/1042/सन2006 दिनांक 13/04/2006 अन्वये 10 कि.मी. च्या वरील लीड चार्जेस अनुज्ञेय करताना अधिक्षक अभियंता यांचेमार्फत अंतर व नकाशा व डिटेल लीड स्टेटमेंट प्रमाणित करणे आवश्यक असताना वाहनावळ खर्च रक्कम रुपये 24,353/- कंत्राटदारास आदा केली आहे.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 120 अन्वये एखाद्या बाबीवर झालेली बचत इतर बाबींसाठी वापरु नये असे असताना इतर बाबींवर वापरण्यात आलेली बचतीची रक्कम रुपये 9,300/- मान्य करता येत नाही.

**4.192 पुसार्ले येथे रस्ता कॉक्रींटीकरण करणे.**

**पंचायत समिती शाहूवाडी, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती शाहूवाडी यांनी 13 वा वित्त आयोग निधीमधून पुसार्ले येथे रस्ता काँक्रीटीकरण करणे करिता रक्कम रुपये 1,99,994/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 120 अन्वये एका बाबीवर झालेली बचत इतर बाबींवर वापरु नये असे असताना बचत रक्कम रुपये 16,013/- नियमबाह्यपणे इतर बाबींवर वापरली आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 148 ब (2) प्रमाणे दंडाची रक्कम निश्चित करुन वसुल करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 168 नुसार कार्यकारी अभियंता यांनी रक्कम रुपये 50,000/- वरील रकमेच्या कामाची 5 टक्के तपासणी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नुसार नमुना नंबर 69 मध्ये पूर्ण बांधकामाची नोंदवही ठेवणे, नमुना नंबर 23 मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवणे तसेच नमुना नंबर 48 मध्ये मंजूर करार नोंदविणे आवश्यक असताना तशी नोंदवही ठेवलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक 1069/प्र.क्र.56/35 दिनांक 30/06/2000 अन्वये बांधकामावर वापरलेल्या साहित्य खरेदीच्या पावत्या संचिकेत जोडणे आवश्यक असताना तशी कार्यवाही नाही.

6) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय दिनांक 24/04/2012 मधील परिच्छेद क्रमांक 11 नुसार रस्ते विकास आराखड्यामध्ये काम सामविष्ठ असलेबाबत अभिलेखे दर्शविलेले नाहीत.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 152 (1) प्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी प्रारंभिक नकाशे, जागा बदलाची माहिती, प्रस्तावाची कारणे अर्जासोबत आणणे आवश्यक असताना तशी कार्यवाही नाही.

8) मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य, पुणे परिपत्रक मअ/स्थास्त/पुवाअ/2/1042/सन 2006 दिनांक 13/04/2006 अन्वये 10 कि.मी. वरील अंतर व नकाशा व डिटेल लीड स्टेटमेंट प्रमाणित व मंजूर करणे बंधनकारक असतान वाहनावळ खर्च रुपये 24,971/- कंत्राटदारास आदा करण्यात आले आहेत.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166 (7) (2) व 180 व सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 24 (12) (13) मोजमाप पुस्तिकेत परिमाणाचा हिशोब व गोषवारा काढून प्रमाणक क्रमांक नमूद करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही नाही.

**4.193 करंजफेण पैकी वडाचीवाडी येथील रस्ता मजबुतीकरण करणे.**

**पंचायत समिती शाहूवाडी, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती शाहूवाडी यांनी 13 वा वित्त आयोग निधीमधून करंजफेण पैकी वडाचीवाडी येथील रस्ता मजबुतीकरण करणे करिता रक्कम रुपये 2,49,397/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 168 नुसार कार्यकारी अभियंता यांनी रक्कम रुपये 50,000/- वरील रकमेच्या कामाची 5 टक्के तपासणी करणे अनिवार्य असताना त्याप्रमाणे कार्यवाही नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2000/प्र.क्र. 4438,दिनांक 22/12/2000 नुसार प्रत्येक कामाकरीता स्वतंत्र मोजमाप पुस्तिका ठेवणे आवश्यक असताना एकाच मोजमाप पुस्तिकेत वेगवेगळ्या कामाच्या नोंदी घेतलेल्या आहेत.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नुसार नमुना नंबर 69 मध्ये पूर्ण बांधकामाची नोंदवही ठेवणे, नमुना नंबर 23 मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवणे तसेच नमुना नंबर 48 मध्ये मंजूर करार नोंदविणे आवश्यक असताना तशी नोंदवही ठेवलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय दिनांक 24/04/2012 मधील परिच्छेद क्रमांक 11 नुसार रस्ते विकास आराखड्यामधील समाविष्ठ काम असलेबाबत अभिलेखे दर्शविले नाहीत.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 150 अन्वये कामास तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी तपशिलवार नकाशे व अंदाजपत्रके तयार करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 152 (1) नुसार प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी प्रारंभिक नकाशे, जागा बदलाची माहिती, प्रस्तावाची कारणे त्या अर्जासोबत आणणे आवश्यक असताना सदर बाबींचा समावेश नसताना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

7) मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य, पुणे परिपत्रक मअ/स्थास्त/पुवाअ/2/1042/ सन 2006,दिनांक 13/04/2006 अन्वये बांधकाम वाहनावळ खर्च 10 कि.मी. च्या वरील लीड चार्जेस अनुज्ञेय करताना अधीक्षक अभियंता यांचेमार्फत अंतर, नकाशा व डिटेल लीड स्टेटमेंट प्रमाणित करुन मंजूर नस्तीस ठेवणे आवश्यक असताना वाहनावळ खर्च रक्कम रुपये 32,459/- कंत्राटदारास आदा केलेला आहे.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 120 अन्वये एखाद्या बाबीवर झालेली बचत इतर बाबींवर वापरु नये असे असताना इतर बाबींवर केलेला खर्च रक्कम रुपये 32,459/- मान्य करता येत नाही.

**4.194 रेठरे येथे अंतर्गत रस्ता सिमेंटक्राँक्रीट करणे.**

**पंचायत समिती शाहूवाडी, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती, शाहूवाडी यांनी 13 वा वित्त आयोग निधीमधून रेठरे येथे अंतर्गत रस्ता सिमेंट क्राँक्रीट करणे करिता रक्कम रुपये 2,25,000/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नुसार नमुना नंबर 69 मध्ये पूर्ण बांधकामाची नोंदवही ठेवणे, नमुना नंबर 23 मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवणे तसेच नमुना नंबर 48 मध्ये मंजूर करार नोंदविणे आवश्यक असताना तशी नोंदवही ठेवलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 168 नुसार कार्यकारी अभियंता यांनी रक्कम रुपये 50,000/- वरील रकमेच्या कामाची 5 टक्के तपासणी करणे अनिवार्य असताना त्याप्रमाणे कार्यवाही नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक 1069/प्र.क्र.56/35 दिनांक 30/06/2000 अन्वये बांधकामावर वापरलेल्या साहित्य खरेदीच्या पावत्या कंत्राटदाराकडून प्राप्त करुन संचिकेत जोडणे आवश्यक असताना तशी कार्यवाही नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 148 अन्वये कामाची मुदत वाढवून पाहीजे असल्यास तसा मुदत संपण्यापूर्वी लेखी अर्ज करणे आवश्यक अन्यथा 149 प्रमाणे नुकसान भरपाईचा दर निश्चित करुन कंत्राटदाराकडून दंड वसुल करणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 154 (5) व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए/1089/ प्र.क्र.854/33 दिनांक 08/02/1990 नुसार मूळ कामाची निविदा स्विकारणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांची कामाचे तुकडे पाडण्यास मंजूरी घेणे अनिवार्य परंतु त्याप्रमाणे कार्यवाही नाही.

6) महाराष्ट्र राज्य विक्रिकर विभाग अधिसूचना दिनांक 04/04/2012 नुसार अनोंदणीकृत कंत्राटदाराकडून 5 टक्के मुल्यवर्धित कर कपात करणे आवश्यक असताना कमी कपात रक्कम रुपये 5,148/- वसूल करणे आवश्यक आहे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 150 अन्वये कामास तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी तपशिलवार नकाशे व अंदाजपत्रके तयार करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही नाही.

8) मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य, पुणे परिपत्रक मअ/स्थास्त/पुवाअ/2/1042/सन 2006 दिनांक 13/04/2006 अन्वये बांधकाम वाहनावळ खर्च 10 कि.मी. च्या वरील लीड चार्जेस अनुज्ञेय करताना अधीक्षक अभियंता यांचेमार्फत अंतर, नकाशा व डिटेल लीड स्टेटमेंट प्रमाणित करुन मंजूर नस्तीस ठेवणे आवश्यक असताना वाहनावळ खर्च रक्कम रुपये 26,218/- कंत्राटदारास आदा केलेला आहे.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 120 अन्वये एखाद्या बाबीवर झालेली बचत इतर बाबींवर वापरु नये असे असताना इतर बाबींवर केलेला खर्च रक्कम रुपये 13,288/- मान्य करता येत नाही.

10) कामाची माहिती असलेला फलक बसविण्यात आला नाही.

**4.195 गौडगांव येथे एसटी स्टॅण्ड येथे कॉक्रीट रस्ता करणे कामातील त्रुटीबाबत.**

**पंचायत समिती बार्शी, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** गौडगांव येथे एसटी स्टॅण्ड येथे कॉक्रीट रस्ता करणे याकामासाठी रक्कम रुपये 6,57,788/- इतका खर्च झालेला आहे.

1) कामाची मुदत दिनांक 31/08/2014 पर्यंत होती परंतु काम दिनांक 18/03/2015 रोजी पूर्ण झाले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता नियम 148 नुसार सक्षम प्राधिकार्याकडून मुदतवाढ करून घेणे बंधनकारक असताना काम 6 महिने व 18 दिवस विलंबाने पूर्ण झाले असून विलंबाबाबत दंडात्मक कार्यवाही केलेली नाही अथवा ठेकेदार ग्रामपंचायतीने मुळ मुदत संपण्यापूर्वी मुदतवाढीसाठी अर्ज केले नाहीत. विलंबाबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील दिनांक 21/11/2013 च्या आदेशानुसार कामांवरील खर्चाच्या 1 टक्के दंड वसुल करणे आवश्यक आहे. कामांवर एकूण रुपये 6,57,788/- झाला असून त्याचे 1 टक्के रक्कम रुपये 6,578/- दंड वसुल करुन अनुपालन करावे.

2) कामाचे अंदाजपत्रकात रस्ता 4 मीटर रुंदीने 157 मीटर लांबीचे करणे आवश्यक असतांना ते 4.35 मीटर रुंदीने केले आहे. त्यामुळे 0.35 मीटर रुदी जास्त झालेली आहे. 157 मीटर लांबीचे 0.35 रुंदीने 0.10 मी जाडीने 1:4:8 कॉक्रीटचे काम केल्याने 5.50 घनमीटर काम जास्त झाले आहे. जादा कामाचे दर रुपये 3,762/- प्रती घनमीटर प्रमाणे एकूण रुपये 20,762/- इतके जादा खर्च वसुली करण्यांत यावे.

3) वरीलप्रमाणे M 15 कॉक्रीटचे काम 0.35 मीटर रुदीने जास्त झाले आहे. 157 मीटर लांबीचे 0.35 रुंदीने 0.08 मी जाडीने M 15 कॉक्रीटचे काम केल्याने 4.40 घनमीटर काम जास्त झाले आहे. जादा कामाचे दर रुपये 4,634/- प्रती घनमीटर प्रमाणे एकूण रुपये 20,371/- इतके जादा खर्च वसुली करण्यांत यावे.

4) कामाचे ठिकाण नाम फलक लावणेची तरतुद आहे त्याप्रमाणे देयकांत रुपये 3,888/- नाम फलकाची रक्कम अदा करण्यात आले आहे परंतु देयकांसोबत नाम फलक लावलेबाबत फोटो जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे फलकाची रक्कम रुपये 3,888/- ची वसुली करण्यांत यावे.

**4.196 मौजे ममदापूर, नवबौध्द वस्तीत कॉक्रीट रस्ता करणे कामातील त्रुटीबाबत.**

**पंचायत समिती बार्शी, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** मौजे ममदापूर नवबौध्द वस्तीत कॉक्रीट रस्ता करणे याकामासाठी रक्कम रुपये 5,50,000/- इतका खर्च झालेला आहे.

1) सदर कामात 66 घमी 40 मीमी खडी वापरण्यात आले आहे. त्याच्या एक चतुर्थ्यांश प्रमाणात (16.5 घमी) मऊ मुरुम वापरणे आवश्यक असतांना ते 24 घमी वापरण्यात आले आहे.त्यामुळे 7.5 घमी मऊ मुरुमाचा जादा वापर झाले आहे. ज्यादा वापर मुरुमाचा दर रुपये 297.85 व पसरविणेचा दर रुपये 36.35 असे एकूण रुपये 334.20 प्रती घमी प्रमाणे 7.50 घमी एकूण रुपये 2,506/- इतके जादा प्रदान झाले आहे.

2) अंदाजपकाप्रमाणे सदरचा रस्ता 4 मी रुंदीने कॉक्रीटीकरणेचे असतांना ते जादा रुंदीने (4.2 ते 6.5 मी ) केले आहे. अंदाजपकाप्रमाणे 138.5 मी रस्ता 4 मी रुंदीने व 0.10 जाडीने कॉक्रीटीकरण (1:4:8) केले असते तर

55.14 घमी काम झाले असते. परंतु ते विविध रुंदीने केल्याने 64.17 घमी झाले आहे. जादा काम 8.77 (64.17-55.40) दर रुपये 3,685.70 प्रती घनमीटर प्रमाणे एकूण रुपये 32,324/- इतके जादा खर्च झाले आहे.

3) अंदाजपकाप्रमाणे सदरचा रस्ता 4 मी रुंदीने m 15 कॉक्रीटीकरणेचे असतांना ते जादा रुंदीने (4.2 ते 6.5 मी ) केले आहे. अंदाजपकाप्रमाणे 138.5 मी रस्ता 4 मी रुंदीने व 0.08 जाडीने कॉक्रीटीकरण केले असते तर 44.32 घमी काम झाले असते. परंतु ते विविध रुंदीने केल्याने 51.33 घमी झाले आहे. जादा काम 7.01 (51.33-44.32) दर रुपये 4,570.60 प्रती घनमीटर प्रमाणे एकूण रुपये 32,039/- इतके जादा खर्च झाले आहे.

4) सदर कामासाठी एकूण 508 गोणी सिमेंट वापरल्याचे सिमेंट वापर तक्त्याप्रमाणे दिसते. परंतु अंदाजपत्रकाप्रमाणे लागणारे सिमेंट किमी गोणी याबाबतचा तक्ता जोडलेला नाही.

**4.197 मौजे मलिकपेठ येथे कॉक्रीट रस्ता व गटार करणे कामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती मोहोळ, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती मोहोळ कडील सन 2014-2015 चे बांधकाम विभागाकडील मौजे मलिकपेठ येथे कॉक्रीट रस्ता व गटार करणे कामांवर रक्कम रुपये 14,81,579/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कार्यारंभ आदेशातील अट क्रमांक 7 प्रमाणे 1 लाखांवरील बांधकाम साहित्य खरेदी करिता ई निविदा प्रक्रिया राबविणे बंधनकारक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही.

2) कामासाठी एकूण 1460 गोणी सिमेंट वापरण्यात आले आहे. परंतु अंदाजपत्रकात किती गोणी सिमेंट लागणार आहे याबाबत सिमेंट आवश्यकता विवरणपत्र जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे कामांवर योग्य प्रमाणात सिमेंट वापरण्यात आलेची खात्री करता आले नाही.

3) प्रशासकीय आदेशातील अट क्रमांक 5 प्रमाणे कामाचे 3 स्थितीतील फोटो (काम सुरु होण्यापूर्वी, काम सुरु असतांना व काम पूर्ण झाल्यानंतर) देयकांसोबत जोडणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही कां केली नाही याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

4) अंदाजपत्रकातील बाब क्रमांक 11 प्रमाणे कामाचे नावाचे फलक कामाच्या ठिकाणी लावणे आवश्यक आहे. अशाप्रकारचा फलक लावलेबाबत फोटो नाही. परंतु या बाबीचे रुपये 3,888/- प्रदान करण्यात आले आहे. फोटो न लावण्याची कारणे नमुद करुन प्रदान रक्कम रुपये 3,888/- संबंधितांकडून वुसलात आणावे.

5) काम पूर्ण झाल्यानंतर काम पूर्ण नोंदवहीत नोंद घेण्यात आलेल्या नाहीत. तसेच काम पूर्ण झालेनंतर ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवहीस नोंदी घेतल्याचे दिसून आले नाही याची पूर्तता करुन दाखवावे.

6) साहित्य चाचणी तपासणीसाठी देयकांत रुपये 4,000/- प्रदान केले आहे परंतु याबाबत रक्कम पोचपावती नाही.

7) प्रशासकीय आदेशातील अट क्रमांक 16(ब)3 प्रमाणे समाजकल्याण अधिकारी यांचे तपासणी अहवाल प्राप्त झालेवरच देयकाचे अंतिम 10 टक्के रक्कम प्रदान करावयाचे आहे. असे असतांना समाजकल्याण अधिकारी यांचे तपासणी अहवाल प्राप्त झालेशिवाय संपूर्ण रकमेचे प्रदान केले आहे. तसेच कामाचे देयकांतून सुरक्षा अनामत कपात करण्यात आलेले नाही.

**4.198 मौजे कोळेगांव दलितवस्ती येथे कॉ्क्रीट रस्ता करणे कामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती मोहोळ, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** मौजे कोळेगांव दलितवस्ती येथे कॉ्क्रीट रस्ता करणे यासाठी रक्कम रुपये 7,88,647/- इतका खर्च झालेला आहे.

1) कार्यारंभ आदेशातील अट क्रमांक 7 प्रमाणे 1 लाखांवरील बांधकाम साहित्य खरेदी करिता ई निविदा प्रक्रिया राबविणे बंधनकारक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही.

2) प्रशासकीय आदेशातील अट क्रमांक 5 प्रमाणे कामाचे 3 स्थितीतील फोटो (काम सुरु होण्यापूर्वी, काम सुरु असतांना व काम पूर्ण झाल्यानंतर) देयकांसोबत जोडलेले नाहीत

3) काम पूर्ण झाल्यानंतर काम पूर्ण नोंदवहीत नोंद घेण्यात आलेल्या नाहीत.

4) काम पूर्ण झालेनंतर ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवहीस नोंदी घेतलेल्या नाही.

5) साहित्य चाचणी तपासणीसाठी देयकांत रुपये 3,500/- प्रदान केले आहे परंतु याबाबत रक्कम पोचपावती नाही.

6) प्रशासकीय आदेशातील अट क्रमांक 16(ब)3 प्रमाणे समाजकल्याण अधिकारी यांचे तपासणी अहवाल प्राप्त झालेवरच देयकाचे अंतिम 10 टक्के रक्कम प्रदान करावयाचे आहे. असे असतांना समाजकल्याण अधिकारी यांचे तपासणी अहवाल प्राप्त झालेशिवाय संपूर्ण रकमेचे प्रदान केले आहे.

7) देयकांतून सुरक्षा अनामत कपात करण्यात आलेले नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 118 प्रमाणे कामे अंदाजपत्रकांप्रमाणे करणे बंधनकारक आहे. अंदाजपत्रकाप्रमाणे रस्ता 3.30 मीटर रुंदीने करावयाचे असतांना कामात 15 मीटरचा एक तुकडा 7 मीटर रुंदीने केले आहे. त्यामुळे या 15 मीटरच्या कामात 3.7 मीटर (7-3.3) रुंदीने रस्ता खोदाई, 60 मीमी खडी पसरविणे रोलरने दबाई व एम 15 चा काँक्रीटचा थर याबाबीत जादा प्रदान झाले आहे. या जादा बाबींचे एकूण रुपये 30,867/- इतके वसुली करणेत यावी.

9) 271 मीटर रस्त्याचे काम करण्यात आले आहे. 271 मी रस्ता कामात कठीण मुरुम ब्लँकेटिंगसाठी 134.14 घमी (271 x 3.3x 0.15), साईडप्टटीसाठी 24.39 घमी (2 x 271 x 0.30 x 0.15) व ब्लाईंडेजसाठी 46.53 घमी (141घमी खडीच्या 33टक्के) असे एकूण 205 घमी कठीण मुरम वापरणे आवश्यक असतांना कामात 252 घमी कठीण मुरुम वापरण्यात आले. जादा वापर 47 घ मी (252-205) चे दर 366.5 (मुरमाचे दर 328.30 व पसरविणेचा दर रुपये 38.20) प्रमाणे एकूण रुपये 17,226/- जादा प्रदान झाले आहे. त्याची वसुली करण्यात यावी.

**4.199 साळे गंगणेवस्ती जवळे काँक्रीट रस्ता ता. सांगोला कामातील उणीवा.**

**पंचायत समिती सांगोला, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कार्यारंभ आदेश उपलब्ध नाही.

2) कामाचा माहिती फलक लावला नाही. रक्कम रुपये 5,000/- वसूलपात्र.

3) पॉवर रोलरचे लॉगशिट जोडण्यात आलेले नाही.

4) सर्वसाधारण तपशिलात आर.सी.सी.पाईपचा समावेश असताना अंदाजपत्रकात सदर बाब वगळण्यात आली आहे.

5) मोजमापानुसार 60 मि.मी. खडी 111 क्यु.मी.व हार्ड मुरूम 111.60 क्यु.मी. वापर केला असून वापराचे प्रमाणे 1/3 असल्याने 74 क्यु.मी.जादा वापरल्याने प्रति क्यु.मी. 267.40 याप्रमाणे रक्कम रुपये 19,788/- चे अतिप्रदान झाले आहे.

6) खडी,वाळू,मुरुम 340.23 क्यु.मी. गौण खनिजापोटी स्वामित्वधनाची रक्कम रुपये 24,044/- चे भरणा चलन उपलब्ध झाले नाही.

7) एम.बी. मधील नोंदी लाल शाईने रद्द केलेल्या नाहीत.

**4.200 13 व्या वित्त आयोग योजनेच्या बांधकामातील अनियमिततेबाबत. (केंद्र/राज्यशासन निधी)**

**पंचायत समिती अमरावती, जिल्हा अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती अमरावतीला सन 2014-2015 मध्ये 13 व्या वित्त आयोगाअंतर्गत रक्कम रुपये 29,27,669/- प्राप्त झाले, सुरुवातीची शिल्लक रक्कम रुपये 86,33,513/- होती असे एकूण रक्कम रुपये 1,15,61,182/- पैकी रक्कम रुपये 76,87,038/- खर्च झाला असून रुपये 38,74,144/- शिल्लक आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक - सिमेंट/1099/प्र क्र 56/35 मुंबई 32, दिनांक 30/06/2000 नुसार बांधकामावर वापरण्यात आलेले साहित्य योग्य गुणवत्तेचे असल्याबाबत चाचणी अहवाल लेखापरीक्षणास प्राप्त झाला नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 144 नुसार 3% सुरक्षा अनामत कपात केली नाही. खुलासा करावा.

3) महसूल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक - गौणखनिज/10/2009/प्र क्र 309/ख मंत्रालय मुंबई 32, दिनांक 11/02/2010 अन्वये गौणखनिजाची रक्कम कपात करण्यात आली नाही.

4) कामाच्या आदेशावर क्रमांक व दिनांक नमुद नसल्यामूळे काम विहित मुदतीत झाल्याबाबत खात्री करता आली नाही.

5) देयकातून आयकर व विक्रीकराची रक्कम रुपये 13,852/- कपात करण्यात आली नाही.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय - झेड्पीए 2000/प्र क्र 44/33 मुंबई 32, दिनांक 22/12/2000 मधील सूचना क्रमांक 1 ते 17 व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166 ते 168 नुसार मोजमापे नोंदविली नाही.कामाचा स्थळदर्शक नकाशा काढण्यात आला नाही,ठिकाण नमुद नाही,वहन अंतरानुसार मोजमापे नोंदविली नाही.

**4.201 धानोरा महाली येथील सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधकाम. (शासन निधी)**

**पंचायत समिती चांदुर रेल्वे, जिल्हा अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 41) -** पंचायत समिती चांदुर रेल्वे अंतर्गत ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे पत्र क्रमांक - ग्रा.वि./जल.सं/विकास/2013/प्र.क्र.80, दिनांक 13/12/2013 अन्वये मौजे धानोरा महाली येथे रक्कम रुपये 10 लक्ष किंमतीच्या जोडरस्त्याच्या कामाला मंजुरी देण्यात आली. त्यावर रक्कम रुपये 9,99,500/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मोजमाप पुस्तीकेतील पान क्रमांक 48 नुसार एकुण खर्च रुपये 9,58,000/- पर्यंत मर्यादित असतांना प्रत्यक्षात रक्कम रुपये 9,99,500/- शोधन करण्यात आले.

2) महाराष्ट्र बांधकाम नियमावलीतील नियम 206,207 नुसार बयाना रक्कम न घेताच कामाचे आदेश देण्यात आले आहेत.

3) रक्कम रुपये 11,605/- ची गौणखनिजाची वसुली करण्यात आली नाही.

4) सदर कामाची मुदत दिनांक 18/05/2014 पर्यंत होती. परंतू काम विहित मुदतीत पुर्ण झाले नाही.विलंबाबाबत कंत्राटदारावर दडात्मक कारवाई करुन रक्कम वसूल करण्यात यावी.

5) कार्यकारी अभियंता व उप कार्यकारी अभियंता यांनी नियमाप्रमाणे कामाची तपासणी केली नाही.

**4.202 लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या बांधकामावर झालेल्या खर्चातील अनियमीतता. (शासकीय निधी)**

**पंचायत समिती मोर्शी, जिल्हा अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती मोर्शीला सन 2014-2015 मध्ये लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे या योजनेसाठी रक्कम रुपये 36,30,000/- अनुदान प्राप्त झाले त्यापैकी रक्कम रुपये 16,99,800/- खर्च करण्यात आला व रक्कम रुपये 19,30,200/- शिल्लक आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निविदा प्रक्रीया विहित पद्धतीने पार पाडली नाही.

2) कामे सुरु करण्यापुर्वी सुरक्षा ठेव रक्कम रुपये 54,000/- घेण्यात आली नाही.

3) बांधकामावर वापरण्यात आलेले साहित्य योग्य गुणवत्तेचे असल्याबाबत चाचणी अहवाल लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही.

4) गौणखनिजाची रक्कम रुपये 17,574/- कपात करण्यात आली नाही.

5) नियमाप्रमाणे उपकराची रक्कम रुपये 18,000/- वसुल करण्यात आली नाही.

6) आयकर व विक्रीकराची रक्कम रुपये 36,000/- कपात करण्यात आली नाही.

7) कामाच्या आदेशावर दिनांक नमुद नाही तसेच काम पुर्ण झाल्याच्या नोंदी नमुना 69 मध्ये घेण्यात आल्या नाही.

**4.203 नविन अंगणवाडी बांधकामातील अनियमिततेबाबत. (शासन निधी-जिल्हा वार्षीक योजना)**

**पंचायत समिती भातकुली, जिल्हा अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती भातकुली अंतर्गत जिल्हा वार्षीक योजनेच्या निधिमधून खोलापूर कसबा, खोलापूर पांढरी व खोलापूर चक्रीपाडा या ठिकाणी प्रत्येकी रक्कम रुपये 4,50,000/- प्रमाणे नविन अंगणवाडी बांधकाम करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) खोलापूर कसबा येथील बांधकामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले नाही. अंदाजपत्रकात नमुद बाबी व मोजमाप पुस्तीकेतील बाबींमध्ये तफ़ावत आहे.बांधकामावर रक्कम रुपये 8,900/- ची जादा परीमाणाची कामे करण्यात आली असून त्यासाठी सक्षम प्राधीका-याची मंजुरी घेण्यात आली नाही.

2) अंदाजपत्रकाप्रमाणे आवश्यक सुविधा अनुदान शिल्लक असतांनाही पुरविण्यात आल्या नाहीत. यामध्ये ड्रेनेज पाईप, टाईल्स, पाण्याची टाकी या बाबीचे प्रमाण कमी केले आहे किंवा पुरवले नाही. पाण्यासाठी 500 लीटर च्या टाकी ऐवजी 300 लीटर ची टाकी पुरवण्यात आली आहे.केलेल्या बदलाबाबत सक्षम प्राधीका-याची मंजुरी घेण्यात आली नाही.

**4.204 13 वा वित्त आयोग निधीतुन केलेल्या बांधकाम खर्चाच्या अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती अकोला, जिल्हा अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -**13 वा वित्त आयोग अंतर्गत प्राप्त अनुदान रूपये 1,61,87,245/- मधुन रूपये 1,28,03,558/- इतका खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 13 वा वित्त आयोग निधीतील बांधकामे करण्याबाबत महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक 09/02/2009 नुसार सदरची बांधकामे पार पाडण्याकरीता सदर ग्रामपंचायती आर्थीक दृष्टया सक्षम असल्याबाबत 3 वर्षाचे उत्पन्नाचे विवरणपत्र नस्तीत न जोडल्याने पडताळणी करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णया नुसार दर्जा व गुणवत्ता बाबत अहवाल सादर केला नाही.

3) महसुल व वन विभाग शासन निर्णय दिनांक 11/02/2010 नुसार देयकातुन रॉयल्टी कपात करणे आवश्यक असतांना सदर देयकातुन रूपये 87,820/- रॉयल्टी कपात करून शासन खाती जमा केली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 197 नुसार बांधकाम पुर्ण झालेल्या कामाची नोंदवही नमुना 69 ठेवली नाही.

5) बांधकामाच्या मुळ मोजमाप पुस्तीका उपलब्ध झाल्या नाही. त्यामुळे देयकासोबत जोडलेल्या मोजमाप पुस्तीकेच्या छायांकीत प्रतीवरील मोजमापे एकच असल्याची खात्री करता आली नाही.

**4.205 13 वा वित्त आयोग अंतर्गत प्राप्त अनुदानामधुन बांधकामावर / दुरुस्ती वर केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती बार्शीटाकळी, जिल्हा अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** 13 वा वित्त आयोग अंतर्गत प्राप्त अनुदान रूपये 1,35,12,666/- मधुन रूपये 90,82,926/- इतका खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 13 वा वित्त आयोग निधीतील बांधकामे करण्याबाबत महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक 09/02/2009 नुसार सदरची बांधकामे पार पाडण्याकरीता सदर ग्रामपंचायती आर्थीकदृष्टया सक्षम असल्याबाबत 3 वर्षाचे उत्पन्नाचे विवरण पत्र नस्तीत न जोडल्याने पडताळणी करता आली नाही.

2) भारत सरकार आयकर अधिनियम 1961 मधील कलम 194 (क) नुसार कंत्राटदाराच्या देयकातुन 2.30 टक्के शिक्षण उपकरासह आयकर वसुल केला नाही.

3) महाराष्ट्र व्हॅल्यु व अॅडेड टॅक्स 2002 (महाराष्ट्र 2005) नुसार नोंदणीकृत मत्तेदाराच्या बिलातुन 2 टक्के व नोंदणी न केलेल्या मत्तेदाराच्या बिलातुन 4 टक्के महाराष्ट्र मुल्यवर्धीत कराचा भरणा केला नाही.

4) शासन परिपत्रक क्रमांक व्ही सी ए/1207/प्र.क्र. 788/का 7, दिनांक 21/04/2008 अन्वये बांधकामाच्या मुल्याच्या 1 टक्के उपकर बांधकामाच्या देयकातुन रूपये 32,468/- कपात करून शासन खाती भरणा केला नाही.

5) महसुल व वन विभाग शासन निर्णय दिनांक 11/02/2010 नुसार देयकातुन रॉयल्टी कपात करणे आवश्यक असतांना सदर देयकातुन शासन निर्देशानुसार वापरलेल्या गौण खनिजाची परीगणना करून रॉयल्टी कपात करून शासन खाती भरणा करावी.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 197 नुसार बांधकाम पुर्ण झालेल्या वर कामाची नोंदवही नमुना 69 ठेवली नाही.

7) शासन निर्णय दिनांक 19/10/2011 नुसार ई निविदा कार्यप्रणाली चा वापर करून विहीत पध्दतीने साहीत्य खरेदी करणे बंधनकारक असतांना त्याबाबतचे अभिलेखे सादर केले नाही.

8) उपरोक्त बांधकामाची मोजमापे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 167 व 168 मधील तरतूदींनुसार विहीत प्रमाणात तांत्रिक तपासणी सक्षम प्राधिकाऱ्यांनी केली नसल्याने मोजमाप पुस्तकाचे लेखापरीक्षण करतांना निदर्शनास येते. त्यामुळे अंदाजपत्रकाप्रमाणे गुणात्मक दर्जाबाबत खात्री करता आली नाही.

9) बांधकामाची मोजमापे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 47 नुसार कामासाठी वापरलेल्या साहित्याची गुणनियंत्रण विभागाकडून तपासणी करून न घेताच काम पुर्ण करण्यात आले असल्याचे दिसुन येते.

**4.206 अनुसुचित जाती नव बौध्द घटकांचा विकास योजनेअंतर्गत केलेल्या बांधकाम खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती तेल्हारा, जिल्हा अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 26) -** अनुसुचित जाती नवबौध्द घटकांचा विकास योजनेंतर्गत एकुण 33 बांधकामावर रूपये 80,87,891/- इतका खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांचा विकास योजना बांधकामा करीता नमुना नंबर 48 करारनामा नोंदवही ठेवली नाही.

2) शासन निर्णय दिनांक 14/11/2008 नुसार 100 मीटर लांबीचे रस्त्यांचे कामांना मंजुरी देण्यात येते. परंतु पंचायत समिती ने रस्त्याची कामे नियमबाहयपणे 100 मीटरपंक्षा जास्त लांबीची केली आहेत. सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेणेत आलेली नाही.

3) ग्रामपंचायत मालमत्ता नोंदवहीत नोंदी नाहीत.

4) मुंबई मुद्रांक शुलक अधिनियम 1958 चे कलम 34 अन्वये रूपये 10 लाख पर्यंतच्या कामाला रूपये 100 व पुढील प्रत्येक 1 लाखास रूपये 100 प्रमाणे स्टॅम्प पेपर लावण् आवश्यक आहे. परंतू पंचायत समितीने कमी रक्कमेचे मुद्रांकाचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे रूपये 500 संबंधीताकडून वसुल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 150 व 151 नुसार प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणची पाहणी न करता प्राकलने तयार केली.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 118 व 153 नुसार प्राकलनातील बाब निहाय परिमाण व मोजमाप घेतेलेल्या बाबनिहाय परिमाणात तफावत दिसुन येते. सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता आवश्यक आहे.

7) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक 5 डिसेंबर 2011 परिशीष्ठ अ मधील मुद्दा 12 प्रमाणे कार्यवाही केली नाही.

8) 1 टक्का शासकीय विमा रूपये 12,000/- कपात केला नाही, 1 टक्का उपकर रूपये 35,750/- तसेच रॉयल्टी कपात केले नाही. सदर रकमा वसुल करून योग्य लेखाशिर्षा खाली जमा कराव्यात.

9) कामाचे जादा मुल्यांकन नोंदविलेली रक्कम रूपये 4,279/- संबंधीत जवाबदार तांत्रीक अधिकाऱ्यांकडून वसुल करावे.

10) करारनामा केलेल्या स्टॅम्प पेपरवर स्टॅम्प खरेदी केल्याचा दिनांक 08/01/2015 नमुद आहे. काम पुर्ण दिनांक 26/12/2014 नमुद आहे. काम पुर्ण झाल्यावर करारनामा केल्याचे दिसुन येते.

11) कामाचे साहीत्य खरेदी करतांना सदर एजन्सी MEDA ची मान्यताप्राप्त अधीकृत पुरवठादार असल्याचे अभिलेखे नस्तीत नाही.

**4.207 वाहन भाडयाने घेणेबाबत.**

**पंचायत समिती मालेगाव, जिल्हा वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** उपविभाग बांधकाम यांनी कामाची पाहणी करणेकरीता खाजगीवाहन भाडयाने घेतले असून सदर वाहनभाडे प्रक्रियेमध्ये खालील अनियमितता आढळून येते.

1) सदर नस्तीमध्ये अनुदान प्राप्त आदेश, सक्षम प्राधिकारी खर्च मंजूरी आदेश दर्शविण्यात आला नाही.

2) देयकात एकुण कि.मी. अंतर 31187 दर्शविले परंतु धावपुस्तीकेत प्रत्यक्ष 30941 कि.मी. आढळून आले. जादा अंतर 246 कि.मी. X 9.80 दर = 2411/- रुपये वसुलपात्र रक्कम ठरते.

**4.208 13 वा वित्त् आयोग निधीमधुन सौरपथदिवे खरेदीबाबत.**

**पंचायत समिती मंगरुळपीर, जिल्हा वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** सन 2014-15 मध्ये पंचायत समिती मंगरुळपीर, यांनी 13 वा वित्त् आयोगातुन नियमाबाहयपणे सौर पथदिवे खरेदी करुन त्यावर रुपये 13,47,743/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक तेविआ-2010/प्र.क्र.22/वित्त्-4 दिनांक 30/08/2010 च्या मार्गदर्शक सुचनेतील परिशिष्ट ड नुसार सौर ऊर्जेवरील उपकरणे राज्य स्तरावरुन कार्यवाही करावयाची असतांना पंचायत समितीने नियमबाहयपणे सौर पथदिवे खरेदी केले करीता झालेला खर्च मान्य करता येत नाही.

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक सौऊ दि.2013/प्र.क्र.93/ पंरा 506/ दिनांक 10/03/2015 नुसार सन 2013-14 वर्षाकरीता महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरणाच्या दर करार सुचीमधील निवड केलेल्या दरपत्रकाची मुदत दिनांक 31/03/2014 रोजी संपली असतांना नियमबाहयपणे त्यांचे कडून खरेदी करण्यात आली.

3) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक सौऊ दि.2013/प्र.क्र.93 /पंरा 06/ दिनांक 04/03/2014 नुसार सन 2013-14 वर्षाकरीता सौर पथदिवे कार्यक्रम अंमलबजावणी व सौर पथदिवे बसविण्यास मंजुरी देण्यात आली त्या अन्वये LED सौर पथदिवेंची किंमत रुपये 17,641/- निश्चित केली आहे. तरीही विभागाने नियमबाहयपणे कालबाहय दरकरारावर रुपये 20,685/-, 20,500/- व 19,250/- प्रति सौर लाईट दराने खरेदी केले.

4) महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरणाच्या दर करारसुचीमधील नेमलेल्या एजन्सीची यादी जिल्हानिहाय नियुक्ती आदेश देण्यात आले विवरणपत्र 1 नुसार वाशिम जिल्हयाकरीता क्रिएटिव इलेक्ट्रीक्स, जिल्हा अहमदनगर येथून खरेदी करणे आवश्यक असतांना पंचायत समितीने अग्रीन अलाईड सर्वीस, नागपूर यांचे कडून नियमबाहयपणे खरेदी केली.

5) उपरोक्त शासन निर्णयातील अट क्रमांक 6 अन्वये सन 2013-14 मध्ये पर्यावरण संतुलन मध्ये पात्र ठरलेल्या वाशिम जिल्हयाकरीता 2 ग्रामपंचायतींना 3 प्रमाणे सौर पथदिवे बसविण्याचे उददीष्ट असतांना पंचायत समितीने सन 2013-14 ते 2014-15 मध्ये नियमबाहयपणे 68 पथदिवे नियमबाहयपणे खरेदी केले.

6) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक सौऊ दि.2011/प्र.क्र.59/ पंरा09/ दिनांक 31/03/2011 नुसार ग्रामपंचायतीची निवड लोकसंख्येच्या आधारावर करावयाची आहे. ग्रामपंचातीचे लोकसंख्येबाबतचे अहवाल लेखापरिक्षणास प्राप्त् झाले नाही. करीता निवड कशाचे आधारे करण्यात आली ते दर्शवावे.

7) पंचायत समिती सभेच्या ठराव क्रमांक 5 दिनांक 25/11/2013 नुसार 32 नग पुरविण्याकरीता पुरवठा आदेश क्रमांक 1080/2014 दिनांक 04/03/2014 ला पुरवठा आदेश देण्यात आले परंतु आस्थापित करावयाच्या ग्रामपंचायतींची नावे आदेशात नमुद केले नाही. करीता पुरवठा ग्रामपंचायतींना दिल्याबाबत पडताळणी करता आली नाही. तसेच ग्रामपंचायतीचे सौर पथदिवे आस्थापित केल्याचे प्रमाणपत्र नाही.

8) ग्रामपंचायत तऱ्हाळा-1 लाईट, नांदखेडा-6, माळशेलु-6 यांच्या जंगम मालमत्ता नोंदवहीच्या झेरॉक्स प्रतिची तपासणी केली. परंतु उर्वरीत ग्रामपंचायतीच्या जंगम मालमत्ता नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत. करीता निवड केलेल्या ग्रामपंचायतींना लाभ मिळाल्याची पडताळणी करता आली नाही.

9) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक तेविआ 2010/प्र.क्र.22/वित्त्-4 दिनांक 30/08/2010 च्या अट क्रमांक 7 नुसार ग्रामपंचातीकडून उपयोगीता प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही.

10) प्रमाणक क्रमांक 26 दिनांक 20/02/2015 पुरवठा आदेश पत्रानुसार दिनांक 13/02/2015 ला पुरवठा आदेश देण्यात आला व Tax Invoice नुसार त्याच दिवशी पुरवठा प्राप्त् झाल्याचे दर्शविण्यात आला.

11) करारनाम्यातील अट क्रमांक 7 नुसार पुरवठा आदेशापासुन 10 दिवसांच्या आत पुरवठा न केल्यास एकुण किंमतीच्या 0.50 टक्के विलंब शुल्क् दर आठवडयानुसार आकारण्यात येईल परंतु प्रमाणक क्रमांक 28 दिनांक 09/03/2015 अन्वये खरेदी करण्यात आलेल्या सौर पथदिवे Tax Invoice no व माल प्राप्तिची दिनांक नमुद नाही. पुरवठादाराकडून विलंब शुल्क् आकारणी करुन शासन निधीत भरणा करण्यात यावे.

### 4.209 मौजे सागवन येथील रस्ता बांधकामात वापरलेल्या गौण खनिज रक्कम कपात न करणेबाबत.

**पंचायत समिती बुलढाणा, जिल्हा बुलढाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

मौजे ग्रामपंचायत सागवान येथील रस्ता बांधकामामध्ये Providing earthwork inbarkment (मातीचा भराव) याबाबीचा दर 140.68 प्रति घन मिटर आकारुन मुल्यांकन नोंदविले आहे. यामध्ये 70.67 प्रति घनमिटर गौण खनिज दर त्यात समाविष्ठ करुन पुर्ण दर 140.68 रुपये प्रमाणे आकारली आहे. त्यानुसार माती भारावाच्या कामाचे एकुण परिमाण 1082.9 घनमिटर झाले असुन त्यात समाविष्ठ गौणखनिज दर 70.67 प्रमाणे एकुण रक्कम रुपये 76,539/- रुपये शासनखाती भरणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. सन 2014-2015 मधील पंचायत समिती स्तर 13 वा वित्त आयोगाचे काम प्रमाणक क्रमांक 23, मौजे सागवण मध्ये या बाबीचा दर 70 रुपये घेण्यात आला आहे. त्यात रॉयल्टी रक्क्म घेण्यात आली नाही मात्र या कामात रॉयल्टी रक्क्म घेवुन 140.68 रुपये दर आकारला आहे.

### 4.210 रोजंदारी कर्मचाऱ्यांना नियमबाहय दैनंदिन अदायगीचे देयकाचे नियमबाहय प्रदान करणेबाबत.

**पंचायत समिती बुलढाणा, जिल्हा बुलढाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** जिल्हा परिषद स्वउत्पन्नातून बांधलेल्या इमारतीच्या देशभालीसाठी रोजंदारीवरील मजुराचा खर्च हा जिल्हा परिषद स्व:उत्पन्नातून करणे आवश्यक असतांना हा खर्च शासकीय अनुदानातुन रक्कम रुपये 2,23,947/- करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 133 नुसार दिलेल्या बाबीवरील खर्च हा जिल्हा परिषद स्व:उत्पन्नातून करणे आवश्यक असतांना हा खर्च शासकीय अनुदानातुन जिल्हा परिषद इमारत व निवासस्थान साफसफाई साठी नियमबाहय खर्च करण्यात आला आहे.

**4.211 दलीत वस्ती सुधार योजनेमधुन मनार्डी येथील रस्ता कामामध्ये बांधकाम साहीत्याचे वाहतुकीचे अंतर वाढविल्याने जादा प्रदान होणेबाबत.**

**पंचायत समिती संग्रामपुर, जिल्हा बुलढाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** प्रमाणक क्रमांक 128(8), दिनांक 16/02/2015 रुपये 50,000/- (कामावरील खर्च 2 लाख) उपरोक्त बांधकामाचे अंदाजपत्रकाची पडताळणी केली असता लीड स्टेटमेंटनुसार एकाच गावात दोन वेगवेगळी कामे होत असतांना तयार केलेल्या अंदाजपत्रकामध्ये बांधकामासाठी लागणाऱ्या साहीत्याचे आणण्यासाठी घेतलेले अंतर किलोमीटर मध्ये जादा दर्शविल्याने वाहतुक दर वाढवुन जादा मुल्यांकन केल्याने जादा प्रदान झाले आहे. याच गावातील रस्ता कामाचे तांत्रिक मान्यता प्राप्त अंदाजपत्रक क्रमांक 123/2014-2015 व या कामाचे अंदाजपत्रकाची तुलना केली असता साहीत्य आणण्याचे अंतरामध्ये तफावत केल्याने दर पृथ:करणामध्ये वाहतुक दर वाढवुन मुल्यांकन वाढल्याने जादा प्रदान झाले असल्याचे आढळुन आले. जादा मुल्यांकन केल्याने सदर कामावर एकुण 10,343/- चे अतिप्रदान झाले आहे.

**4.212 बांधकामाचे देयकातुन विक्रीकर (व्हॅट) वसूल न केल्याने झालेल्या शासकीय महसुलाचे हानीबाबत.**

**पंचायत समिती मेहकर, जिल्हा बुलढाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती, मेहकर येथील सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करतांना असे निदर्शनास येते की बांधकाम विभागातील विविध योजनेतुन केलेल्या बांधकाम देयकातुन विक्रीकराची कपात न केल्याने शासन महसुलाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे**.** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

अप्पर विक्रीकर आयुक्त, नागपुर क्षेत्र, नागपुर यांचे पत्र क्रमांक स्था**.**स्व**.**संस्था **/**mvat /TDS**/**कपात**/**ब**-**150, दिनांक 31 जानेवारी 2014 नुसार बांधकाम करतांना ग्रामपंचायत कंत्राटदार म्हणुण काम करते**,** त्यामुळे ग्रामपंचायतने केलेल्या बांधकामाचे देयकातुन 5% विक्रीकर वसुल करण्याबाबत निर्देश दिले असतांनाही सन 2014-2015 मध्ये माहे डिसेंबर 2014 पासुनच कपात करण्यात येत आहे. तथापि, डिसेंबर 2014 पुर्वीच्या बांधकामावरील एकुण रक्कम रुपये 14,54,004/**-** देयकातून विक्रीकराची वसूली करण्यात आलेली नाही**.**

**4.213 13 व्या वित्त आयोगाचे बेसिक ग्रँट व परफॉर्मस ग्रँट मधुन करावयाचे बाबीचे योग्य नियोजन न करणे.**

**पंचायत समिती मेहकर, जिल्हा बुलढाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** इतिवृत्त नोंदवहीची पडताळणी केली असता राज्य व केंद्र शासनकडुन प्राप्त झालेल्या जनरल बेसिक ग्रँट व जनरल परफॉर्मस ग्रँट मधुन करावयाचे बाबीचे योग्य नियोजन केल्याचे दिसुन येत नाही**.** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तेविआ**-**2010**/**प्रक्र**.**22/वित्त-4**,** दिनांक 30 ऑगस्ट, 2010 नुसार मार्गदर्शक सुचनेनुसार केवळ एक प्रकारची कामे न घेता शासन निर्णयामध्ये देण्यात आलेल्या 12 बाबीनुसार नियोजन करणे आवश्यक असतांना योग्य नियोजन न करता कामाची विभागणी करण्यात आल्याने शासन निर्णयाचे उल्लंघन झालेले आहे**.**

2**)** प्राप्त अनुदानाचे सर्व गणामधील गावांना लाभ मिळेल याचे नियोजन करुन अनुदानाचे वितरण करणे आवश्यक असतांना 12 गणापैकी 11 गणांना समान अनुदान व एका गणाला दुबार अनुदान दिल्यामुळे बहुतांश गावे विकास कामापासुन वंचित राहीले आहे.

**4.214 कायम प्रवास भत्याचे नियमबाहय प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती मलकापूर, जिल्हा बुलढाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** लेखापरीक्षण करतेवेळी कायम प्रवासभत्याचे नियमबाहय प्रदान करण्यात आले आहे**.** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग**,** शासन निर्णय क्रमांक प्रवास**-**1010/प्रक्र**-2** सेवा**-5** दिनांक 03/03/2010 मधील परिच्छेद क्रमांक 10 नुसार ज्या पदास कायम प्रवासभत्ता लागु होता त्या पदावर असलेल्या शासकीय कर्मचाऱ्याकरीता लागु आहे**.** परंतु कार्यकारी अभियंता जिल्हा परीषद बांधकाम विभाग, बुलढाणा यांचे कार्यालयीन पत्र

क्रमांक बुजिप/बावि/आस्था-1/3088/2013, दिनांक 13/11/2013 नुसार स्थापत्य अभियंता यांना कायम प्रवासभत्ता मंजूर केला आहे.

2) ज्या कर्मचाऱ्यांची पदे आरोग्य विभागाअंतर्गत आरोग्य केंद्रावर मंजुर असतांना त्या कर्मचाऱ्यांना त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये कायम प्रवासभत्ता अनुज्ञेय आहे. स्थापत्य अभियंता हे पंचायत समिती स्तरावर कार्यरत असल्याने तथा त्यांचे पदास पुर्वी किंवा शासन निर्णयानंतर कायम प्रवासभत्ता प्रदानाबाबत शासन आदेश नाहीत. त्यामुळे स्थापत्य अभियंता यांना प्रदान केलेल्या कायम प्रवास भत्ता रक्कम रुपये 51,000/- वसूलपात्र ठरते.

**4.215 ग्राम पंचायत भवन बांधकाम खर्चातील अनियमितता**.

**पंचायत समिती चिखली**, **जिल्हा बुलडाणा**, **सन 2014-2015** (**परिच्छेद क्रमांक 7) -** बांधकाम विभागाकडुन एकुण 7 (ग्रामपंचायत घोडप, तेल्हारा, डासाळा, आंधई, करतवाडी, अंचरवाडी, भोर्सी) या ग्रामपंचायतींना रक्कम रुपये 8,00,000/- प्रमाणे एकुण रक्कम रुपये 56,00,000/- चे अनुदान प्रदान करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विमा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रविनि /2301/सहविमा, दिनांक 10/09/2011 व शासन निर्णय क्रमांक जिप/2000/प्रक्रं.836/35, दिनांक 8 मे, 2012 नुसार अंदाजपत्रकीय किंमतीचे 1% विमा वसुल करणे आवश्यक रक्कम रुपये 56,000/- कामगार विम्याची रक्कम वसुली करण्यात आली नाही.

2) अंदाजपत्रकीय किंमतीचे 1% उपकर कपात करणे आवश्यक असतांना ग्रामपचायंतचे कामाच्या देयकातुन रक्कम रुपये 56,000/- उपकर कपात करण्यात आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि 10/1009/प्रक्रं.309/खनिज, दिनांक 11/02/2010 रेती, खडी, मुरुम इत्यादी साहीत्यावर प्रति ब्रास 200/- अथवा प्रति घन मिटर 70.68 प्रमाणे स्वामित्वधनाची वसुली करणे आवश्यक आहे.

4) अधिक्षक अभियंता सार्वनिक बांधकाम विभाग यांचे परिपत्रक क्रमांक जी.आर 34/5169/दिनांक 9 जानेवारी 1987 व शासन निर्णय क्रमांक सिमेंट 1099/प्र.क्र.56/35 दिनांक 30 जुन 2000 कामासाठी लागणाऱ्या साहीत्याचा वापर करण्यापूर्वी साहीत्य प्रयोग शाळेकडून चांचणी करुन घेणे बंधनकारक आहे.

**4.216 महात्मा गांधी ग्रामिण रोजगार योजने अंतर्गत जवाहर विहिरीचे बांधकामाबाबत. (शासन निधी).**

**पंचायत समिती सावनेर, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** सन 2008-09 मध्ये लाभार्थ्यांस मंजूर झालेल्या विहिरीचे प्राकलीत मूल्य रूपये 1,00,000/- होते. परंतु काम विहित मुदतीत पुर्ण न झाल्याने सुधारीत प्राकलन रूपये 2,50,000/- चे तयार केले. महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक योजना-2013/प्र.क्र.123/रोहयो-5, दिनांक 23/01/2014 अन्वये अनुदान मंजूर केले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) गावात योजनेचा प्रचार व प्रसिध्दी केल्याबाबत अभिलेखे मिळाले नाही. महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक जविका-1298/प्र.104/रोहयो-10, मंत्रालय मुंबई, दिनांक 01/07/1999 अन्वये प्राप्त अर्ज मंजूरीबाबत ग्रामसभेत ठराव झाला नाही.

2) प्राकलनानुसार 10.50 मीटर खोलीपर्यंत कॉक्रिटींग करायचे होते. परंतु प्रत्यक्षात 16.70 मीटर कॉक्रिटींग करून केवळ 748 कि.ग्रा. लोखंड वापरले त्यामुळे कामाच्या दर्जाबाबत संशय वाटतो.

विहिरीचे प्राकलन तयार करण्यापुर्वी बोरींग करून जमिनीचे नमुने घेतले जातात त्यानुसार सदर प्राकलनात 10.50 मिटर ते तळापर्यंत मुरूम दाखविले आहे. परंतु अभियंताच्या अहवाला नुसार त्याजागी माती लागल्यामुळे कॉक्रिटींग करावे लागले. त्यामुळे बोरींगने जमिनीचे नमुने न घेताच प्राकलन तयार केल्याचे निदर्शनास येते. तसेच मोजमाप पुस्तिकेवर बाबनिहाय दिनांक नमुद नाही

3) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2004/प्र.क्र.85/रस्ते 1, दिनांक 11/06/2004 प्रमाणे अंदाजपत्रकीय परिमाणापेक्षा जादा काम होत असल्यास जादा कामास मंजूरी घेवून काम करावयाचे असतांना सदर शासन निर्णयाचे पालन न केल्याने रूपये 14,709/- चा खर्च नियमबाह्य आहे.

**4.217 ठक्कर बाप्पा योजने अंतर्गत रोड बांधकामा बाबत अनियमितता. (शासन निधी).**

**पंचायत समिती कळमेश्वर, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर/1007/प्र.क्र.105/कोषा/प्र 5, दिनांक 22/02/2008 व आयकर अधिनियम 1961 चे कलम 124 C प्रमाणे कंत्राटदाराच्या देयकातून 2 टक्के आयकर रूपये 15,000/- व त्यावर सरचार्ज रूपये 2,250/- असे एकूण रूपये 17,250/- ची कपात करण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग परिपत्रक क्रमांक विकास/1198/प्र.क्र 43/कराधान-1, दिनांक 05/05/1999 व सुधारीत मूल्यवर्धीत कर प्रणाली 2005 अन्वये नोंदणीकृत कंत्राटदाराकडून 2 टक्के व अनोंदणीकृत कंत्राटदाराकडून 4 टक्के वसुल करण्याबाबत शासनाचे निर्देश असतांना रूपये 15,000/- कपात केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जि.प.2-2000/प्र.क्र.837/पंरा.8/35,दिनांक 08/05/2002 व विमा संचालनालय मुंबई दिनांक 27/06/2003 नुसार कामाचा विमा काढण्यात न आल्याने 1 टक्के रक्कम रूपये 7,500/- वसुल करुन विमानिधीत जमा करावे.

4) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/प्र.क्र.108/कामगार-7, दिनांक 07/06/2010 अन्वये बांधकाम खर्चाच्या 1 टक्के रक्कम कामगार कल्याण उपकरासाठी वसुल करण्यात न आल्याने रक्कम रूपये 7,500/- संबधीताकडून वसुल करावे.

5) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि-10/10009/ प्र.क्र.309,दिनांक 11/02/2010 अन्वये कंत्राटदाराकडून गौण खनिज रक्कमेची कपात करण्यात आलेली नाही.

**4.218 राजीव गांधी ग्रामपंचायत भवन बांधकामाचे रक्कम प्रदानातील अनियमितता. (शासन निधी).**

**पंचायत समिती कळमेश्वर, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर/1007/प्र.क्र.105/कोषा/प्र 5, दिनांक 22/02/2008 व आयकर अधिनियम 1961 चे कलम 124 C प्रमाणे कंत्राटदाराच्या देयकातून 2 टक्के आयकर रूपये 24,000/- व त्यावर सरचार्ज रूपये 3,600/- असे एकूण रूपये 27,600/- ची कपात करण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक विकास/1198/प्र.क्र.43/कराधान-1, दिनांक 05/05/1999 व सुधारित मुल्यवर्धीत कर प्रणाली 2005 अन्वये नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन 2 टक्के व अनोंदणीकृत कंत्राटदाराकडुन 4 टक्के वसुल करण्याबाबत शासनाचे निर्देश असतांना रूपये 24,000/- कपात केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जि.प.2-2000/प्र.क्र.837/पंरा.8/35, दिनांक 08/05/2002 व विमा संचालनालय, मुंबई दिनांक 27/06/2003 नुसार कामाचा विमा काढण्यात न आल्याने 1 टक्के रक्कम रूपये 12,000/- वसुल करुन विमानिधीत जमा करावे.

4) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/प्र.क्र.108/कामगार-7, दिनांक 07/06/2010 अन्वये बांधकाम खर्चाच्या 1 टक्के रक्कम कामगार कल्याण उपकरासाठी वसुल करण्यात न आल्याने रक्कम रूपये 12,000/- संबधीताकडून वसुल करावे.

5) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि-10/10009/प्र.क्र.309,दिनांक 11/02/2010 अन्वये कंत्राटदाराकडून गौण खनिज रक्कमेची कपात करण्यात आलली नाही.

**4.219 पारडीकला येथे स्मशानभुमी ॲप्रोच रस्ता बांधकाम करणे. (शासन निधी).**

**पंचायत समिती मौदा, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पारडीकला येथे करण्यात आलेल्या स्मशानभुमी ॲप्रोच रस्ता बांधकाम खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) रॉयल्टीची रक्कम रूपये 43,466.50 कमी वसुल करण्यात आली.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 153 (1) अन्वये अंदाजपत्रकात दिलेल्या निर्देशानुसार काम न करता कमी अधिक काम नोंदविण्यात आले आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 120 (2) नुसार परिषदेपेक्षा खालचा दर्जा नसेल अशा प्राधिकरणाने मंजूर केलेल्या प्रकल्पाचा एखादा भरीव भाग सोडून दिल्यामुळे होणारी बचत इतर भागाच्या बांधकामावर वापरायची नसतांना बचत अन्य बाबीवर ज्यादा काम करण्याकरीता वापरल्याचे दिसून येते.

4) मुल्यवर्धीत कराची रक्कम रूपये 7,000/- कमी कपात केल्याने वसुल होणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र 44/33, दिनांक 22/10/2000 अन्वये मोजमाप पुस्तिकेत दिनांकीत नोंदी नाही व काम पुर्णत्वाचा दाखला नोंदविण्यात आला नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 नुसार बांधकामाबाबत संपूर्ण माहिती पुर्ण झालेल्या बांधकाची नोंदवही नमुना-69 मध्ये ठेवणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही केलेली नाही.

**4.220 बार्शी वार्ड क्रमांक 3 येथे सिमेंट रस्त्याचे बांधकाम करणे. (सेस फंड).**

**पंचायत समिती मौदा, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** बार्शी वार्ड क्रमांक 3 येथे सिमेंट रस्त्याचे बांधकामाच्या खर्चाबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्रमांक 1445, दिनांक 05/02/2015 मधील अट क्रमांक 15 नुसार कामाच्या प्रशासकीय मंजूरीची प्रक्रिया गट विकास अधिकाऱ्यांनी करावयची असतांना त्यानुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र 44/33, दिनांक 22/10/2000 अन्वये मोजमाप पुस्तिकेत दिनांकीत नोंदी नाही व काम पुर्णत्वाचा दाखला नोंदविण्यात आला नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 नुसार बांधकामाबाबत संपूर्ण माहिती पुर्ण झालेल्या बांधकामाची नोंदवही नमुना-69 मध्ये ठेवणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही केलेली नाही.

**4.221 ग्रामपंचायत कुही येथे सिमेंट रस्ता बांधकामातील अनियमितताबाबत. (शासन निधी).**

**पंचायत समिती कुही, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 28) -** ग्रामपंचायत कुही, वार्ड क्रमांक 2 सिमेंट रस्ता बांधकामाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि-10/ 1009/प्र.क्र.309/ख मुंबई, दिनांक 11/02/2010 अन्वये वापरलेल्या साहित्यावर स्वामित्व धनाबाबत रूपये 3,426/- वसुल करण्यात आले नाही.

2) महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर 1007/प्र.क्र.105/ कोषा/प्र.5, दिनांक 22/02/2008 व आयकर अधिनियम 1961 चे कलम 124 सी प्रमाणे कंत्राटदाराच्या देयकातून रूपये 11,500/- आयकर कपात केलेला नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जि.प.2-2000/प्र.क्र.837/पंरा.8/35, दिनांक 08/05/2002 व विमा संचालनालय मुंबई दिनांक 27/06/2003 नुसार कामाचा विमा काढण्यात न आल्याने रूपये 5,000/- वसुल करून विमानिधीत जमा करावे.

4) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक विकास-1198/प्र.क्र43/ कराधान-1, दिनांक 05/05/1999 व सुधारीत मुल्यवर्धीत करप्रणाली 2005 अन्वये रूपये 20,000/- कर कपात केली नाही.

5) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, परिपत्रक क्रमांक बीसीए-2009/ प्र.क्र.108/कामगार-7 अ, दिनांक 17/06/2010 अन्वये कामाच्या मूल्याच्या 1% नुसार रूपये 5,000/- कर वसुली करण्यात आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, समाज कल्याण सांस्कृतीक कार्य, क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक 1088/प्र.क्र./आ.व.क./2, दिनांक 16/07/1998 अन्वये समाज कल्याण अधिकारी यांनी दलित वस्तीच्या कामाची पाहणी केली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट साहित्य-1099/प्र.क्र 56/35, दिनांक 30/06/2000 अन्वये साहित्याची गुणवत्ता चाचणी करण्यात आली नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/10/2000 अन्वये नोंदविलेल्या मोजमापावर तांत्रिक अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

**4.222 कुंभी येथील पांधन रस्ता कामाबाबत. (13 वा वित्त आयोग)**

**पंचायत समिती हिंगणघाट, जिल्हा वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदर कामावर प्रमाणक क्रमांक 46 दिनांक 30/03/2015 एकूण रुपये 2,24,130/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

उपरोक्त कामात पहिली बाब क्रमांक 1 - Cleaning the side remaining bushes हे असून त्यानंतर बाब क्र.2 हे excavation for catch/side water gutter in all sort of soils, soft murum हे आहे व बाब क्रमांक 3 हे watering & compacting of material etc.. हे आहे. प्राकलनानुसार बाब क्रमांक 1 चे जेवढे अंतर काम असेल तेवढ्याच किंवा त्यापेक्षा कमी अंतरावर बाब क्रमांक 2 व 3 चे काम झाले पाहिजे. परंतु मोजमाप पुस्तिका 4696 पान क्रमांक 13,18,20,21 तपासले असता, बाब क्रमांक 1 चे काम 600 मीटर झाले असून बाब क्रमांक 2 व 3 चे काम हे 660 मीटर झाले आहे. प्राकलनानुसार बाब क्रमांक 2 व 3 चे काम हे 600 मीटर किंवा त्यापेक्षा कमी होणे आवश्यक आहे. त्यामुळे 60 मीटर जास्तीच्या कामावर बाब क्र. 2 व बाब क्रमांक 3 वर झालेला खर्च रक्कम रुपये 20,433/- संबंधिताकडून वसूल करण्यात यावा.

**4.223 13 वा वित्त आयोग अंतर्गत करण्यांत आलेल्या बांधकामाच्या रक्कमेतुन शासकीय कपाती न करणे व इतर अनियमितता. (13 वा वित्त आयोग)**

**पंचायत समिती कारंजा, जिल्हा वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** 13 वा वित्त आयोग निधीतून केलेल्या एकुण 29 सिमेंट रस्ता बांधकाम व रस्ता दुरुस्तीचे काम करण्यात आले आहेत. त्याबाबतची नस्ती तपासली असता पंचायत समितीने गौणखनिजाची कपात वगळता इतर कपाती न करता देयके प्रदान करण्यात आलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम, 2002 नुसार असाधारण क्रमांक 22, विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अधिसूचना क्र. विसआ (मुख्य)1/मूवक/2005/97, दिनांक 04/04/2012 अन्वये सुधारणा करण्यात आल्या नुसार व्हॅटची रक्कम 5 टक्के प्रमाणे एकूण रूपये 2,65,949/- कपात करुन शासन खाती जमा करण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/ प्र.क्र.108/कामगार 7-अ, मंत्रालय, मुंबई-32, दिनांक 17/06/2010 अन्वये बांधकामाच्या एकूण मुल्यानुसार 1 टक्के

कामगार कल्याण उपकर वसुल करणे आवश्यक आहे. परंतु त्याप्रमाणे एकूण रूपये 53,189/- कपात करण्यात आले नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर/35 /837/प्र.क्र.2000/ दिनांक 08/05/2002 नुसार 1 टक्का विमा कपात करुन शासन खाती जमा करणे आवश्यक असतांना रक्कम रुपये 53,189/- जमा करण्यात आली नाही.

4) भारत सरकार, आयकर अधिनियम 1961 चे कलम 194(सी) अन्वये पुरवठादाराकडून रुपये 30,000/- व त्यावरील प्रदानातून आयकर व सरचार्ज एकूण रूपये 1,06,667/- कपात करण्या आलेले नाही.

5) काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्रावर दिनांक नमुद नाही. ताबा पावती नस्तीस जोडलेले नाही. संबंधीत कामाची मोजमाप पुस्तीका पाहीली असता सविस्तर काम निहाय व कामाच्या प्रगती निहाय नोंदी घेण्यात आल्या नाहीत. केवळ बिलाची नोंदवही असेच मोजमाप पुस्तीकेची स्वरुप दिसते.

### 4.224 ठक्करबाबा आदिवासी योजनेंतर्गत झालेल्या कामातील अनियमितता. (हस्तांतरण योजना)

**पंचायत समिती आष्टी, जिल्हा वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** ठक्करबाबा आदिवासी योजनेंतर्गत 1 ते 4 सिमेंट कांक्रिट रस्ता बांधकाम अनुक्रमे ग्रामपंचायत, बोरखेडी, रुपये 5,05,895/- चामला, रुपये 4,99,723/- भारसवाडा रुपये 5,02,215/-, सिंदीविहिर रुपये 5,09,391/- या ग्रामपंचायतीला देण्यांत आले आहे. व त्याचे एकुण मुल्यांकंन रक्कम रुपये 12,50,000/- करण्यांत आले आहे.

1) भारत सरकार प्राप्तीकर कायदा 1961 कलम 194 नुसार कंत्राटदाराच्या देयकातून कामाच्या मुल्यांकनावर 2 टक्के आयकर व 15 टक्के सरचार्ज कपात करणे आवश्यक आहे. पण कपात करण्यात आलेली नाही. 2 टक्के आयकर व 15 टकके सरचार्ज ची एकूण रक्कम रूपये 28,750/- वसुलीची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम, 2002 नुसार असाधारण क्रमांक 22, विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अधिसूचना क्र. विसआ (मुख्य)1/मूवक/2005/97, दिनांक 4 /04/2012 अन्वये कपात करणे आवश्यक आहे. पण कपात करण्यात आलेली नाही. 5% मुल्यवर्धीत कराची एकूण रक्कम रूपये 62,500/- वसुलीची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

3) उप विमा संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र. 2305 दिनांक 04/03/2005 अन्वये कामाच्या मुल्यांकनाच्या 1 टक्के रक्कम कपात करणे आवश्यक आहे. पण कपात करण्यात आलेली नाही. 1% विम्याची रक्कम रूपये 12,500/- वसुलीची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक बीसीए 2007/प्र.क्र.788/कामगार 7(अ) मंत्रालय, मुंबई दिनांक 26/10/2009 नुसार कामगार कल्याण उपकर निधी 1% कपात करणे आवश्यक असतांना कपात करण्यात आलेली नाही. 1% कामगार कल्याण निधीची एकूण रक्कम रूपये 12,500/- वसुलीची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

5) कामाचे देयकासोबत पुर्णत्वाचा दाखला, मोजमाप पुस्तकाची छायाप्रत, आदेशाची प्रत, वापरलेल्या साहित्याचा गुणवत्ता चाचणी अहवाल, अंदाजपत्रक वगैरे अनुषंगीक आवश्यक दस्तऐवज जोडण्यात आलेले नसतांना देयक मंजूर करण्यात आलेले आहे.

6) उपरोक्त नमुद चार कामाची प्रमाणक तपासण्यात आलेले असून सदर कामाचे दस्तऐवजाची मागणी करूनही लेखापरिक्षणास सादर केले नाही.

### 4.225 सिमेंट रोड, पिंडकेपार बांधकामातील अनियमिततेबाबत.

**पंचायत समिती तिरोडा, जिल्हा गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती तिरोडा, सन 2014-2015 ग्रामपंचायत पिंडकेपार येथील सिमेंट रोड बांधकामाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामात बाब क्रमांक 3 मध्ये लिड ज्यादा दर्शविल्यामुळे रूपये 11,605 व बाब क्रमांक 4 मध्ये लिड ज्यादा दर्शविल्यामुळे रूपये 15,476/- असे एकूण रूपये 27,081/- ज्यादा प्रदानामुळे शासन अनुदानाचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे नुकसानाची रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

2) फलकावरची माहिती अचूक नाही,

3) कामाचे प्रगती नुसार मोजमापे घेण्यात आली नाहीत.

4) मोजमापे घेतांना दिनांकित स्वाक्षरी नाही.

**4.226 बांधकामाचे देयकातुन आयकराची रक्कम कपात न करणेबाबत.**

**पंचायत समिती सालेकसा, जिल्हा गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती सालेकसा अंतर्गत केलेल्या बांधकामाच्या प्रदानातुन आयकर रकमेची कपात केलेली नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर 1007/प्र.क्र.105/कोषाप्र-5,/मंत्रालय, मुंबई, दिनांक 22/02/2008 तसेच आयकर कायदा 1961 चे कलम 194(सी) प्रमाणे बांधकामाच्या देयकातुन 2 टक्के आयकर कपात करणे आवश्यक असतांना आयकराची रक्कम कपात न केल्यामुळे रुपये 29,360/- इतके शासन महसुलाचे नुकसान झालेले आहे.

**4.227 दलितवस्ती सुधार योजनेअंतर्गत झालेल्या बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती सालेकसा, जिल्हा गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती, सालेकसाचे सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत झालेल्या बांधकामातुन आयकर रक्कम कपात केलेली नाही व रॉयल्टीच्या रक्कमेची कमी कपात करण्यात आल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक 22/02/2008 व आयकर कायदा 1961 चे कलम 194 (सी) प्रमाणे बांधकामाचे देयकातुन 2 टक्के आयकराची रक्कम रुपये 12,017/- ची वसुली होणे आवश्यक आहे.

2) रॉयल्टीची रक्कम रुपये 3,600/- वसुल करणे आवश्यक आहे.

3) कामाचे पुर्णत्वाचे प्रमाणपत्र नाही.

4) कामाचे प्रगती नुसार मोजमापे घेण्यात आलेली नाही.

5) मोजमापे घेतांना दिनांकित स्वाक्षरी नाही.

**4.228 ग्रामपंचायत भवन बांधकाम, बोरगांव**

**पंचायत समिती ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** ग्रामपंचायत भवन बांधकाम बोरगांवकरीता जिल्हा वार्षिक योजनेमधुन रुपये 5,00,000/- खर्च केलेला आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामगार कल्याण उपकर 1 टक्के रुपये 5,000/- व कामगार विमा 1 टक्के रुपये 5,000/- कपात केलेला नाही.

2) रॉयल्टी रक्कम प्रती ब्रॉस रुपये 200/- प्रमाणे कपात केली नाही.

3) आयकर अधिनियम 1961 चे सी नुसार 2 टक्के प्रमाणे रुपये 1,000/- आयकर कपात केला नाही.

4) व्हॅट अधिनियम 2002 'शेड्युल सी' नुसार 5 टक्के रुपये 25,000/- व्हॅट कपात केलेला नाही.

5) कार्यारंभ आदेश दिलेला नाही. सुरक्षा अनामत रक्कम जमा केली नाही.

6) काम पुर्णत्वाच्या प्रमाणपत्रावर, काम केव्हा पुर्ण झाले ही नोंद नाही. सन 2011-12 मधील सुरु झालेल्या कामाचे 2014-2015 मध्ये रक्कम प्रदान करणे संशयास्पद असुन सबंधीत कंत्राटदारावर दंड आकारणे आवश्यक आहे.

**4.229 सिमेंट कॉंक्रीट नाली बांधकाम गोविंदपूर.**

**पंचायत समिती नागभिड, जिल्हा चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** 13 वा वित्त आयोग पंचायत समिती स्तरमधून सिमेंट कॉक्रीट नाली बांधकाम ग्रामपंचायत, गोविंदपूरकरीता रुपये 3,74,500/- खर्च केलेला आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामगार कल्याण उपकर 1 टक्के रुपये 3,745/- कपात केले केलेला नाही.

2) कामगार विमा 1 टक्के रुपये 3,745/- कपात केला नाही.

3) मुल्यांकन नोंदवहीतील रॉयल्टी रक्कम रुपये 6,675/- शासन लेखाशिर्षात जमा केलेली नाही.

4) व्हॅट अधिनियम 2002 'शेडुल्ड सी' नुसार 5 टक्के व्हॅट कपात केलेला नाही.

5) आयकर अधिनियम 1961 चे 194 सी नुसार 2 टक्के आयकर रुपये 7,490/- कपात केलेला नाही.

6) सुरक्षा अनामत घेतली नाही. काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध नाही.

**4.230 जिल्हा क्रिडा कार्यालयाकडून मैदान सपाटीकरण व क्रिडांगण तयार करणे. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, बैलमपूर.**

**पंचायत समिती राजुरा, जिल्हा चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती, राजुरा अंतर्गत बांधकाम विभागाचे प्रमाणकांची तपासणी केली असता जिल्हा परीषद उच्च प्राथमिक शाळा, बैलमपूर या शाळेला मैदान सपाटीकरण व क्रिडांगण तयार करणेकरीता जिल्हा क्रिडा कार्यालयाकडून रक्कम रुपये 2,00,000/- चे अनुदान प्राप्त झाले असून त्यानूसार सदर शाळेने एकूण 6 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 1,46,600/- खर्च नोंदवुन रक्कम पुरवठादारास प्रदान केली.

1) सदर बांधकामावर झालेल्या खर्चाचे प्राकलन, मोजमाप पुस्तक, मुल्यांकन व काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र सदर शाळेने सादर करणे किंवा सदर अभिलेखे ठेवणे आवश्यक असतांना ते ठेवल्याचे लेखापरीक्षणात आढळून आले नाही.

2) पुरवठादाराने सादर कलेली देयके इस्टीमेट देयके असल्याने मुळ देयकाशिवाय खर्च लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

**4.231 अंगणवाडी इमारत बांधकाम, अंतरगाव**

**पंचायत समिती सावली, जिल्हा चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत अंगणवाडी इमारत बांधकाम अंतरगावकरीता रुपये 4,33,268/- खर्च झालेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामाचा करारनामा, आदेश, कामाची पुर्णत्वाची मुदत उपलब्ध नाही.

2) कामाच्या देयकातुन गौण खनिजावरील रॉयल्टीची रक्कम रुपये 7,969/- कपात करण्यात आलेली आहे. मात्र आयकर अधिनियम 1961 चे कलम 206 नुसार गौण खनिज रकमेवर 2 टक्के (Tax Collection Source) म्हणुन कपात करुन आयकर शिर्षात जमा करावयाची आहे. परंतु उपरोक्त देयकातुन कपात केलेल्या रॉयल्टीवरील रकमेनुसार (Tax Collection Source) ची रक्कम कपात न केल्याने शासनाचे नुकसान झालेले आहे. तरी रक्कम रुपये 159/- वसुल करुन आयकर शिर्षात जमा करणे आवश्यक आहे.

3) देयकातून आयकरावरील सरचार्ज रुपये 1,040/- कपात केले नाही.

4) मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही.

**4.232 13 वा वित्त आयोगाअंतर्गत बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती कोरपना, जिल्हा चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती कोरपना यांनी शासकीय निधीमधुन विविध बांधकामावर रुपये 39,456/- इतका खर्च नोंदविलेला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकराबाबत महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2009/प्र.क्र.123/पं.रा.-7, दिनांक 30/10/2009 अन्वये बांधकामाच्या देयकातुन रुपये 39,456/- संबंधित कंत्राटदाराकडुन वसुल करुन योग्य शिर्षात जमा करणे आवश्यक असतांना सर्व कामात अशी कार्यवाही केलेली दिसुन येत नाही.

2) साहित्य तपासणी महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट-1099/प्र.क्र.56/35,दिनांक 30/06/2000 अन्वये बांधकामासाठी वापरण्यात आलेले सिमेंट साहित्य वापरण्यापुर्वी शासकीय प्रयोगशाळेतुन चाचणी करुन घेतली नाही. त्यामुळे बांधकाम साहित्याचा दर्जा व गुणवत्तेबाबत खात्री करता आली नाही.

3) करारनामा स्विकृत स्वाक्षरीबाबत महाराष्ट्र शासन, जिल्हा परिषद/पंचायत समिती लेखासहिंता 1968 चे नियम 136 नुसार कामाच्या अमंलबाजावणीच्या करार व नियम 146 नुसार कामाचे करारपत्र स्टॅम्पपेपरवर करावयाचा आहे. उपरोक्त प्रकरणात रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नस्तीस जोडुन आहे. परंतु स्टॅम्प कोराच असुन लिहीलेला नाही.

4) काम पुर्ण झाल्याचे फोटो नस्तीसोबत जोडण्यात आल्याचे लेखापरीक्षणात आढळुन आले नाहीत. तसेच काम सुरु असतांना सदरचे काम 13 वा वित्त आयोगाकडुन केले जात असलेबाबत माहिती फलक लावावयाचे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसुन आले नाही.

**4.233 सिमेंट कॉंक्रीट रोड बांधकाम क्रमांक 6, विसापुर ग्रामपंचायत, विसापूर**

**पंचायत समिती बल्लारपुर, जिल्हा चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 46) -** पंचायत समिती, बल्लारपुर अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रोड बांधकाम क्रमांक 6, विसापूर या कामावर ग्राम विकास कार्यक्रम योजनेअंतर्गत रुपये 1,70,000/- प्रथम अग्रिम, प्रमाणक क्रमांक 464, दिनांक 30/10/2014 अन्वये 1,00,000/- द्वितीय अग्रिम व प्रमाणक क्रमांक 825, दिनांक 21/01/2015 अन्वये रुपये 1,13,352/- तिसरे अग्रिम असे एकुण रुपये 3,83,352/- इतका निव्वळ खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एकुण कामाच्या मुल्यांकनानुसार सिमेंटची टेस्टींग ही 7 सेटची असणे आवश्यक असतांना 4 सेटचे तपासणी अहवाल घेतले आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 2009/ प्र.क्र.180/प.रा.8, दिनांक 03/08/2009 नुसार काम पुर्ण झालेबाबत फलक लावलेला नाही.

3) कामाच्या देयकातून आयकर, सरचार्ज, शिक्षण कराची रक्कम रुपये 9,799/- आयकर खाती जमा करावी.

**4.234 सिमेंट कॉंक्रीट रोड बांधकाम क्रमांक 2, विसापुर ग्रामपंचायत, विसापुर.**

**पंचायत समिती बल्लारपुर, जिल्हा चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 51) -** पंचायत समिती, बल्लारपुर अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रोड बांधकाम क्रमांक 2 विसापुर या कामावर ग्राम विकास कार्यक्रम योजने अंतर्गत रुपये 1,70,000/- प्रथम अग्रिम, प्रमाणक क्रमांक 648, दिनांक 30/10/2014 अन्वये 1,00,000/- द्वितीय अग्रिम व प्रमाणक क्रमांक 824, दिनांक 21/01/2015 अन्वये रुपये 80,579/- तिसरे अग्रिम असे एकुण रुपये 3,45,579/- इतका निव्वळ खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एकुण कामाच्या मुल्यांकनानुसार सिमेंटची टेस्टींग ही 7 सेटची असणे आवश्यक असतांना 4 सेटचे तपासणी अहवाल घेतले आहे.

2) आयकर अधिनियम 1961 च्या कलम 206 नुसार गौण खनिज रक्कम रुपये 12,184/- च्या 2 टक्के रुपये 231/- वसुल करुन लेखा शिर्षात जमा करावे.

3) कामाच्या देयकातून आयकर, सरचार्जशिक्षण कराची रक्कम रुपये 8,832/- वसुल करुन आयकर खाती जमा करावी.

**4.235 ग्रामपंचायत ठाकुरनगर येथे अंतर्गत रस्ता कामाबाबत.**

**पंचायत समिती चामोर्शी, जिल्हा गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदर कामावर एकुण रूपये 1,49,863/- एवढा खर्च झालेला आहे. यामधुन शासकीय व इतर कपाती वजा जाता उपरोक्त खर्चाचे प्रमाणकान्वये निव्वळ रूपये 80,247/- ग्रामपंचायतला प्रदान करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाकरीता एकुण 179.59 घनमीटर मुरूम वापरण्यात आला. पुरवठा केलेले गौण खनिज साहित्य एकुण 179.59 घनमीटर बाबत महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि-1088/433/3592ख, दिनांक 18 ऑक्टोंबर 2001 मधील तरतुदीनुसार स्वामीत्वधन (Royalty) मोकळे केल्याचे प्रमाणपत्र जिल्हाधिकारी/तहसीलदार कार्यालयातुन प्राप्त करून पंचायत समितीला सादर केलेले नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक गौख-10/1009/प्र.क्र.309ख,दिनांक 11/02/20010 प्रमाणे प्रति ब्रास रूपये 200/- (प्रति घनमीटर 70.60) प्रमाणे स्वामीत्वधनाची रक्कम कपात करून महसुल विभागाकडे जमा करणेबाबत सुचना असतांना सदर कामाकरीता वापरण्यात आलेले 179.59 घनमीटर गौण खनिज साहित्याचे प्रति घनमीटर 70 रूपये 60 पैसे प्रमाणे रूपये 12,679/- पुरवठादाराचे बिलातुन कपात करून महसुल विभागाकडे जमा करणे आवश्यक ठरते. सदर शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

**4.236 पुरवठादार यांना जादा रक्कम प्रदान करणेबाबत.**

**पंचायत समिती सिरोंचा, जिल्हा गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदर कामावर एकुण रूपये 3,26,481/- एवढा खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रमाणक क्रमांक 6 दिनांक 03/07/2014 अन्वये श्री.राजन्ना तोटा यांना साहित्य पुरवठा केल्याबाबत रूपये 91,176/- एवढी रक्कम प्रदान केली. परंतु पुरवठा केलेल्या साहित्याचे एकुण बिल रूपये 83,130/- एवढयाच रक्कमेचे आहे. (बिल क्रमांक 100 दिनांक 22/07/2014 रूपये 83,130/-) म्हणजे श्री.राजन्ना तोटा यांना साहित्याचे रूपये 83,130/- देय असतांना यांना रूपये 91,176/- प्रदान केल्यामुळे रूपये 8,046/- चे जादा प्रदान झाले. तसेच रेती 4 ब्रास प्रति ब्रास रुपये 1,500/- प्रमाणे रुपये 6,000/- बिलात हिशोबात घेणे ऐवजी रुपये 10,000/- घेणेत आल्यामुळे रुपये 4,000/- चे अतिप्रदान झालेले आहे. असे एकुण रुपये 12,046/- अतिप्रदान झालेले आहे.

2) श्री.राजन्ना तोटा यांनी बिल क्रमांक 100 दिनांक 02/07/2014 अन्वये पुरवठा केलेल्या साहित्य यामध्ये रेती 4 ब्रास प्रति ब्रास रूपये 1,500/- प्रमाणे एकुण रूपये 10,000/- दर्शविले व एवढयाच रक्कमेचे प्रदान झाले प्रत्यक्षात 4 ब्रास रेती प्रति ब्रास 1,500/- प्रमाणे रूपये 6,000/- बिलात हिशेबाबत घ्यावयला पाहिजे होते. परंतु रूपये 10,000/- हिशेबाबत घेतल्यामुळे रूपये 4,000/- पुरवठादारास (श्री.राजन्ना तोटा) जादा प्रदान झाले ( प्रमाणक क्रमांक 6 दिनांक 03/07/2014 बिल क्रमांक 100 दिनांक 03/07/2014 रूपये 83,130/- जादा प्रदान रक्कम रूपये 4,000/- लेखापरिक्षणास मान्य नसुन वसुलपात्र ठरते.

**4.237 मुलभूत सुविधा योजने अंतर्गत केलेल्या कामाबाबत.**

**पंचायत समिती औरंगाबाद, जिल्हा औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती औरंगाबाद यांनी मुलभुत सुविधे अंतर्गत केलेल्या विविध बांधकामावर रूपये 3,33,577/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामाबाबतच्या करारनाम्यावर साक्षीदाराच्या सहया नसुन त्यावर दिनांक नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार व शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग पत्र क्रमांक सिमेंट /साहित्य /1099 / प्र.क्र.56, दिनांक 30/06/2000 नुसार वापरलेल्या साहित्याची प्रयोगशाळेतील चाचणी अहवाल जोडलेला नाही.

3) सार्वजनिक बांधकाम नियमावली 1984 मधील परीशिष्ट 24 (13 व 15) नुसार मोजमाप नोंदी लालशाईने क्रॉस केलेल्या नाही.

4) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जि.प.-2009/प्र.क्र.180/प.रा.-8, दिनांक 31/12/2009 अन्वये कामाची माहिती दर्शविणारा फलक बसविलेला नाही.

5) महाराष्ट्र शासन विक्रीकर विभाग अधिसुचना दिनांक 04/04/2012 नुसार देयकातुन 5 टक्के मुल्यवर्धीत कराची कपात केलेली नाही.

6) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) अन्वये 2.24 टक्के आयकर कपात न करता रूपये 1,359/- कमी कपात केले आहे.

7) कपात रक्कमा नोंदवहीत नोंदवुन भरणा केल्याचे पोंच पावत्या दर्शविल्या नाहीत.

8) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परीशिष्ट 24 मधील 12 नुसार नोंद केलेली मापावर कंत्राटदाराची स्वाक्षरी घेतलेली नाही.

**4.238 13 वा वित्त आयोग अंतर्गत केलेल्या कामाबाबत**

**पंचायत समिती खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती खुलताबाद यांनी 13 वा वित्त आयोगातुन सिमेंट रस्ता कामावर रूपये 33,73,965/- चा नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कंत्राटदाराकडुन 5 टक्के मुल्यवर्धित कराची रक्कम रुपये 1,68,695/- कपात करणे आवश्यक आहे. ती केलेली नाही.

2) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) अन्वये 2 टक्के दराने आयकर रूपये 67,478/- कपात केलेला नाही.

3) विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र दिनांक 02/06/2003 नुसार देयकातुन 1 टक्के विमा रक्कम रूपये 33,739/- कपात केलेली नाही.

4) बांधकामावर वापरलेल्या साहित्याची शासकिय प्रयोगशाळेतुन गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त करुन अंतीम देयकासोबत सादर केलेला नाही.

5) कामाच्या जागी शासन निर्णयाप्रमाणे विहीत प्रपत्र कामाची माहिती दर्शविणारा फलक लावलेला नाही. तसेच नियमानुसार एका कामास एक स्वतंत्र मोजमाप पुस्तिका ठेवलेली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार नमुना 23 कामाची प्रगती नोंदवही ठेवलेली नाही.

**4.239 श्री.डी.एम.व्यवहारे, कनिष्ठ अभियंता व श्री.आर.ए.शहा, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक यांना अतिप्रदानाबाबत.**

**पंचायत समिती वैजापुर, जिल्हा औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 30) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) श्री.डी.एम.व्यवहारे, कनिष्ठ अभियंता, यांचे दिनांक 20/05/1999 पासुन स्थापत्य अभियांत्रिकी सहायक पदावर समायोजन असुन दिनांक 20/05/1999 पासुन रूपये 4,000/- वेतन निश्चिती होणे आवश्यक असतांना दिनांक 01/03/21999 रोजी वेतन निश्चिती केल्याने प्रत्येक वर्षी दोन महिने अगोदर वेतनवाढ दिल्याने अतिप्रदान झालेले आहे. तसेच व्यवसायीक परिक्षा पास नसतांना दिनांक 17/11/2015 ला कनिष्ठ अभियंता पदी पदोन्नती दिलेली आहे.

2) श्री.आर.ए.शहा, हे एम.एस.सी.आय.टी. पास नाहीत. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.भाखस/नस्ती/04/324/39, दिनांक 05/05/2007 नुसार दिनांक 31/12/2007 पर्यंत परीक्षा उत्तीर्ण झाले नाही त्यांचे वेतनवाढ रोखावयाच्या आहेत. 6 वा वेतन आयोग फरक विवरणपत्र सादर न केल्याने अतिप्रदान रककम परिगणित करता आली नाही.

**4.240 अंगणवाडी बांधकाम अंतर्गत केलेल्या कामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती सोयगाव, जिल्हा औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 54) -** पंचायत समिती सोयगाव यांनी अंगणवाडी बांधकामावर रूपये 16,16,169/- चा खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामपंचायतींना देण्यात आलेल्या कामाच्या निविदा घेतल्या नाही. तसेच कार्यारंभ आदेश कामाची मुदत काम पुर्ण झाल्याचा अहवाल संचिकेत नाही.

2) शासन निर्णय क्रंमाक स्थाविका/2003/का-1445/का-144, दिनांक 28/11/2003 नुसार 20,000/- वरील कामाच्या माहितीचे फलक लावणे आवश्यक असतांना लावले नाही.

3) काम पुर्णत्वाच्या प्रमाणपत्रावर काम पुर्णत्वाचा दिनांक नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार कामावर वापरलेल्या साहित्याची शासकिय प्रयोगशाळेतुन चाचणी केल्याचा अहवाल देयकासोबत न जोडता देयके पारीत केली आहे.

5) शासन नियमाप्रमाणे 2.24 आयकर विक्रीकर कपात केलेली नाही.

6) सार्वजनिक बांधकाम नियमावली 1984 मधील परिशिष्ट 24 (13 व 15) नुसार मोजमाप नोंदी प्रदानाच्या वेळेस लाल शाईने क्रॉस केलेले नाही.

7) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.झेडपीए-2000/प्र.क्र./44/33, दिनांक 22/12/2000 सुचना नुसार एका कामासाठी एक मोजमाप पुस्तिका ठेवण्यात यावी परंतु येथे एकाच मोजमाप पुस्तिकेत अनेक कामाच्या नोंदी घेतल्या आहेत.

8) कामगार विमा निधी 1 टक्का रक्कम देयकातुन कपात करुन धनाकर्ष संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडे भरणा केलेला नाही.

9) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 20 व 50 नुसार संबंधित इसमास रक्कम प्राप्त झाल्याची पोंच घेतली नाही.

**4.241 13 वा वित्त आयोग अंतर्गत केलेल्या कामाबाबत.**

**पंचायत समिती फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती फुलंब्री यांनी 13 वा वित्त आयोग अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ता, स्मशान भुमी रोड, अंगणवाडी इमारत बांधकामावर 13 वा वित्त आयोग अंतर्गत रुपये 9,79,876/- चा निधी खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन विक्रीकर विभाग अधिसुचना दिनांक 04/04/2014 नुसार कंत्राटदाराचे देयकातुन 2 टक्का मुल्यवर्धीत कराची कपात केलेली नाही. रुपये 5,079/- वसुल करावे.

2) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास/109/प्र.क्र.2/98/शासन हमी दि.19/08/1998 नुसार कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच विमा संचालनालय यांचे दिनांक 02/06/2003 नुसार देयकातुन 1 टक्का प्रमाणे विमा रक्कम कपात केलेली नाही. ती रूपये 3,739/- कपात करुन भरणा करावी.

3) नोंदणीकृत कंत्राटदाराचे देयकातुन 5 टक्के मुल्यवर्धित कराची कपात दिलेली नाही.

4) वापरलेल्या साहित्याची शासकिय प्रयोगशाळेतुन गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त केल्याचे देयकासोबत जोडलेले नाही.

5) कामगार कल्याण उपकर रूपये 1,200/- वसुल करुन कामगार कल्याण मंडळाकडे जमा केलेले नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 147 अन्वये नमुना नंबर 48 करारनामा नोंदवही ठेवलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 180 प्रमाणे मोजमापे प्रदानानंतर लाल शाईने रेषा मारलेल्या नाही.

7) प्रत्येक कामाचे जागी विहीत माहिती दर्शविणारा फलक बसविलेला नाही.

8) प्रत्येक कामाची स्वतंत्र मोजमाप नोंदवही ठेवलेली नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार नमुना 23 मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवलेली नाही. पुर्ण झालेल्या कामाची नमुना 39 व 69 मध्ये नोंद घेतलेली नाही.

10) कामाच्या स्वामित्वधन विमा व उपकर कपातीच्या रक्कमांची नोंदवहीत नोंद घेवून भरणा केल्याच्या नोंदी दर्शविल्या नाही.

11) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ट 24 मधील नियम 12 नुसार मोजमापे स्विकारल्याचे कंत्राटदाराचे स्वाक्षरी मोजमाप पुस्तिकेत घेतलेली नाही.

**4.242 चनेगाव ते धामनगाव खडी रस्ता दुरूस्ती इजिमा 178 0/00ते 1/500 (राज्य क्षेत्र निधी)**

**पंचायत समिती बदनापुर, जिल्हा जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 147 नमुना नंबर 48 मध्ये करारनामा नोंद घेणेत आलेली नाही.

2) देयकावर कंत्राटदार यांची महसूल मुद्रांक लावून स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

3) या कामाची संचिका देयक मंजूरी करताना लेखा शाखेचा अभिप्राय न घेता गट विकास अधिकारी यांच्याकडे पाठविले जाते.

4) शासन निर्णय क्रमांक गौखनि10/0206/प्र.क्र.-57 ख, दिनांक 11/02/2010 नुसार प्रति घनमीटर रूपये 70.67 प्रमाणे वापरलेल्या गौणखनीजावर स्वामीत्वधन वसूल करणे आवश्यक आसतांना या कामावर वापरलेल्या गौणखनीजावर स्वामीत्वधन देयकात वसूल करण्यात आलेले नाही. तरी रूपये 53,214/- कमी कपात केलेली गौणखनीज स्वामीत्वधनाची रक्कम वसुल करून गौणखनीज स्वामीत्वधन खाती भरणा करावी.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 144 सुरक्षा ठेव अनामत देयकातून कपात करणे आवश्यक आसतांना अशी कपात करण्यात आलेली नाही.

6) मोजमापे मान्य असले बाबत ठेकेदाराची मोजमाप पुस्तीकेवर स्वाक्षरी नाही.

7) पुर्ण झालेल्या कामाची नोंद महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 चे नियम 97 नुसार नमुना नंबर 40 मध्ये व नियम 197 नुसार नमुना नंबर 69 मध्ये घेतली नाही.

**4.243 काम अपुर्ण असल्याने झालेल्या निष्फळ खर्चाबाबत.**

**पंचायत समिती माजलगाव, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती माजलगाव यांनी बांधकाम विभागाने अंगणवाडी बांधकाम, दलित वस्ती विकास योजना, जिल्हा वार्षिक योजना (मुलभुत सुविधा दहन व दफन भुमी) इत्यादीची कामे अपुर्ण ठेवल्यामुळे अपुर्ण कामामध्ये रुपये 39,26,000/- इतका निधी अडकुन पडला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, माजलगांव सन 2014-2015 च्या लेखापरीक्षणास सन 2009-10 ते 2014- 2015 अखेर एकुण अंगणवाडी केंद्र बांधकाम मंजुर कामे 99 असुन त्यातील 71 कामे पुर्ण झालेली आहेत. व 28 कामे अपुर्ण आहेत. त्यावर रुपये 39.26 लक्ष खर्च करण्यात आलेला आहे. कामे वेळेत पुर्ण न झाल्याने शासनाकडुन प्राप्त झालेला निधी गुंतुन राहिला आहे.

2) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण -1002/प्र.क्र.128/अर्थोपाय/ दिनांक 06/06/2008 अन्वये एका आर्थिक वर्षातील अखर्चित निधी शासनाकडे परत करणे आवश्यक आहे परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र..446/ वित्त-9 दिनांक 20/06/2000 चे परिशिष्ट-2 जिल्हा परिषदाकडील (बांधकाम विभाग) योजनांबाबत परिशिष्ट क प्रमाणे वेळापत्रक विहित करुन प्रत्येक टप्प्याची कार्यवाही पुर्ण करावी. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

**4.244 13 वा वित्त आयोगातून सौरपंप खरेदी करण्यावरील नियमबाह्य खर्चाबाबत.**

**पंचायत समिती माजलगाव, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** रुपये 2,10,000/- ग्रामपंचायत टालेवाडी करीता सौरपंप खरेदीवर खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय क्र ते वि आ/2010 प्र.क्र.22/वित्त 4 दिनांक 30/08/2010 अन्वये 13 वा वित्त आयोगात सौरपंप खरेदी बाबतचे निर्देश दिलेले नाहीत त्यामुळे सौरपंप खरेदिचे रुपये 2,10,000 -/लेखापरिक्षणात मान्य करता येत नाहीत.

2) पंचायत समिती, माजलगांवने सौरपंप बसविण्याबाबत ग्लोबल सोलर वॉटर सोल्युशन बीड यांचे नावे धनादेश देण्यात आला आहे. सदर निविदा प्रक्रिया ग्रामपंचायतीने केली असल्यामुळे पंचायत समिती, माजलगाव यांनी सदर धनादेश संबंधित ग्रामपंचायतींना देणे आवश्यक होते. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक: भाखंस 1088/2512/उद्योग 6 दिनांक 2 जानेवारी 1992 नुसार 50,000/- पुढील साहित्य खरेदी जाहीर निविदा मागवुन करणे बंधनकारक आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1971 चे नुसार प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी घेतलेली नाही, तसेच गुणवत्ता अहवाल उपलब्ध झाला नाही.

**4.245 विविध बांधकामातुन आयकर मुल्यवर्धित कर विमा उपकर कमी कपाती करणेबाबत.**

**पंचायत समिती माजलगाव, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती, माजलगाव सन 2014-2015 च्या लेखापरिक्षणात बांधकाम विभागाच्या देयकामधुन आयकर, व्हॅट, विमा व उपकर इत्यादी शासकीय कपाती केलेल्या नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्रमांक बीसीए-12007/प्र.क्र.788/ कामगार 7 दिनांक 21 एप्रिल 2008 नुसार रक्कम रुपये 3,80,835/- कमी कपात करण्यात आलेले आहेत. सदर रक्कम संबंधीतांकडुन वसुलपात्र ठरते.

2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विमास/1098-प्र.क्र./शासन हमी/ 2889/ दिनांक 19/08/1998 अन्वये 1% कामगार विमा रुपये 2,85,370/- कमी कपात करण्यात आलेला आहे. सदर रक्कम संबंधीतांकडुन वसुलपात्र ठरते.

3) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक 05/05/2012 अन्वये मुल्यवर्धित कर 5 टक्के कपात करणे आवश्यक असताना रुपये 25,15,542/- कमी कपात करण्यात आलेला आहे. सदर रक्कम संबंधीतांकडुन वसुलपात्र ठरते.

4) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार 2% आयकर कपात करणे आवश्यक असताना रुपये 3,80,835/- कमी कपात करण्यात आलेला आहे. सदर रक्कम संबंधीतांकडुन वसुलपात्र ठरते.

5) आयकर, विमा, उपकर व मुल्यवर्धित कर शासन खाती भरणा केल्याच्या चलन/पावत्या उपलब्ध केलेल्या नाहीत. सदर रक्कम संबंधीतांकडुन वसुलपात्र ठरते.

**4.246 बांधकाम देयकामधुन विहित शासकीय कपाती न करणेबाबत.**

**पंचायत समिती अंबाजोगाई, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 21) -** पंचायत समिती अंबाजोगाई सन 2014-2015 च्या लेखापरीक्षणात बांधकामाच्या देयकातुन बांधकाम उपकर, विमा, आयकर, व्हॅट कपात केलेले नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्रमांक बीसीए-12007/प्र.क्र.788/ कामगार 7 दिनांक 21 एप्रिल 2008 नुसार 1% बांधकाम उपकर रुपये 11,25,839/- कपात करण्यात आलेला नाही. सदर रक्कम संबंधीतांकडुन वसुलपात्र ठरते.

2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विमास/1098-प्र.क्र./शासन हमी/ 2889/ दिनांक 19/08/1998 अन्वये 1% कामगार विमा रुपये 11,25,839 /- कपात करण्यात आलेला नाही. सदर रक्कम संबंधीतांकडुन वसुलपात्र ठरते.

3) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार 2% आयकराची रक्कम रुपये 22, 51,678/- कपात केलेली नाही. सदर रक्कम संबंधीतांकडुन वसुलपात्र ठरते.

4) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक 05/05/2012 अन्वये 5% व्हॅट ची रक्कम 56,29,199/- कपात करण्यात आलेली नाही. सदर रक्कम संबंधीतांकडुन वसुलपात्र ठरते.

**4.247 काम अपुर्ण असल्याने झालेल्या निष्फळ खर्चाबाबत.**

**पंचायत समिती केज, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती केज यांनी एकुण 24 अपुर्ण कामावर रुपये 73.95 लक्ष खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती केज अंतर्गत सन 2009-2010 ते 2014-2015 अखेर अंगणवाडी केंद्र बांधकाम एकुण मंजुर कामे 99 असुन त्यातील 75 कामे पुर्ण झालेली आहेत व 24 कामे अपुर्ण आहेत. अपुर्ण कामावर एकुण रुपये 73.95 लक्ष इतका खर्च नोंदविण्यात आला आहे. कामे विहित वेळेत पुर्ण न केल्यामुळे शासनाकडुन प्राप्त निधी सदर कामावर नाहक गुंतुन पडल्यामुळे अपुर्ण कामावर झालेला खर्च निष्फळ ठरत आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 95(2) (ड) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या सर्व कामांचे व विकास योजनांचे कार्यान्वयन करण्यासाठी आवश्यक उपायोजना करणे आवश्यक आहे.

3) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 1002/प्र.क्र.128/आर्थोपाय/दिनांक 06/06/2008 प्रमाणे एका आर्थिक वर्षामध्ये मुक्त केलेला निधी पुढील एका आर्थिक वर्षात वापरता येईल परंतु वर्षनिहाय निधीचा हिशोब ठेवलेला नाही. त्यामुळे अखर्चित निधी कळू शकलेला नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधासरण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपिए 2008/प्र.क्र.446/वित्त्-9 दिनांक 20/06/2000 चे परिच्छेद 2 जिल्हा परिषदाकडील (बांधकाम विभाग) योजना बाबत परिशिष्ट क प्रमाणे वेळापत्रक विहित केले आहे. तथापि सन 2009-2010, 2010-2011, 2011-2012, 2012-2013, 2013-2014 मधील प्राप्त अनुदान कामावर पुर्णत: खर्च न झाल्याने व कामे अपुर्ण असल्याने योजना सफल झाली नसल्याचे दिसते.

**4.248 बांधकाम देयकातुन विहित शासकीय कपाती न केलेबाबत.**

**पंचायत समिती केज, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती केज बांधकाम विभागाकडून झालेल्या कामावर बांधकाम देयकातुन कामगार विमा, बांधकाम उपकर, आयकर, व्हॅट कपात करणेत आलेला नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विमास 109/प्र.क्र.2/98 दिनांक 19/08/1998 नुसार कंत्राटदारास कंत्राटी कामापोटी देय रक्कम प्रदान करण्यापूर्वी कंत्राटदाराने विमा शासकीय विमा कंपनीकडे 1 टक्का विमा भरणे आवश्यक होते, परंतु विमा भरला नसल्यामुळे 1 टक्के विम्याची रक्कम रुपये 62,732/- वसुलपात्र ठरते

2) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचे निर्णय क्र.बीसीए-788 प्र.क्र./12007 कामगार 7 दिनांक 21/04/2008 नुसार कामाचे मुल्यावर 1 टक्के बांधकाम उपकराची रक्कम कपात केली नसल्यामुळे उपकराची रक्कम रुपये 62,732/- वसुलपात्र ठरते.

3) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे दिनांक 04 मे 2012 च्या अधिसुचने नुसार मुल्यवर्धीत कर 5 टक्के कपात करणे आवश्यक आहे, 5 टक्के रक्कम कपात केली नसल्यामुळे रक्कम रुपये 8, 05,742/- वसुल पात्र ठरते..

4) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार कंत्राटदाराकडुन 2 टक्के आयकर कपात करणे आवश्यक आहे. कपात केली नसल्यामुळे आयकराची रक्कम रुपये 1, 97,934/- वसुलपात्र ठरते.

**4.249 अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध न करणेबाबत.**

**पंचायत समिती केज, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 32) -** पंचायत समिती केज सन 2014-2015 चे लेखापरिक्षणात बांधकाम विभागातील 13 वा वित्त आयोग, दलित वस्ती सुधार योजना, 2515 इतर ग्रामीण विकास /लोकप्रतिनिधीनी सुचविलेली कामे /अंगणवाडी बांधकामे पं.स. केज या कामांची संचिका, मुल्यांकन नोदंवही अर्धसमास पत्र क्रमांक 75 दिनांक 11/01/2016 अन्वये मागणी करुनही लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. 13 वा वित्त आयोग कामामध्ये रक्कम रुपये 38,35,455/-, अंगणवाडी बांधकामे रक्कम रुपये 20,40,000/-, 2515 मुलभुत सुविधा रक्कम रुपये 1,79,17,703/-, दलीत वस्ती सुधार योजना रक्कम रुपये 2,09,157/-, 2235 स्मशानभूमी रक्कम रुपये 50,97,000/- इतक्या रकमेचे देयके अदा केले आहेत परंतु सदरील बांधकामांचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

**4.250 बांधकाम देयकातून विहित शासकीय कपाती न करणेबाबत.**

**पंचायत समिती पाटोदा, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती पाटोदा यांनी सन 2014-2015 मध्ये अदा केलेल्या बांधकामाच्या देयकामधुन विहित शासकीय कपाती केलेल्या नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार कंत्राटदाराकडुन 2% दराने आयकर कपात करणे आवश्यक आहे, परंतु रक्कम रुपये 11, 11,781/- कमी कपात करण्यात आल्याचे दिसुन आले, तरी सदर रक्कम रुपये 11, 11,781/- संबंधीतांकडुन वसुलपात्र ठरते.

2) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक 04 मे 2012 च्या अधिसुचनेसार मुल्यवर्धीत कर हा 5 टक्के कपात करणे आवश्यक आहे, परंतु रक्कम रुपये 27, 65,452/- कमी कपात करण्यात आल्याचे दिसुन आले, तरी सदर रक्कम रुपये 27, 65,452/- संबंधीतांकडुन वसुलपात्र ठरते.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास/1098-प्र.क्र.2889 दिनांक 19 ऑगस्ट 1998 अन्वये 1% दराने कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे, परंतु रक्कम रुपये 5, 51,890/- कमी कपात करण्यात आल्याचे दिसुन आले, तरी सदर रक्कम रुपये 5, 51,890/- संबंधीतांकडुन वसुलपात्र ठरते.

4) उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्रमांक बीसीए-12007/प्र.क्र.788/कामगार 7 दिनांक 21/04/2008 नुसार 1 टक्के उपकर वसुल करणे आवश्यक आहे, परंतु रक्कम रुपये 5,37,890 /-कमी कपात करण्यात आल्याचे दिसुन आले, तरी सदर रक्कम रुपये 5, 37,890/- संबंधीतांकडुन वसुलपात्र ठरते.

**4.251 13 व्या वित्त आयोगाचे निधीचे देयके प्राप्त होण्यापुर्वी व देयकावर गटविकास अधिकारी यांची प्रदान आदेशावर स्वाक्षरी नसतांना धनादेश वितरीत केलेबाबत.**

**पंचायत समिती परळी, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती परळी यांनी 13वा वित्त आयोगातुन बोधेगाव ता. परळी येथील अंतर्गत रस्ता व नाली बांधकामावर रुपये 7,97,712/- खर्च नोंदविलेला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बोधेगांव अंतर्गत सिमेंट रस्ता या कामाची देयके दिनांक 31/03/2015 रोजी वरील प्रमाणक क्रमांक 22, 23 व 24 दिनांक 31/03/2015 अन्वये अदा करण्यात आलेली आहेत तथापि या कामाची मोजमापे मोजमाप पुस्तिका क्रमांक 220 मध्ये अनुक्रमे दिनांक 10/04/2015, दिनांक 11/04/2015 आणि 12/04/2015 रोजी नोंदविले आहेत. यावरुन मोजमाप पुस्तिकेत नोंदी होण्यापुर्वीच देयके पारीत केल्याचे दिसते.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 168 अन्वये उपअभियंता मोजमापाची संपुर्ण तपासणी तसेच उप अभियंत्यापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा प्राधिका-याकडून योग्यवेळी

प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. तसेच कार्यकारी अभियंता यांनी रुपये 50,000/- च्या प्रत्येक टप्प्यामध्ये कामाची 5 % तपासणी करणे आवश्यक आहे तथापि, अशी तपासणी केलेली नाही.

3) सदर कामे करण्यासाठी दिनांक 30/03/2015 रोजी ग्रामंपचायतीस कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असून काम पुर्ण होण्याअगोदरच देयके अदाई नियमबाहयपणे केलेली आहे. वरील कामे सिमेंट रस्ता व नाली बांधकामाची मंजुर असतांना वरील तिन्ही कामामध्ये अनुक्रमे रुपये 25,758/-, रुपये 42,931/- आणि रुपये 34,345/- एवढी नाली बांधकामासाठी अंदाजपत्रकीय तरतुद असतांना नालीचे काम न करता सदरील रक्कम रस्त्यावर नियमबाहयरित्या खर्च करण्यांत आलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 153 नुसार मंजुर अंदाजपत्रकाप्रमाणे काम करणे आवश्यक असतांना अशा प्रकारे कार्यवाही न करता उपरोक्त बाबी कार्यान्वीत केलेल्या नाहीत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 114 नुसार सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही न करता उपरोक्त देयकाचे नियमबाहय प्रदान केलेले आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार कामावार वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल न घेताच बांधकामाच्या देयकाची प्रदाने केली आहेत.

5) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक 04/05/2012 च्या अधिसुचनेनुसार मुल्यवर्धीत कर हा 5 टक्के कपात करणे आवश्यक आहे. परंतू सदर कामामध्ये मुल्यवर्धीत कर कमी कपात केलेला आहे. कमी कपातीची रुपये 39,886/- वसूल पात्र आहे.

### 4.252 13 वा वित्त आयोगांतर्गत कामातील अनियमितता.

**पंचायत समिती परळी, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती परळी यांनी 13 वा वित्त आयोगातुन परळी तालुक्यातील एकुण 23 रस्त्याच्या कामावर रुपये 55,82,175/- खर्च नोंदविलेला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 147 नुसार मंजुर करण्यात आलेल्या प्रत्येक कराराची नोंद नमुना नंबर 48 मधील नोंदवहीत नोंदविण्यात येईल तसेच कंत्राटदाराला वेळोवेळी दिलेल्या रकमेची नोंदी त्या नोंदवहीत करण्यात येईल, परंतु पंचायत समितीने अशी नोंदवही ठेवलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 148 प्रमाणे करारनाम्यात काम पुर्ण करण्याचा कालावधी नमूद केलेला नाही. शासन परिपत्रक क्रमांक सार्वजनिक बांधकाम विभाग संकीर्ण-2012/प्र.क्र.-467/रस्ते-1/ दिनांक 21/11/2011 नुसार दोष निवारण कालावधी 2 वर्षे केलेला आहे. सदर परिपत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे निविदेच्या कराराच्या कलमांतर्गत दोष दायित्वाचा अवधी नमूद केलेला नाही. त्यामूळे दोष दायित्व अवधी मध्येच कामाची दुरुस्ती पंचायत समितीने शासनाच्या निधीतुन केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 168 अन्वये उपअभियंता मोजमापाची संपुर्ण तपासणी तसेच उप अभियंत्यापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा प्राधिका-याकडून योग्य वेळी प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे तसेच कार्यकारी अभियंता यांनी रुपये 50,000/- च्या प्रत्येक टप्प्यामध्ये कामाची 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे तथापि, अशी तपासणी केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर-2009/ प्र.क्र.180/परा-8,दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी विहित प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारे फलक बसविले नाहीत.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार कामाची/योजनेची प्रगती नोंदवही नमुना नंबर 23 तसेच नियम 97 अन्वये नमुना नंबर 39 मध्ये स्थावर मालमत्ता नोंदवही, नमुना नंबर 40 रस्ते नोंदवही आणि नियम 197 नुसार पुर्ण केलेल्या कामाची नोंदवही नमुना नंबर 69 ठेवलेल्या नाहीत.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल घेणे आवश्यक आहे. तथापि, चाचणी अहवाल न घेताच बांधकामाचे देयके प्रदाने केली आहे.

7) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक 04/05/2012 च्या अधिसुचने नुसार मुल्यवर्धीत कर हा 5 टक्के कपात करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामामध्ये मुल्यवर्धीत कर कपात केलेला नाही. मुल्यवर्धीत कर कपातीची रुपये 2,70,759/- वसुलपात्र ठरते.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 51 (3) नुसार देयके प्राप्त झाल्यानंतर ती नमुना नंबर 12 बील नोंदवहीमध्ये ज्या क्रमाने ती मिळाले असतील त्या क्रमाने नोंदविणे आवश्यक परंतु देयकाच्या नोंदी नमुना नंबर 12 घेण्यात आल्या नाहीत.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 53 नुसार मंजुर प्राकलनानुसार कामे न करता विचलन आढळुन आले. मंजुर प्राकलनातील नाली खोदकाम व बांधकामासाठी मंजुर असलेली रक्कम रुपये 2,23,190/- मंजुर बाबीवर खर्च न करता रस्त्याच्या काँक्रीटचे जादा परिमाण करुन घेवून रुपये 1,96,566/- नियमबाहयरित्या खर्च केलेला आहे. सिमेंट काँक्रीट रस्ता व नाली बांधकाम हेळंब येथील कामावर देखील मंजुर प्राकलनामध्ये अंतर्भूत असलेले नाली बांधकाम अनुक्रमे रुपये 22,967/- व रुपये 12,879/- न करता सदरील बचतची रक्कम रस्त्यावर खर्च केलेली आहे. रस्ता व नाली बांधकाम धर्मापुरी येथील कामातील नाली बांधकामाचे मंजुर प्राकलनाप्रमाणे रुपये 46,360/- चे काम न करता सदरची रक्कम दुस-या बाबीवर खर्च करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 152(2) नुसार सदरील जादा कामास सक्षम तांत्रिक प्राधिका-याची मंजुरी घेतलेली नाही.

10) प्रमाणक क्रमांक 12, 13, 14, 15, 16 व 17 या प्रमाणकान्वये केलेल्या खर्चाचे अभिलेखे लेखापरीक्षणास मागणी करुन उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत.

11) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 20 अन्वये कंत्राटदाराची रक्कम प्राप्ती बाबत महसुल मुद्रांकीत पोच घेणे आवश्यक आहे.

12) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.-44/ 38, दिनांक 22/12/2000 नुसार प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मोजमाप पुस्तिका ठेवणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.

13) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 165 नुसार मोजमाप पुस्तिकाची नोंदवही नमुना नंबर 53 मध्ये ठेवला नाही.

14) मुंबई वित्तीय नियम 1959 चे नियम 35(ब) नुसार संवितरण अधिकारी प्रदानार्थ देयक पारीत करतांना त्यावर कामाचे पुर्ण नाव, खर्चाचे वर्गीकरण, देयकातील सर्व कपाती केल्या आहेत हे पाहण्यासाठी जबाबदार असेल, परंतु देयकावर संपुर्ण तपशिल नोंदवलेला नाही.

**4.253 बांधकामातील विहित शासकीय कपाती न करणेबाबत**.

**पंचायत समिती वडवणी, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समिती वडवणी यांनी सन 2014-2015 मध्ये अदा केलेल्या बांधकामाच्या देयकामधुन विहीत शासकीय कपाती केल्या नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन परिपत्रक क्र.बीसीए-12007 /प्र.क्र.788/कामगार 7 दिनांक 21 एप्रिल 2008 नुसार 1% उपकर वसुल करणे आवश्यक आहे, परंतु रक्कम रुपये 91,663/- कमी कपात करण्यात आल्याचे दिसुन आले, सदर रक्कम रुपये 91,663/- संबंधीतांकडुन वसुलपात्र ठरते.

2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास/1098-प्र.क्र.2889 दिनांक 19 ऑगस्ट 1998 अन्वये 1% दराने कामाचा विमा उतरिवणे आवश्यक आहे, परंतु रक्कम रुपये 1,00,913/- कमी कपात करण्यात आल्याचे दिसुन आले, तरी सदर रक्कम रुपये 1,00,913/- संबंधीतांकडुन वसुलपात्र ठरते.

3) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे दिनांक 04 मे 2012 च्या अधिसुचनेसार मुल्यवर्धीत कर हा 5 टक्के कपात करणे आवश्यक आहे, परंतु रक्कम रुपये 9, 20,439/- कमी कपात करण्यात आल्याचे दिसुन आले, तरी सदर रक्कम रुपये 9,20,439/- संबंधीतांकडुन वसुलपात्र ठरते.

4) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार कंत्राटदाराकडुन 2% दराने आयकर कपात करणे आवश्यक आहे, परंतु रक्कम रुपये 2,60,876/- कमी कपात करण्यात आल्याचे दिसुन आले, तरी सदर रक्कम रुपये 2,60,876/- संबंधीतांकडुन वसुलपात्र ठरते.

**4.254 अपुर्ण कामावर झालेल्या निष्फळ खर्चाबाबत.**

**पंचायत समिती वडवणी, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 28) -** पंचायत समिती वडवणी यांनी विविध योजनेंतर्गत 17 कामे पुर्ण न केल्याने अपुर्ण कामावर झालेला खर्च रक्कम रुपये 33,20,000/- निष्फळ ठरत आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक पंरास-1088/सीआर-3041/26 दिनांक 14 सप्टेबंर 1988 नुसार ज्या जमीनीवर बांधकाम करावयाचे आहे ती जमीन जिल्हा परिषंद / पंचायत समिती/ ग्रामपंचायत मालकीची असल्याशिवाय प्रशासकीय मान्यता, तांत्रीक मंजुरी व कामाचे आदेश देऊ नये, परंतु अशी कार्यवाही न करताच कामांना निधी दिला जातो व काम अर्धवट झाल्यावर वाद निर्माण होवून शासन निधी गुंतून पडतो व वाढीव खर्च होतो व खर्च निष्फळ ठरतो.

2) ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक पंरास-1087/सीआर-795/23 दिनांक 01/09/1987 नुसार पुर्वीच्या अग्रीमाचे मूल्यांकनासह समायोजन झालेशिवाय दुसरे अग्रीम देवु नये. अनुदान व्यपगत होऊ नये म्हणून अग्रीम देणे टाळावे व मार्च महिण्यात अग्रीम प्रदान करु नये परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 95 (2) (ड) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदाचे सर्व कामांचे व विकास योजनांचे कार्यान्वयन करण्यासाठी आवश्यक ती उपाय योजना करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.

4) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-1002/प्र.क्र.128/अर्थोपाय/दिनांक 06/06/2008 प्रमाणे एका आर्थिक वर्षामध्ये मुक्त केलेला निधी पुढील एका आर्थिक वर्षात वापरता येईल व त्यानंतर अखर्चित राहिलेला निधी संस्थांनी शासनाकडे परत करणे बंधनकारक आहे. तथापि पंचायत समितीने अशी कार्यवाही केलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र. 446/वित्त्-9 दिनांक 20/06/2000 चे परिशिष्ट-2 जिल्हा परिषदाकडील (बांधकाम विभाग) योजना बाबत परिशिष्ट क प्रमाणे वेळापत्रक विहित करुन प्रत्येक टप्प्याची कार्यवाही पुर्ण करावी तथापि सन 2010-11, 2011-12, 2012-13, 2013-14, व 2014-15 मधील प्राप्त अनुदान कामावर पुर्णत: खर्च न झाल्याने व कामे अपुर्ण असल्याने शासनाच्या योजनेच्या जनतेस फायदा होऊ शकला नाही. तसेच कामे अपुर्ण साहित्याने शासन निधी नाहक गुंतुन पडला आहे.

6) बांधकामाच्या प्राकलन मुल्यामध्ये 2010-2011 च्या तुलनेत जवळपास 50 ते 60 टक्के एवढी वाढ झाली असुन सध्या अंगणवाडी इमारत बांधकामाची चालु दरसुची नुसार रुपये 6,00,000/- एवढे प्राकलन मुल्य झाल्याने उपरोक्त अपुर्ण कामे पुर्ण करणे जिकरीचे ठरु शकते.

**4.255 बांधकामाचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध न करणेबाबत**.

**पंचायत समिती वडवणी, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 29) -** पंचायत समिती वडवणी यांनी बांधकाम विभागाचे एकुण रुपये 2,46,40,325/- इतक्या रक्कमेचे अदा केलेल्या देयकांचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिलेले नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती वडवणी यांना अर्धसमास पत्र क्रमांक 31 दिनांक 14/06/2016 56 दिनांक 15/06/2016 व 69 दिनांक 28/06/2016 अन्वये विविध योजनेंतर्गत पंचायत समितीने सन 2014-2015 मध्ये

केलेले बांधकामे /विकास कामे याबाबतच्या संचिका, मोजमाप पुस्तिका तसेच इतर अनुषंगिक अभिलेख्यांची मागणी करुनही अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत.

2) लेखापरिक्षणास लेखे/अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध करुन न देणारे अधिकारी /कर्मचारी यांचेवर मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930 (सुधारणा 2011) चे कलम 7 अन्वये नमुद केलेल्या तरतुदी नुसार कारवाई करणे आवश्यक आहे.

**4.256 अपुर्ण कामावर झालेल्या निष्फळ खर्चाबाबत.**

**पंचायत समिती शिरूर, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती, शिरुर अंतर्गत 2009 - 2010 ते सन 2014-2015 अखेर एकूण 26 कामे अपुर्ण आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) या कामावर एकूण 27.80 लक्ष इतका खर्च नोंदविण्यात आला आहे. कामे विहित वेळेत पूर्ण न केल्यामुळे शासनाकडुन प्राप्त निधी सदर कामावर नाहक गुंतून पडला आहे. त्याचप्रमाणे कामावर खर्च वाढण्याची शक्यता असते व त्यामुळे शासन निधीवर त्याचा भार पडतो पर्यायाने शासन निधीचे नुकसान होते. उपरोक्त प्रमाणे कामे अपुर्ण असल्याने कामावर केलेला एकूण खर्च रुपये 27.80 लक्ष निष्फळ ठरतो या बाबत जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

2) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण -1002/प्र.क्र.128/अर्थोपाय/ दिनांक 06/06/2008 प्रमाणे एका आर्थिक वर्षामध्ये मुक्त केलेला निधी पुढील एका आर्थिक वर्षात वापरता येईल व त्यानंतर अखर्चित राहिलेला निधी संस्थांनी शासनाकडे परत करणे बंधनकारक आहे तथापि पंचायत समितीने अशी कार्यवाही केलेली नाही.

3) बांधकाम साहित्याचे दर प्रचंड प्रमाणात वाढलेले असल्याने बांधकामाच्या प्राकलन मुल्यामध्ये सन 2009-10 च्या तुलनेत सध्या जवळपास 60% एवढी वाढ झालेली असून सध्या अंगणवाडी इमारत बांधकामाची चालू दर सुचिनुसार रुपय 6.00 लक्ष एवढे प्राकलन मुल्य झाल्याने उपरोक्त अपुर्ण कामे पूर्ण करणे अत्यंत जिकरीचे ठरेल.

**4.257 बांधकाम देयकातुन विहित शासकीय कपाती न करणेबाबत.**

**पंचायत समिती शिरुर, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती शिरुर, जिल्हा बीड सन 2014-2015 चे लेखापरिक्षणात पंचायत समिती अंतर्गत विविध योजनांचे बांधकामाच्या आयकर, व्हॅट, विमा, कामगार उपकर, इत्यादी कपाती विहित प्रमाणात केलेल्या नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आयकर अधिनियम 1961 चे कलम 94 (क) नुसार 2% आयकर रक्कम रुपये 2, 83,711/- कपात करणे आवश्यक असताना अशी कपात केलेली नाही. सदरील रक्कम संबंधीतांकडुन वसुलीस पात्र आहे.

2) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राजय मुंबई यांचे परिपत्रक क्र. VAT/AMD/ 1010/ IC/ ADM /TRADE SITE NOIIT OR 2010 दिनांक 17 मार्च 2010 व वित्त विभाग अधिसुचना दि.04 मे 2012 अन्वये अनोंदणीकृत ठेकेदाराकडुन 5% व्हॅटची रक्कम रुपये 7,09,278/- करणे आवश्यक असताना अशी कपात केलेली नाही. सदरील रक्कम संबंधीतांकडुन वसुलीस पात्र आहे.

3) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विमास 109/प्र.क्र.2/98/शासन हमी दि.19/08/1998 नुसार कंत्राटदारास कंत्राटी कामापोटी देय रक्कम प्रदान करण्यापूर्वी कंत्रटदाराने कंत्राटी विमा शासकीय विमा कंपनीकडे उतरविण्याचा पुरावा सादर केला नसल्यामुळे विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र दिनांक 02/06/2003 नुसार तसेच संचालनालयाचे पत्र क्रमांक दिनांक 16/11/2007 नुसार देयकातुन कामगार विमा 1% रक्कम रुपये 1,41,856/- देयकातुन कपात केलेली नाही. सदरील रक्कम संबंधीतांकडुन वसुलीस पात्र आहे.

4) महाराष्ट्र शासन, ऊर्जा उदयोग व कामगार विभाग क्र. बी.बी.ए./2007 /प्र.क्र .788 /कामगार 7 दिनांक 21/04/2008 नुसार 1% बांधकाम उपकर रक्कम रुपये 1,41,856/- कपात केलेला नाही. सदरील रक्कम संबंधीतांकडुन वसुलीस पात्र आहे.

**4.258 अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध न केलेबाबत.**

**पंचायत समिती शिरुर, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती शिरुर, जिल्हा बीड सन 2014-2015 चे लेखापरिक्षणात अर्धसमास पत्र क्रमांक 79 दिनांक 24/04/2016 अन्वये मागणी करुनही अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध केलेले नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

प्रमाणक क्रमांक दिनांक 06/05/2014 रुपये 1,07,610/- सिध्दस् सोलार इक्वीपमेंट, अहमदनगर व प्रमाणक क्रमांक 2 दिनांक 05/02/2014 रुपये 2,46,974/- सिध्दस् सोलार इक्वीपमेंट, अहमदनगर या खर्चाचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध केलेले नाहीत.

सदरील प्रमाणकावर लेखाशिर्ष जिल्हा परिषद सेस, मुद्रांक शुल्क व जमिन महसुल/जमिन समाणीकरण असे नमुद करण्यात आले असल्याने सदरील खरेदी कोणत्या अनुदानातून झाली तसेच संबंधीत प्रमाणकांचे अभिलेखे उपलब्ध न झाल्याने सदरील खरेदी बाबत अभिप्राय देता आले नाहीत.

**4.259 अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध न केलेबाबत.**

**पंचायत समिती शिरुर, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती शिरुर, जिल्हा बीड सन 2014-2015 चे लेखापरिक्षणात अर्धसमास पत्र क्रमांक 79 दिनांक 24/04/2016 अन्वये अभिलेख्यांची मागणी करुनही रक्कम रुपये 96,25,344/- अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध केले नाहीत.

सदरील प्रमाणके 13 वा वित्त आयोगातून सिध्दस् सोलार इक्वीपमेंट, अहमदनगर यांना अदाई केली आहे. याबाबतची संचिका लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

**4.260 तेरावा वित्त आयोग पंचायत समिती स्तर अंतर्गत सिमेंट रस्ता व नाली बांधकामातील नियमिततेबाबत.**

**पंचायत समिती परभणी, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समीती, परभणी अंतर्गत सन 2014-2015 या वित्तीय वर्षामध्ये तेरावा वित्त आयोगा अंतर्गत आक्षेपात नमूद केल्यानुसार एकूण सहा सिमेंट रोड बांधकामाची कामे करण्यात आली. यावर रुपये 8,42,559/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9,दिनांक 19/03/2012 नुसार पंचायत समिती स्तरावर देण्यांत आलेल्या प्रशासकीय व तांत्रीक मंजूरीची माहिती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतु अशी कार्यवाही केले बाबतचा ठराव दिसून आला नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 192 (1) (अ) ते (ग) प्रमाणे प्रत्येक वर्षाच्या अखेरीस प्रत्येक बांधकामाशी संबंधीत असलेले सर्व कागदपत्र कालक्रमानुसार फाईल करण्यात आलेली नाहीत.

3) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील नियम 296 (ii)(ब) नुसार माहे फेब्रुवारी व मार्च महिन्यात कामाचे आदेश निर्गमीत करण्यास प्रतिबंध असतांना प्रमाणक क्रमांक 11, दिनांक 24/03/2015 च्या कामाचे आदेश माहे मार्च महिन्यात देण्यात आले आहेत.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.472/ वित्त-4, दिनांक 09/02/2009 अन्वये रस्त्याची कामे देताना त्या कामासाठीची अवजारे किंवा यंत्रे असतील तरच अशी कामे ग्रामपंचायतींना देण्यात यावीत असे नमूद असताना पंचायत समितीने अशी तपासणी न करताच कामे दिल्याचे दिसून येते.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 147 अन्वये नमुना नंबर 48 मध्ये करारनामा नोंदवही ठेवलेली नाही.

6) जिल्हा परिषदेमार्फत नविन व दुरुस्तीच्या रुपये 20,000/- व त्यापेक्षा जास्त रकमेच्या कामाच्या ठिकाणी 5 X 4 फुट आकाराचा लोखंडी फलक लावून त्यावर ऑईलपेंटने कामाचा तपशिल लिहीणे आवश्यक आहे. तसेच सदर तपशीलाचे प्रमाणपत्र उप अभियंता व गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने देयकासोबत जोडावयाचे आहे. परंतू उपरोक्त प्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 नुसार पंचायत समिती कार्यालयाची बांधकाम शाखा आणी गट उपअभियंता प्रत्येक बांधकामाचे नाव, त्याची जागा, कामाचा प्रारंभ झाल्याची तारीख, काम पूर्ण झाल्याची तारीख, कामाचा एकूण खर्च, त्याच्या वार्षीक परिरक्षणाच्या खर्चाचा अंदाज व स्थावर मालमत्तेच्या नोंदवहीतील नोंदीचा निर्देश दाखविणारी, पूर्ण झालेल्या कामाची नोंदवही नमुना 69 मध्ये ठेवणे आवश्यक असताना अशी नोंदवही दर्शविण्यात आली नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार साहित्य वापरण्या पुर्वी शासकीय प्रयोगशाळेतून चाचणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

9) विमा उप संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र जावक क्रमांक पविनि/कार-डब्ल्यूसी/37/शाविनि/संकीर्ण, दिनांक 27/04/2006 अन्वये कामाच्या अंदाजपत्रकीय रकमेच्या 1 टक्का रक्कम विमा कंपनीकडे जमा करणे आवश्यक आहे. सदर कामातील देयकातून विमा निधी ची रक्कम कमी कपात करण्यात आली आहे. तरी तपासणी केलेले एकूण कामाची रक्कम रुपये 8,42,559/- रुपयाची 1 टक्का रक्कम रुपये 8,426/- कपात करुन विमा संचालनालयास पाठविणे आवश्यक असताना फक्त रुपये 4,665/- कपात केले आहेत. कमी कपात रक्कम रुपये 3,761/- वसूल करणे आवश्यक आहे.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 169 नुसार कनिष्ठ अभीयंता/शाखा अभीयंता यांनी मोजमाप पुस्तीकेतील नोंदी घेताना तारखा नमुद करणे आवश्यक आहे. तथापि अभीयंत्याच्या कामाची नोंदणी केल्या बाबत दिनांकित स्वाक्षरी नाहीत.

11) सदरील कामाच्या संचिका तपासली असता सदरील कामासाठी दर पृथ्थकरण करण्यासाठी जिल्हयाचा खदान दर्शक तक्त्या अभावी पडताळणी करता आलेली नाही. साहित्य जवळच्या अंतरावर व किफायतशीर असल्या बाबत दिलेली लीड बरोबर असल्याचे प्रमाणीत केलेले नाही. त्यामुळे दर पृथ्थकरण बरोबर असल्याचे प्रमाणित करता येत नाही.

12) सदरील सीमेंट रोडचे काम यापूर्वी कुठल्याही योजनेतून करण्यात आले नसल्या बाबतचे प्रमाणपत्र संचिकेत दिसून आले नाही.

### 4.261 बहु विध विकास कार्यक्रम अंतर्गत रस्ता व नालीचे बांधकाम कामातील अनियमितताबाबत.

**पंचायत समिती पाथरी, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती, पाथरी अंतर्गत सन 2014-15 या वित्तीय वर्षामध्ये बहु विकास कार्यक्रम योजना निधीतुन मौजे हादगाव येथे रस्ता व नालीचे बांधकामाचे काम करण्यात आलेले असुन त्यावर रुपये 9,98,721/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशासकीय मान्यता आदेश क्रमांक 128, दिनांक 03/03/2014 मधील अटीनुसार गट विकास अधिकाऱ्यांनी सदर योजनेअंतर्गत कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी 2001 च्या जनगणने प्रमाणे अनुजाती लोकसंख्या व प्रस्तावित काम यापुर्वी कोणत्याही योजनेतुन घेण्यात आले नाही, मालकी प्रमाणपत्र, ग्राम पंचायतीची जागा असल्याने नमुना 8 चा उतारा ईत्यादी, प्राप्त करुन घेतल्याचे दिसुन येत नाही.

2) काम पुर्ण झाल्यावर सदर काम ज्या योजने अंतर्गत करण्यात आले आहे त्याचे नाव कोणशिलेवर कोरुन ती बसवण्यात यावी व त्यावर कंत्राटदारांचे नाव व काम पुर्ण केल्याचा दिनांक नमुद करणे आवश्यक आहे त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे अभिलेखे संचिकेत नाही. काम पुर्ण झाल्यावर हस्तांतरण प्रमाणपत्र नाही.

3) काम पुर्ण झाल्यानंतर अंतिम हप्ता देण्यापुर्वी मागणी प्रस्तावासोबत सिमेंट वापर, तुलनात्मक तक्ता, काम सुरु करणेपुर्वीचे व काम पुर्ण झाल्यानंतरचे छायाचित्रे, कामाची नोंद ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवहीमध्ये घेतल्याचे प्रामणपत्र संचिकेत नाही. असे अहवाल नसताना अंतिम प्रदान केलेले आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 116 नुसार निविदेच्या प्रत्येक पानावर ठेकेदार व करार करणाऱ्याने स्वाक्षऱ्या करणे आवश्यक आहे. परंतु बी-1 निविदा पुर्णत: कोरी आहे. त्यावर गट विकास अधिकारी वा अभियंत्याच्या, ग्रामपंचायतीच्या वतीने सहया नाहीत, तरीही निविदा स्वीकारुन काम मंजुर केले आहे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166 (3) नुसार मोजणी विषयीची प्रत्येक नोंद मोजमाप पुस्तीकेत घेताना प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता आदेश क्रमांक, करारनामा क्रमांक व दिनांक, बांधकाम प्रत्यक्ष पुर्ण करण्याचा दिनांक, मोजणीचा दिनांक इत्यादी तपशील सुरुवातीला नोंदविणे आवश्यक आहे. तथापि मोजमाप पुस्तिकावरील कामाची प्रथम मोजमापे नोंदविताना सदरील माहिती नोंदविली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/02/2000 नुसार एका कामासाठी एक मोजमापवही ठेवण्यात यावी कोणत्याही परिस्थितीत एकाच मोजमाप वहीत वेगवेगळया कामाच्या नोंद घेण्यात येऊ नयेत व मोजमाप वहीमधील प्रत्येक नोंदी दिनांकीत असाव्यात परंतु सर्वच कामाच्या बाबतीत अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 168 प्रमाणे कार्यकारी अभियंता त्यांनी विहीत केलेल्या प्रमाणात कामाची तपासणी बाबत नोंद मापन पुस्तीकेत घेऊन स्वाक्षरी केली आहे परंतु स्वाक्षरी खाली दिनांक नमुद केलेला नाही

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 100 नुसार कार्याकारी अभियंता व उप अभियंता यांनी नमुना 42 मध्ये प्रकल्पांची नोंदवही ठेवुन त्यात नवीन बांधकामाचे सर्व प्रस्ताव नोंदविणे आवश्यक आहे अशी नोंदवही दर्शविली नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 अन्वये नमुना नंबर 69 मध्ये पुर्ण झालेल्या कामाची नोंद मालमत्ता नोंदवहीत घेणे आवश्यक आहे परंतु अशी नोंदवही दर्शविली नाही.

10) बांधकामाबाबतचे देयक प्रदानार्थ सादर करताना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 186 (1) मध्ये नमुद निर्देशाप्रमाणे अभियंत्यांची देयकांवर प्रतीस्वाक्षरी न घेताच देयकांचे प्रदान केले आहे.

11) रस्त्याचे कामासाठी अंदाजपत्रकीय तरतुद रुपये 7,97,309/- व नालीचे कामासाठी रुपये 1,96,443/- अशी असताना मोजमाप पुस्तिका क्रमांक 41, पृष्ठ क्रमांक 17 वरील नोंदी नुसार रस्त्याचे कामावर रुपये 6,86,974/- (रुपये 1,10,335/- कमी) व नालीचे कामावर रुपये 3,14,444/- (रुपये 1,18,001/- जादा) खर्च करण्यात आला आहे. जर अंदाजपत्रकानुसार कामात बदल करणे शक्य होत नसल्यास सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु सुधारीत प्रशासकीय मान्यता किंवा त्याबाबतचे कोणतीही मान्यता न घेताच काम्मात बदल करुन कामे करुन घेण्यात आली आहेत. तसेच तांत्रीक मान्यता रक्कमेमध्ये रुपये 4,969/- हि विमा भरणेसाठी तरतुद केलेली असताना ती कामावर खर्च करण्यात आली आहे.

12) सदर कामांस मा.जिल्हाधिकारी, परभणी यांनी प्रशासकीय मान्यता दिल्याचे आदेश दिनांक 14/02/2014 संचिकेत उपलब्ध नाहीत. त्यामुळे आणखी काही अटी व शर्ती असल्यास त्यानुसार काम झाले किंवा नाही याची तपासणी करता आलेली नाही.

**4.262 अल्पसंख्याक विकास कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या सिमेंट कॉंक्रीट रोड व नाली बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती जिंतुर, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समीती, जिंतुर अंतर्गत सन 2014-2015 या वित्तीय वर्षामध्ये अल्पसंख्याक विकास कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या सिमेंट कॉंक्रीट रोड व नाली बांधकाम या कामावर रुपये 87,766/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 19/03/2012 नुसार पंचायत समिती स्तरावर देण्यांत आलेल्या प्रशासकीय व तांत्रीक मंजूरीची माहिती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतु अशी कार्यवाही केले बाबतचा ठराव दिसून आला नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 192 (1) (अ) ते (ग) प्रमाणे प्रत्येक वर्षाच्या अखेरीस प्रत्येक बांधकामाशी संबंधीत असलेले सर्व कागदपत्र कालक्रमानुसार फाईल करण्यात आलेली नाहीत.

3) महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्रमांक पीआरसी/झेडपीए-1090/प्र.क्र.1113/33, दिनांक 25/10/1990 ग्रामपंचायतीना विना निविदा कामे देताना ग्रामपंचायतीची आर्थीक स्थीती सक्षमतेबाबत प्रमाणपत्र, काम करणेस तयार असल्याबाबतचा ग्रामपंचायतीचा ठराव. उत्पन्नाचे प्रमाणपत्र, ग्रामपंचायतीचा कामाबाबतचा मागणी अर्ज इत्यादी कागदपत्राची पुर्तता करूनच काम वाटप करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाच्या संचिकेत उक्त अभीलेखे संलग्न केल्याचे दिसून आली नाहीत.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 147 अन्वये नमुना नंबर 48 करारनामा नोंदवही ठेवलेली नाही.

5) प्रशासकीय मंजूरी आदेशातील अटी अन्वये जिल्हा परिषदेमार्फत नविन व दुरुस्तीच्या रुपये 20,000/- व त्यापेक्षा जास्त रकमेच्या कामाच्या ठिकाणी 5 X 4 फुट आकाराचा लोखंडी फलक लावून त्यावर ऑईलपेंटने कामाचा तपशिल लिहीणे आवश्यक आहे. तसेच सदर तपशीलाचे प्रमाणपत्र उपअभियंता व गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने देयकासोबत जोडावयाचे आहे. परंतु उपरोक्त प्रमाणे कार्यवाही केल्याचे प्राप्त अभीलेख्या वरुन दिसून आले नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 169 नुसार कनिष्ठ अभीयंता/शाखा अभीयंता यांनी मोजमाप पुस्तीकेतील नोंदी घेताना तारखा नमुद करणे आवश्यक आहे. तथापि अभीयंत्याच्या कामाची नोंदणी केल्या बाबत दिनांकित स्वाक्षरी नाहीत. तसेच कनिष्ठ अभीयंता/शाखा अभीयंता यांच्या प्रवास दैनंदिनी अर्धसमास पत्र क्रमांक 1, दिनांक 03/09/2015 अन्वये मागणी करण्यात आली होती. तरी सदरील दैनंदिनी लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 नुसार पंचायत समिती कार्यालयाची बांधकाम शाखा आणी गट उप अभियंता प्रत्येक बांधकामाचे नाव, त्याची जागा, कामाचा प्रारंभ झाल्याची तारीख, काम पूर्ण झाल्याची तारीख, कामाचा एकूण खर्च, त्याच्या वार्षीक परिरक्षणाच्या खर्चाचा अंदाज व स्थावर मालमत्तेच्या नोंदवहीतील नोंदीचा निर्देश दाखविणारी, पूर्ण झालेल्या कामाची नोंदवही नमुना 69 मध्ये ठेवणे आवश्यक असताना अशी नोंदवही दर्शविण्यात आली नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार साहित्य वापरण्या पुर्वी शासकीय प्रयोगशाळेतून चाचणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

9) विमा उप संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र जावक क्रमांक पविनि/कार-डब्ल्यूसी/37/शाविनि/संकीर्ण, दिनांक 27/04/2006 अन्वये कामाच्या अंदाजपत्रकीय रकमेच्या 1 टक्का रक्कम विमा कंपनी कडे जमा करणे आवश्यक आहे. ही रक्कम काम करणाऱ्या यंत्रणेने / कंत्राटदाराने काम सुरू करण्यापूर्वी,

कामावरील मजुरांच्या विम्यापोटी संबंधित विमा कंपनी कडे जमा करणे आवश्यक आहे. परंतु असे न करता पंचायत समितीने सदर कामातील देयकातून विमा निधीची रक्कम कपात केली आहे. काम सुरू करण्यापूर्वी संबंधित यंत्रणेने ही रक्कम जमा केली नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 169 नुसार कनिष्ठ अभीयंता/शाखा अभीयंता यांनी मोजमाप पुस्तीकेतील नोंदी घेताना तारखा नमुद करणे आवश्यक आहे. तथापि अभीयंत्याच्या कामाची नोंदणी केल्या बाबत दिनांकित स्वाक्षरी नाहीत.

11) सदरील कामाच्या संचिका तपासली असता सदरील कामासाठी दर पृथ्थकरण करण्यासाठी जिल्हयाचा खदान दर्शक तक्त्या अभावी पडताळणी करता आलेली नाही. साहित्य जवळच्या अंतरावर व किफायतशीर असल्या बाबत दिलेली लीड बरोबर असल्याचे प्रमाणीत केलेले नाही. त्यामुळे दर पृथ्थकरण बरोबर असल्याची प्रमाणित करता येत नाही.

12) सदरील बांधकाम यापूर्वी कुठल्याही योजनेतून करण्यात आले नसल्या बाबतचे प्रमाणपत्र संचिकेत दिसून आले नाही.

13) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील नियम 296 (ब) नुसार माहे फेब्रुवारी-मार्च महिन्यात कामाचे आदेश निर्गमीत करण्यास प्रतिबंध असतांना विवरणपत्रात दर्शविल्या प्रमाणे कामाची तांत्रिक मान्यता फेब्रुवारी महिन्यात देण्यात आली आहे.

14) सदरील कामाच्या प्रशासकीय मान्यतेचे आदेश, कार्यारंभ आदेश, सीमेंट / खडीचा चाचणी अहवाल लेखापरीक्षणात न दर्शविल्याने सदरील काम झाले असल्याचे प्रमाणित करता येत नाही.

**4.263 राष्ट्रीय ग्राम स्वराज्य योजना अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिति जिंतुर, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समीती, जिंतुर अंतर्गत सन 2014-2015 या वित्तीय वर्षामध्ये राष्ट्रीय ग्राम स्वराज्य योजना अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम मौजे किन्ही तालुका जिंतूर या कामावर रुपये 6,25,003/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9,दिनांक 19/03/2012 नुसार पंचायत समिति स्तरावर देण्यांत आलेल्या प्रशासकीय व तांत्रीक मंजूरीची माहिती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतु अशी कार्यवाही केले बाबतचा ठराव दिसून आला नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिति लेखासंहिता 1968 मधील नियम 192 (1) (अ) ते (ग) प्रमाणे प्रत्येक वर्षाच्या अखेरीस प्रत्येक बांधकामाशी संबंधीत असलेले सर्व कागदपत्र कालक्रमानुसार फाईल करण्यात आलेली नाहीत.

3) शासन निर्णय क्रमांक ग्रापंई-2013/प्र.क्र.101/पंरा-7, दिनांक 20/03/2013 क्रमांक 3 प्रमाणे केंद्र शासनाच्या उपलब्ध करुन दिलेल्या निधीच्या प्रमाणात जिल्हा परिषदांनी राज्य हिश्श्याचा 25 टक्के निधी जनसुविधा योजनेतुन उपलब्ध करावयाचा आहे. त्यानुसार शासनाकडून निधि प्राप्त असतांनादेखील, हा निधि पंचायत समितीनां तब्बल एक वर्ष उशिराने प्राप्त झाल्याचे उपलब्ध अभिलेख्यावरून दिसून येते.

4) सदर कामासाठी कार्यारंभ आदेश दिनांक 04/08/2014 रोजी निर्गमित केले आहेत. मग यापूर्वीच दिनांक 20/03/2013 च्या शासन निर्णय अन्वये प्राप्त झालेल्या रुपये 3,75,000/- एवढ्या निधिचा विनियोग कसा केला, ती रक्कम शासनखाती भरणा केली किंवा कसे याचा उपलब्ध अभिलेख्यावरून बोध होत नाही.

5) महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्रमांक पीआरसी/झेडपीए-1090/प्र.क्र.1113/33, दिनांक 25/10/1990 ग्रामपंचायतीना विना निविदा कामे देताना ग्रामपंचायतीची आर्थीक स्थीती सक्षमते बाबत प्रमाणपत्र, काम करणेस तयार असल्याबाबतचा ग्रामपंचायतीचा ठराव. उत्पन्नाचे प्रमाणपत्र, ग्रामपंचायतीचा कामाबाबतचा मागणी अर्ज

इत्यादी कागदपत्राची पुर्तता करुनच काम वाटप करणे आवश्यक आहे. परंतू संचिकेत उक्त अभीलेखे संलग्न केल्याचे दिसून आली नाहीत.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 147 अन्वये नमुना नंबर 48 करारनामा नोंदवही ठेवलेली नाही.

7) प्रशासकीय मंजूरी आदेशातील अटी अन्वये जिल्हा परिषदे मार्फत नविन व दुरुस्तीच्या रुपये 20,000/- व त्यापेक्षा जास्त रकमेच्या कामाच्या ठिकाणी 5 X 4 फुट आकाराचा लोखंडी फलक लावून त्यावर ऑईलपेंटने कामाचा तपशिल लिहीणे आवश्यक आहे. तसेच सदर तपशीलाचे प्रमाणपत्र उपअभियंता व गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने देयकासोबत जोडावयाचे आहे. परंतू उपरोक्त प्रमाणे कार्यवाही केल्याचे प्राप्त अभीलेख्या वरुन दिसून आले नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 169 नुसार कनिष्ठ अभीयंता/शाखा अभीयंता यांनी मोजमाप पुस्तीकेतील नोंदी घेताना तारखा नमुद करणे आवश्यक आहे. तथापि अभीयंत्याच्या कामाची नोंदणी केल्या बाबत दिनांकित स्वाक्षरी नाहीत. तसेच कनिष्ठ अभीयंता/शाखा अभीयंता यांच्या प्रवास दैनंदिनी अर्धसमास पत्र क्रमांक 1, दिनांक 03/09/2015 अन्वये मागणी करण्यात आली होती. तरी सदरील दैनंदिनी लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 नुसार पंचायत समिती कार्यालयाची बांधकाम शाखा आणि गट उप अभियंता प्रत्येक बांधकामाचे नाव, त्याची जागा, कामाचा प्रारंभ झाल्याची तारीख, काम पूर्ण झाल्याची तारीख, कामाचा एकूण खर्च, त्याच्या वार्षीक परिरक्षणाच्या खर्चाचा अंदाज व स्थावर मालमत्तेच्या नोंदवहीतील नोंदीचा निर्देश दाखविणारी, पूर्ण झालेल्या कामाची नोंदवही नमुना 69 मध्ये ठेवणे आवश्यक असताना अशी नोंदवही दर्शविण्यात आली नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार साहित्य वापरण्या पुर्वी शासकीय प्रयोगशाळेतून चाचणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

11) सदरील कामाच्या संचिका तपासली असता सदरील कामासाठी दर पृथ्थकरण करण्यासाठी जिल्हयाचा खदान दर्शक तक्त्या अभावी पडताळणी करता आलेली नाही. साहित्य जवळच्या अंतरावर व किफायतशीर असल्या बाबत दिलेली लीड बरोबर असल्याचे प्रमाणीत केलेले नाही. त्यामुळे दर पृथ्थकरण बरोबर असल्याची प्रमाणित करता येत नाही.

12) सदरील ग्रामपंचायत इमारतीचे बांधकाम यापूर्वी कुठल्याही योजनेतून करण्यात आले नसल्या बाबतचे प्रमाणपत्र संचिकेत दिसून आले नाही.

### 4.264 पंचायत समिती उपकर अंतर्गत 4 ईमारत व दळणवळण लेखाशिर्षांतर्गत खर्चातील अनियमितता व जादा प्रदानाबाबत.

**पंचायत समिती गंगाखेड, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती, गंगाखेड अंतर्गत सन 2014-15 या वित्तीय वर्षात आक्षेपमध्ये नमूद तपशिलानुसार पंचायत समिती उपकर अंतर्गत 4 ईमारत व दळणवळण या लेखाशिर्षांतर्गत विविध कामांवर रुपये 40,01,648/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) भारत सरकार आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) मधील तरतुदीनुसार देयकाच्या देय रक्कमेच्या 2 टक्के आयकर कपात करणे आवश्यक असताना प्रस्तुत कामांच्या देयकातुन आयकर कपात न केल्यामुळे संबंधितास रुपये 88,030/- चे जादा प्रदान झाले आहे ते वसुल करुन आयकरखाती भरणा करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय परिपत्रक क्रमांक बीसीडी-2005/प्र.क्र.324/इमारती, दिनांक 03/03/2006 व सुधारीत महाराष्ट्र शासन, राजपत्र दिनांक 04/04/2012 प्रमाणे

दिनांक 01/04/2012 नंतर कार्यारंभ आदेश निर्गमीत केलेल्या कामाच्या बाबतीत नोंदणी न केलेल्या ठेकेदाराच्या देयकातुन 5 टक्के दराने मुल्यवर्धीत कर कपात करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही न केल्यामुळे संबंधीतांस एकुण रुपये 44,019/- चे जादा प्रदान झाले आहे उपरोक्त जादा प्रदानाची रक्कम संबंधिताकडुन वसुल करुन योग्य शिर्षाखाली भरणा करणे आवश्यक आहे.

3) आक्षेपमध्ये नमूद तपशिलामधील अनुक्रमांक 02, 03, 05, 10 व 20 च्या कामाची मोजमापपुस्तीका तपासली असता सदरील कामाच्या देयकातुन एकुण रुपये 62,956/- रॉयल्टीची रक्कम वसुल करणे आवश्यक असताना केवळ रुपये 57,652/- कपात केल्यामुळे संबंधीतास रुपये 5,304/- चे जादा प्रदान झाले आहे. ते संबंधीताकडुन वसुल करुन रॉयल्टी खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) बहुतांश करारनाम्यावर गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या आढळुन आल्या नाहीत तसेच करारनाम्यावर करारनामा केल्याचा दिनांकही नमुद केलेला नाही.

5) आक्षेपमध्ये नमूद तपशिलामधील अनुक्रमांक 14 च्या कामाच्या संचीका व मोजमाप पुस्तीकेची तपासणी केली असता ग्रामपंचायतीच्या ठरावाप्रमाणे (ठराव क्रमांक 06,दिनांक 26/06/2014) पिराजी नारायण उफाडे ते शेख मैनु करीमसाब यांचे घरापर्यंत रोड व नाली दुरुस्तीचे काम करणे असे असताना प्रत्यक्षात मोजमाप पुस्तीका क्रमांक 5372 मधील पृष्ठ क्रमांक 1 ते 3 वरील नोंदीप्रमाणे केशव केंद्रे ते सायस पैठणे यांचे घरापर्यंत काम केल्याचे नमुद केले आहे. याबाबत प्राधीकार दर्शवणे आवश्यक आहे.

6) आक्षेपमध्ये नमूद तपशिलामधील अनुक्रमांक 14 च्या कामाच्या मोजमाप पुस्तीकेची तपासणी केली असता बाब क्रमांक 1 प्रमाणे नालीसाठी 120 मीटर खोदकाम केले असताना बाब क्रमांक 2 प्रमाणे 1:2:4 सिमेंट कॉक्रीट मात्र 134 मीटर केल्याचे नोंदवले आहे. प्रत्यक्षात खोदकाम केलेले नसताना जादा सिमेंट कॉक्रीट केल्याचे दर्शवल्यामुळे सदरील जादा कामाचे रुपये 1,581/- वसुल करणे आवश्यक आहे.

7) आक्षेपमध्ये नमूद तपशिलामधील अनुक्रमांक 16 च्या कामाच्या अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तीकेची तपासणी केली असता अंदाजपत्रकाप्रमाणे 117 मीटर लांब व 3 मीटर रुंदीचा (117 x 3) रस्ता करावयाचा असताना प्रत्यक्षात (16 x 16), (12 x 4.3), (9.6 x 4.3), (7.1 x 4.2) व (4.5 x 3.6) असा रस्ता केल्याच्या नोंदी घेतल्या आहेत याबाबत प्राधीकार दर्शवणे आवश्यक आहे.

8) आक्षेपमध्ये नमूद तपशिलामधील अनुक्रमांक 08 च्या कामाच्या संचीकेची तपासणी केली असता सदरील कामाचे आदेश दिनांक 20/05/2014 रोजी देऊन सदरील कामाच्या काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्रानुसार सदरील काम दिनांक 22/06/2014 रोजी पुर्ण झाल्याचे नमुद केले आहे तथापि सदरील कामाच्या करारनाम्याची तपासणी केली असता करारनाम्यासाठीचा बाँड दिनांक 25/06/2014 रोजी खरेदी केल्याचे दिसुन आले आहे त्यामुळे कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी करार न केल्याचे दिसुन येते.

9) आक्षेपमध्ये नमूद तपशिलामधील अनुक्रमांक 03 व 04 च्या कामांच्या अंदाजपत्रकांची तपासणी केली असता अनुक्रमांक 04 चे अंदाजपत्रकात मेटलसाठी 7 किलोमीटर लीड दर्शवली असताना अनुक्रमांक 07 चे कामात मेटलसाठी 12 किलोमीटर लीड दर्शवुन लीड चार्जेस प्रदान केले आहेत. एकाच गावातीत कामासाठी सारखीच लीड दर्शवणे आवश्यक असताना जादा लीड दर्शवल्यामुळे बाब क्रमांक 02, 03, 05 व 06 मध्ये एकुण रुपये 15,484/- चे जादा प्रदान झाले आहे ते वसूल करणे आवश्यक आहे.

10) आक्षेपमध्ये नमूद तपशिलामधील कामाच्या देयकातुन विमा, व्हॅट, कामगार उपकर, सुरक्षा ठेव व रॉयल्टीच्या रक्कमा कपात केल्या आहेत. तथापी सदरील रकमा संबंधीत खाती भरणा केल्याच्या पोचपावत्या पहावयास मिळाल्या नाहीत.

**4.265 राष्ट्रीय ग्राम स्वराज्य योजना अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती सेलु, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समीती, सेलु मध्ये सन 2014-2015 या वित्तीय वर्षामध्ये राष्ट्रीय ग्राम स्वराज योजना (RGSY) अंतर्गत सन 2013-2014 मध्ये

नविन ग्रामपंचायत बांधकामा करीता प्राप्त अनुदानातून मौजे पिंपरी शिवठाणा व सिमनगाव या दोन नवीन ग्राम पंचायत कार्यालय बांधकामावर रुपये 4,20,499/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9,दिनांक 31/01/2013 नुसार पंचायत समिती स्तरावर देण्यांत आलेल्या प्रशासकीय व तांत्रीक मंजूरीची माहिती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतु अशी कार्यवाही केले बाबतचा ठराव दिसून आला नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 192 (1) (अ) ते (ग) प्रमाणे प्रत्येक वर्षाच्या अखेरीस प्रत्येक बांधकामाशी संबंधीत असलेले सर्व कागदपत्र कालक्रमानुसार फाईल करण्यात आलेली नाहीत.

3) सदरील कामाच्या प्रशासकीय मंजूरीतील अटी प्रमाणे शासननिर्णया नुसार रुपये पाच लक्ष पेक्षा जास्त रकमेची कामे असल्यामुळे ग्रामपंचायतीने ई-निविदा पध्दतीने कार्यवाही करावी असे असताना ई-निविदे प्रमाणे कार्यवाही केल्याचे अभीलेखे लेखापरीक्षणास दर्शविण्यात आलेली नाहीत.

4) शासन निर्णय क्रमांक ग्रापंई-2013/प्र.क्र.101/पंरा-7, दिनांक 20/03/2013 प्रमाणे ग्रामपंचायत कार्यालयाच्या बांधकामासाठी मुख्य वास्तुशास्त्र, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांच्याकडील मान्यताप्राप्त नमुना आराखडा वापरणे व त्यानुसार बांधकाम करणे बंधनकारक राहील असे आहे. परंतु लेखापरीक्षणात प्राप्त अभीललेख्यात सदरील आराखडा दिसून आला नाही.

5) शासन निर्णय क्रमांक ग्रापंई-2013/प्र.क्र.101/पंरा-7, दिनांक 20/03/2013 क्रमांक 3 प्रमाणे केंद्र शासनाच्या उपलब्ध करुन दिलेल्या निधीच्या प्रमाणात जिल्हा परिषदांनी राज्य हिश्श्याचा 25 टक्के निधी जनसुविधा योजनेतुन उपलब्ध करावयाचा आहे असे आहे. परंतु प्राप्त अभीलेख्यावरुन अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 147 अन्वये नमुना नंबर 48 करारनामा नोंदवही ठेवलेली नाही.

7) प्रशासकीय मंजूरी आदेशातील अटी अन्वये जिल्हा परिषदे मार्फत नविन व दुरुस्तीच्या रुपये 20,000/- व त्यापेक्षा जास्त रकमेच्या कामाच्या ठिकाणी 5 X 4 फुट आकाराचा लोखंडी फलक लावून त्यावर ऑईलपेंटने कामाचा तपशिल लिहीणे आवश्यक आहे. तसेच सदर तपशीलाचे प्रमाणपत्र उपअभियंता व गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने देयकासोबत जोडावयाचे आहे. परंतू उपरोक्त प्रमाणे कार्यवाही केल्याचे प्राप्त अभीलेख्या वरुन दिसून आले नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 169 नुसार कनिष्ठ अभीयंता / शाखा अभीयंता यांनी मोजमाप पुस्तीकेतील नोंदी घेताना तारखा नमुद करणे आवश्यक आहे. तथापि अभीयंत्याच्या कामाची नोंदणी केल्या बाबत दिनांकित स्वाक्षरी नाहीत. तसेच कनिष्ठ अभीयंता/शाखा अभीयंता यांच्या प्रवास दैनंदिनी अर्धसमास पत्र क्रमांक 1, दिनांक 08/10/2015 अन्वये मागणी करण्यात आली होती. तरी सदरील दैनंदिनी लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 नुसार पंचायत समिती कार्यालयाची बांधकाम शाखा आणी गट उप अभियंता प्रत्येक बांधकामाचे नाव, त्याची जागा, कामाचा प्रारंभ झाल्याची तारीख, काम पूर्ण झाल्याची तारीख, कामाचा एकूण खर्च, त्याच्या वार्षीक परिरक्षणाच्या खर्चाचा अंदाज व स्थावर मालमत्तेच्या नोंदवहीतील नोंदीचा निर्देश दाखविणारी, पूर्ण झालेल्या कामाची नोंदवही नमुना 69 मध्ये ठेवणे आवश्यक असताना अशी नोंदवही दर्शविण्यात आली नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार साहित्य वापरण्या पुर्वी शासकीय प्रयोगशाळेतून चाचणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

11) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी-2005/ प्र.क्र.324/इमारती-2,दिनांक 03/03/2006 तथा सुधारीत महाराष्ट्र शासन, राजपत्र दिनांक 04/04/2012 प्रमाणे नुसार मुल्यवर्धीत कर

अधिनियमाखाली 5 टक्के मुल्यवर्धीत कर वसूल करावयाचा आहे. सदरील योजने अंतर्गत तपासणी केलेले एकूण कामे रुपये 4,20,499/- रकमेची असून सदरील कामापोटी मुल्यवर्धीत कराची एकूण रक्कम रुपये 21,025/- कपात करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात रुपये 15,459/- एवढी रक्कम कपात केली असून उर्वरीत कपात करावयाची रक्कम रुपये 5,566/- वसूल करणे आवश्यक आहे.

12) सदरील कामाच्या संचिका तपासली असता सदरील कामासाठी दर पृथ्थकरण करण्यासाठी जिल्हयाचा खदान दर्शक तक्त्या अभावी तपासणी करता आलेली नाही. साहित्य जवळच्या अंतरावर व किफायतशीर असल्या बाबत दिलेली लीड बरोबर असल्याचे प्रमाणीत केलेले नाही.

13) सदरील ग्रामपंचायत इमारतीचे बांधकाम यापूर्वी कुठल्याही योजनेतून करण्यात आले नसल्या बाबतचे प्रमाणपत्र संचिकेत दिसून आले नाही.

**4.266 अल्पसंख्यांक वस्ती विकास कार्यक्रम अंतर्गत सिमेंट रस्ता व नालीचे बांधकामातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती पुर्णा, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती, पुर्णाचे सन 2014-15 चे लेखापरीक्षणात अल्पसंख्यांक वस्ती विकास कार्यक्रम योजना निधीतुन मौजे कावलगाव येथे सिमेंट रस्ता व नालीचे बांधकामाचे काम करण्यात आलेले असुन यावर रुपये 6,37,477/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी 2001 च्या जन गणनेप्रमाणे विहित प्रमाणात लोकसंख्या असल्याचे व प्रस्तावित काम यापुर्वी कोणत्याही योजनेतुन घेण्यात आले नाही असे प्रमाणपत्र, मालकी प्रमाणपत्र, ग्रामपंचायतीची जागा असल्याचे नमुना नंबर 8 चा उतारा प्राप्त करुन घेतल्याचे अभिलेखे संचिकेत उपलब्ध नाहीत.

2) सदर काम ज्या योजनेअंतर्गत करण्यात आले आहे त्याचे नाव कोणशिलेवर कोरुन ती बसवण्यात यावी व त्या वर कंत्राटदारांचे नाव व काम पुर्ण केल्याचा दिनांक नमुद करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे अभिलेखे संचिकेत नाही. काम पुर्ण झाल्यावर हस्तांतरण प्रमाणपत्र नाही.

3) काम पुर्ण झाल्यानंतर अंतिम हप्ता देण्यापुर्वी मागणी प्रस्तावा सोबत सिमेंट वापर तुलनात्मक तक्ता, काम सुरु करण्यापुर्वीचे व काम पुर्ण झाल्यानंतरचे छायाचित्रे, कामाची नोंद ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवहीमध्ये घेतल्याचे प्रमाणपत्र संचिकेत नाही असे अहवाल नसताना अंतिम प्रदान केले आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 116 नुसार निविदेच्या प्रत्येक पानावर ठेकेदार व करार करणाऱ्याने स्वाक्षऱ्या करणे आवश्यक आहे. परंतु बी-1 निविदा बऱ्याची ठिकाणी माहिती भरलेली नाही तसेच बऱ्याच ठीकाणी गट विकास अधिकारी वा अभियंत्याच्या ग्रामपंचायतीचे वतीने सह्या नाहीत तरीही निविदा स्वीकारुन काम मंजुर केले आहे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166(3) नुसार मोजणी विषयीची प्रत्येक नोंद मोजमापपुस्तीकेत घेताना प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता आदेश क्रमांक, करारनामा क्रमांक व दिनांक, बांधकाम प्रत्यक्ष पुर्ण करण्याचा दिनांक मोजणीचा दिनांक इत्यादी तपशील सुरुवातीला नोंदविणे आवश्यक आहे तथापी मोजमाप पुस्तीकावरील कामाची प्रथम मोजमापे नोंदविताना सदरील माहिती नोंदविली नाही.

6) एका कामासाठी एक मोजमापवही ठेवण्यात यावी कोणत्याही परिस्थितीत एकाच मोजमाप वहीत वेगवेगळ्या कामाच्या नोंद घेण्यात येऊ नयेत व मोजमाप वहीमधील प्रत्येक नोंदी दिनांकीत असाव्यात असा नियम असताना सर्वच कामाच्या बाबतीत अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 मधील नियम 168 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी त्यांनी विहीत केलेल्या प्रमाणात कामाची तपासणी बाबत नोंद मापन पुस्तीकेत घेऊन स्वाक्षरी केली आहे परंतु स्वाक्षरी खाली दिनांक नमुद केलेला नाही.

8) सदरील कामाच्या देयकातुन मुल्यवर्धीत कर, कापात करण्यात आले असुन सदर रकमा विहित लेख्यात भरणा केल्या बाबत अभिलेखे लेखापरीक्षणात दर्शविले नाहीत सदर रक्कमा संबंधित लेखाशिर्ष अंतर्गत भरणा केल्याचे अभिलेखे दर्शवुन अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 100 नुसार कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी नमुना 42 मध्ये प्रकल्पांची नोंदवही ठेवुन त्यात नवीन बांधकामाचे सर्व प्रस्ताव नोंदविणे आवश्यक आहे अशी नोंदवही दर्शविली नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 197 अन्वये नमुना नंबर 69 मध्ये पुर्ण झालेल्या कामाची नोंद मालमत्ता नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. परंतु अशी नोंदवही दर्शविली नाही.

11) बांधकामाबाबाचे देयके प्रदानार्थ सादर करताना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती 1968 चे नियम 186 (1) मध्ये नमुद निर्देशाप्रमाणे अभियंत्यांची देयकांवर प्रतीस्वाक्षरी न घेताच देयकांचे प्रदान केले आहे.

12) सदर कामास जिल्हाधिकारी, परभणी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी व शासन यांनी काम प्रस्तावीतास परवानगी दिल्याबाबतचे पत्र संचिकेत उपलब्ध नाहीत. त्यामुळे ग्रामपंचायतीने प्रशासकीय मान्यता कशाचे अधारे दिली तसेच काम करणे बाबत काही अटी व शर्ती असल्यास त्यानुसार काम झाले किंवा नाही याची तपासणी करता आलेली नाही.

13) भारत सरकार आयकर अधिनियम, 1961 चे कलम 194 (क) मधीत तरतुदीनुसार देयकांच्या देय रक्कमेच्या 2 टक्के आयकर कपात रकणे आवश्यक असताना सोबत जोडलेल्या परिशिष्ट ब नुसार कामाच्या यादीतील देयकातुन आयकर कपात न केल्यामुळे रुपये 12,750/- + 38/- (सरचार्ज) एकुण रुपये 12,788/- चे जादा प्रदान झाले आहे.

14) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक 2009/प्र.क्र.123/पंरा-7, दिनांक 30/10/2009 अन्वये तपशिलामध्ये दर्शवलेल्या कामाच्या एकुण मुल्याच्या 1 टक्का कामगार कल्याण उपकर रुपये 9,958/- वसुल करुन सदरील रक्कम कामगार कल्याण मंडळाकडे धनाकर्षाने पाठविणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केली नाही.

15) सदर कामाची मोजमापपुस्तीका क्रमांक 896, पृष्ठ क्रमांक 49 वर रुपये 9,99,714/- मुल्यांकन आहे, परंतु कामास रुपये 3,62,324/- + 4,21,326/- + 2,16,151/- = 9,99,804/- प्रदान केले आहे त्यामुळे रुपये 90/- जादा प्रदान झाले आहे.

**4.267 जिल्हा परिषद उपकर अंतर्गत विविध कामाचे खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती हिंगोली व वसमत, जिल्हा हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6 व 8) -** सन 2014-2015 मध्ये ग्रामपंचायतींना जिल्हा परिषद उपकर अंतर्गत विविध कामाचे देयकानुसार पंचायत समिती हिंगोलीने रुपये 2,61,892/- व पंचायत समिती वसमतने रुपये 5,01,031/- एकूण रक्कम रूपये 7,62,923/-खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.472/वित्त-9(33), दिनांक 09/02/2009 नुसार कामे सरळ ग्रामपंचायतींना न देता शालेय व्यवस्थापन समितीस दिली आहेत. त्यामुळे शासन आदेशाचे पालन झालेले नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 नुसार कंत्राटदाराकडुन कामाचे 4 ते 5 टक्के सुरक्षा अनामत राखुन ठेवली नाही.

3) केंद्र शासन आयकर अधिनियम, 1961 चे कलम 194 (क) प्रमाणे कामाचे देयकातून आयकर रक्कम पंचायत समिती हिंगोली रुपये10,800/- व पंचायत समिती वसमत रुपये 13,545/- एकूण रक्कम रूपये 24,345/- कपात केली नाही.

4) महाराष्ट्र शासन राजपत्र क्रमांक 22/04/2012 नुसार दिनांक 01/04/2012 पासुन मुल्यवर्धीत कर कपातीचा दर 4 टक्के ऐवजी 5 टक्के करण्यात आल्याने रुपये 27,000/- मुल्यवर्धीत कर भरणा नाही. (पंचायत समिती हिंगोली)

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 21 प्रमाणे बांधकामाचे प्रदान देयकावर एक रूपयाचे मुद्रांक तिकिटावर पोंच घेण्यात आली नाही. (पंचायत समिती वसमत)

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 168 प्रमाणे बांधकामाचे मोजमापे कार्यकारी अभियंता यांची देयकाची 5 टक्के तपासणी नंतर प्रदान करणे आवश्यक असताना तपासणीशिवाय कामाचे देयक प्रदान केले.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 190 प्रमाणे कामपूर्णत्वाचे प्रमाणपत्र नमुना नंबर 65 मधिल विहीत नमुन्यात नोंद करून सदर काम संबंधित ग्रामपंचायतीना हस्तांतर केलेचे नमुद नाही.

8) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सिएटी-1087/सीआर-94/इमारत-02, दिनांक 14/06/1989 अन्वये दोष निवारण कालावधी मध्ये काम खराब झाल्यास दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबधीत यंत्रनेची राहील. याबाबत कार्यवाही नाही. (पंचायत समिती हिंगोली)

9) करारनाम्यावर दिनांक, साक्षीदारांच्या स्वाक्ष-या नाहीत. (पंचायत समिती हिंगोली)

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 169 नुसार कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता यांनी मोजमापाच्या तारखा मोजमाप पुस्तिकेत नोंदविल्या नाहीत. (पंचायत समिती हिंगोली)

11) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 नुसार काम पुर्ण झाल्यावर मोजमाप पुस्तिकेत काम पुर्णत्वाचा दाखला नोंदविला नाही. (पंचायत समिती हिंगोली)

12) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 171(2) प्रमाणे कामाचे मुल्यांकनाशिवाय खर्च नोंदविला. (पंचायत समिती हिंगोली)

**4.268 ग्रामपंचायतीचे मागील तिन वर्षाचे लेखापरिक्षण झाले नसतांना विकासकामे देण्याबाबत.**

**पंचायत समिती हिंगोली, जिल्हा हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती, हिंगोलीने सन 2014-2015 लेखापरीक्षणादरम्यान मोठ्या प्रमाणात कामे ग्रामपंचायतींना देण्यात आली असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, गावांतर्गत रस्ते, गटारे, विविध इमारती यांच्या बांधकामांबाबत मार्गदर्शिका 2011 मधील प्रकरण 4 निवीदा प्रक्रीया मधिल 4.6 नुसार ग्रामपंचायतीचे मागील तिन वर्षाचे लेखापरिक्षण झालेले असल्यावरच त्यांना कामे देण्याची तरतूद आहे. परंतु पंचायत समितीने राबविलेल्या योजना / विकासकामे सरळ ग्रामपंचायतीनां दिलेली असुन सदर मार्गदर्शिकेचे पालन झालेले नाही.

2) विकासकामे सरळ ग्रामपंचायतीनां दिल्यामुळे तसेच ग्रामपंचायत स्तरावर अभिलेखे अप्राप्त असल्यामूळे लेखापरिक्षण प्रलंबित राहते. तरी याबाबत पंचायत समितीने ने योग्य उपाययोजना करून मागील 3 वर्षाचे लेखापरिक्षण झालेल्या ग्रामपंचायतीनांच विकास निधी देण्यात यावा. लेखापरिक्षणात दिलेल्या निधी बाबत सक्षम प्राधिकारी यांचे निर्देशनास आणून शासनाचे क्षमापण आवश्यक आहे.

**4.269 4 ईमारत व दळणवळण पंचायत समिती उपकर अंतर्गत केलेल्या बांधकामातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती कंधार, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती कंधारचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 1,74,35,197/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सिमेंट रस्ता उमरजचे मुल्यांकन 1,97,071/- असतांना त्यांना रक्कम रूपये 2,00,000/- चे प्रदान केले. जादा प्रदान रक्कम रूपये 2,929/- वसूल करून योग्य लेखाशिर्षात जमा करावी.

2) प्रशासकिय मंजुरी अन्वये ग्रामपंचायत लाडका येथील सिमेंट रस्ता मारोती मंदिर, धोंडीबा ते हनमन्त किराणा पर्यंत व संजय शिंदे ते शंकर शिंदे यांचे घरापर्यत मंजुर असताना धोंडीबा ते हनमन्त किराणा पर्यंत काम न करता मारोती मंदिर जवळ सिमेंट रस्त्याचे भाग-2 काम केलेले आहे. काम बदलास सुधारित मंजुरी असल्यास दर्शवावे अन्यथा रक्कम वसुल करुन संबंधित खाते भरणा करावी.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 168 अन्वये कार्यकारी अभियंता यांनी रुपये 50,000/- च्या प्रत्येक टप्प्यामध्ये कामाची 5 टक्के तपासणी करणे आवश्यक असताना कार्यकारी अभियंता यांनी अशी तपासणी केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर-2009/प्र.क्र.180/परा-8,दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाचे जागी विहित प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारा माहिती फलक बसविणे आवश्यक आहे. तथापि अंदाजपत्रकात सदर बाबीसाठी तरतूद केलेली असतांना देखील असे माहिती फलक बसवण्यात आले नाहीत.

5) बांधकामांचे देयकातून मुल्यवर्धित कर, आयकर, गौणखनिज, विमा व कामगार उपकराच्या कपातीच्या रक्कमा कपात केल्या आहेत परंतू सदर कपातीच्या रक्कमा संबधित खाते भरणा केल्याबाबत चलन दर्शविणे आवश्यक असतांना ते चलन लेखापरिक्षणास दर्शविले नसल्याने प्रत्यक्ष कपात रक्कमांचा भरणा बाबत खात्री होत नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33 दिनांक 22/02/2000 अन्वये एका कामासाठी एकच मोजमाप पुस्तिका वापरणे आवश्यक असतांना नियमबाहयरित्या एकाच मोजमाप पुस्तिकामध्ये दुस-या कामांचे मोजमापे घेण्यात आली आहेत.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 97 व 197 अन्वये पूर्ण झालेल्या कामाची नोंद नमूना नंबर 39 व 69 मध्ये घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 67 (1) नुसार नमुना 23 मधील बांधकाम योजनांच्या प्रगतीची नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केली नाही.

**4.270 लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे अंतर्गत कामातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती कंधार, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती कंधारचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 67,16,965/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 153 अन्वये मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे काम करण्याची जबाबदारी संबधित कार्यकारी अभियंता व त्यांचे सहका-यांची असतांना मंजूर अंदाजपत्रकानुसार कामे करण्यात न येता परिमाणात जादा काम केले आहे त्यामूळे सामाजिक सभागृह बांधकाम मौजे शिराढोण तांडाचे अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार जादा परिमाणानुसार काम केल्याने रुपये 47,159/- व सामाजिक सभागृह रहाटीचे बाबत अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा परिमाणात जादा परिमाण वापरल्याने रुपये 27,093/- असे एकूण 74,252/- चे अंदाजपत्रकीय तरतूदीपेक्षा जादा काम केले आहे.

2) महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई अधिसूचना दिनांक 15/01/2006 व शासन निर्णय गौणखनिज क्रमांक 10/02/2006/प्र.क्र.57/2 ब मंत्रालय मुंबई अधिसूचना दिनांक 15/02/2006 अन्वये स्वामित्वधनाची रक्कम शाखा अभियंता यांनी परिभाषित करुन मोजमाप पुस्तिकेत नमुद करणे आवश्यक आहे. परंतू मौजे अंबूलगा येथील सी. सी. रोड बांधकामाचे देयकातून रुपये 23,806/- रॉयल्टी कमी कपात केली आहे.

3) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील नियम 296 (ब) अन्वये माहे फेब्रूवारी व माहे मार्च मध्ये कामाचे आदेश देऊ येत असे असतांना माहे फेब्रूवारी व माहे मार्च मध्ये नियमबाहयरित्या कामाचे आदेश निर्गमित करण्यात आले.

4) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांचे प्रशासकीय मान्यता आदेशातील अटीनूसार काम सूरु करण्यापूर्वी व काम पूर्ण झाल्यानतंरचे छायाचित्रे संचिकेत ठेवणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

**4.271 17 - सामु. विकास पंचायत समिती उपकर अंतर्गत अंगणवाडी दुरुस्ती कामातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती किनवट, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती किनवटचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रुपये 40,204/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेड.पी.ए.2000/प्र.क्र.-44/33, दिनांक 22/2/2000 नुसार एका कामासाठी एक मोजमापवही ठेवण्यात यावी.कोणत्याही परिस्थीतीत एकाच मोजमाप वहीत वेगवेगळया कामाच्या नोंद घेण्यात येऊ नयेत व मोजमाप वहीमधील प्रत्येक नोंदी दिनांकीत असाव्यात परंतू सर्वच कामाच्या बाबतीत अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट साहित्य 1099/प्र.क्र.-56/35,दिनांक 30/06/2000 नुसार बांधकाम साहीत्् कामावर वापरण्यापुर्वी साहीत्याचे वारंवारीतेने शासकीय प्रयोग शाळेकडून चाचणी करून घेणे आवश्यक आहे तरी असा चाचणी अहवाल संचिकेत जोडला नाही.

3) गटविकास अधिकारी यांनी सक्षमतेचे प्रमाणपत्र न घेता ग्रामपंचायतीला कामे मंजूर केलेली आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 190 (3) अन्वये काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र नमुना 65 मध्ये देणे आवश्यक असताना विहीत नमुन्यात प्रमाणपत्र घेतले नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 20 अन्वये कंत्राटदाराने रक्कम प्राप्ती बाबत महसुल मुद्रांकीत पोच देणे आवश्यक असतांना अशी पोच घेण्यात आलेली नाही.

**4.272 17 - सामु.विकास प.स.उपकर अंतर्गत अंगणवाडी दुरुस्ती पिंपरफोडी कामातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती किनवट, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती किनवटचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रुपये 39,852/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेड.पी.ए.2000/प्र.क्रमांक-44/33, दिनांक 22/2/2000 नुसार एका कामासाठी एक मोजमापवही ठेवण्यात यावी. कोणत्याही परिस्थीतीत एकाच मोजमाप वहीत वेगवेगळया कामाच्या नोंद घेण्यात येऊ नयेत व मोजमाप वहीमधील प्रत्येक नोंदी दिनांकीत असाव्यात परंतू सर्वच कामाच्या बाबतीत अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांकसिमेंट साहित्य 1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 नुसार बांधकाम साहीत्् कामावर वापरण्यापुर्वी साहीत्याचे वारंवारीतेने शासकीय प्रयोग शाळेकडून चाचणी करून घेणे आवश्यक आहे तरी असा चाचणी अहवाल संचिकेत जोडला नाही.

3) गटविकास अधिकारी यांनी सक्षमतेचे प्रमाणपत्र न घेता ग्रामपंचायतीला कामे मंजूर केलेली आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 190 (3) अन्वये काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र नमुना 65 मध्ये देणे आवश्यक असताना विहीत नमुन्यात प्रमाणपत्र घेतले नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 20 अन्वये कंत्राटदाराने रक्कम प्राप्ती बाबत महसुल मुद्रांकीत पोच देणे आवश्यक असतांना अशी पोच घेण्यात आलेली नाही.

**4.273 लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे अंतर्गत कामातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती किनवट, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती किनवटचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रुपये 1,23,05,781/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008 प्र.क्रमांक444/वित्त-9,दिनांक 15/07/2008 नुसार प्रशासकीय व तांत्रीक माहीती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केल्या बाबतचा ठराव दिसुन आला नाही.

2) परिच्छेदात नमुद केलेल्या कामासंबंधी लीड चार्जेस बाबत खदानीचे नकाशे उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे चार्जेस जादा प्रदान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 169 नुसार कार्यकारी अभियंता/उपअभियंता यांनी कामाची 10% तपासणी करुन दिनांकीत स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.त्या प्रमाणे कार्यवाही झाली नाही.अनुसूचित दर्शविलेल्या कामाच्या देयकातुन विमा, मुल्यवर्धीत कर,स्वामित्वधन इत्यादी कपाती करण्यात आल्या असुन सदरील कपात करण्यात आलेल्या रक्कमा विहीत केलेल्या लेख्यात भरणा करणे आवश्यक आहे.त्याप्रमाणे रक्कम भरणा केल्याचे लेखे दर्शविले नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक सिमेंट/1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 नुसार साहित्य वापरण्यापुर्वी शासकीय प्रयोग शाळेतुन चाचणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे वरील कामाच्या बाबतीत गुणवत्ता चाचणी अहवाल संबंधीत नस्तीस दिसुन आला नाही.

5) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांचे प्रशासकीय मान्यता आदेशातील अटी नुसार सदरचे काम सुरू करण्यापुर्वी तेथील जागेचा आणि कामपुर्ण झाल्यानंतर कामपुर्णत्वाचा दोन फोटो सादर करणे बंधनकारक असताना संचिकेत कामाचे फोटो दिसुन आले नाही.

**4.274 अनुसूचीत जाती नवबौदधवस्ती दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत केलेल्या कामातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती किनवट, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती किनवटचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रुपये 92,14,407/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अनुक्रमांक 18 वरील सिमेंट रस्ता गौतमनगर मांडवा (कि) तपासणी केली असता प्रथम धावते देयकानुसार बाब क्रमांक.2 Pro & laying 80 mm soling 32.85 cum दर 761.61 रूपयक 37,494/- व बाब क्रमांक 03 Pro & laying rcc 1;3;6 32.85 cum दर 3600 रूपये 1,18,260/- चे मुल्यांकन मोजमाप पुस्तिका क्रमांक 4314 पृष्ठ क्रमांक 07 वर नोंदविलेले आहेत.सदर कामाचे अंतिम मुल्यांकनाची तपासणी केली असता बाब क्रमांक 02 रूपये 37,494/- मुल्यांकनची नोंद नाही व बाब क्रमांक 03 मध्ये खाडाखोड करून प्रत्यक्ष मुल्यांकन कमी असताना रूपये 1,49,220/- चे मुल्यांकन नोंदवून रूपये 30,960/- ने वाढ केली आहे व बाब क्रमांक 4 मध्ये प्रत्यक्ष मुल्यांकन रूपये 1,42,371/- असताना त्यात वाढ करून रूपये 6,501/- वाढ केली आहे. बाब क्रमांक 2 प्रथम धावते देयकानुसार मुल्यांकन नोंदविलेले असताना अंतिम देयकात सदर बाबीचे मुल्यांकन न नोंदविणे व बाब क्रमांक 3 व 4 मध्ये रूपये 37,461/-ने मूल्यांकनात वाढ करणे सदर बाब गंभीर असून चुकीचे मुल्यांकन नोंदविलेले आहे त्यामुळे सदर कामाची तांत्रिक व क्षेत्रीय तपासणी करून कार्यवाही होणे आवश्यक आहे.

2) बांधकामाची मोजमाप पुस्तीका व अंदाजपत्रकाची तपासणी केली असता वाहतुक अंतर विहित मर्यादेपेक्षा जादा दिल्याचे दिसुन येते.याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 12 दिनांक 27/01/2016 अन्वये साहीत्याच्या वाहतुक अंतराबाबत सर्वेक्षण करून खदाणीचे नकाशे उपलब्ध करून देणे बाबत लेखी मागणी करूनही दर्शविले नाही. अंदाजपत्रकासोबतच्या साहीत्याच्या वाहतुक अंतराबाबत सर्वेक्षण करून खदाणीचे नकाशे जिल्हा व तालुकानिहाय तयार करून रस्ते,पुल,इमारतीचे सविस्तर अंदाजपत्रके तयार करताना Optimum use of locally available material हा concept विचारात घेवुन वाहतुक अंतरे विचारात घेणे अभिप्रेत आहे. बांधकाम साहीत्याची वाहतुक अंतरे Qurry chart मध्ये दर्शवुन अंतर प्रमाणीत करावित व अशा आशयाचे प्रमाणपत्र क्षेत्रीय अधिकारी यांनी द्यावे तसेच वाहतुक अंतराच्या दरसुची प्रमाणे किमंती घेवुन Lead charges statement ही प्रमाणीत करून अंदाजपत्रकात समाविष्ट करणे अनिवार्य आहे.परंतु असे प्रमाणीत न करता वाहतुक अंतरे दरपृथ:करणात समाविष्ट करून दर दिल्यामुळे जादा प्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत खदाणीचे नकाशे तालुकानिहाय दर्शविणे आवश्यक आहे. तसेच व जादा दिलेले लीड बाबत तांत्रिक तपासणी करून रक्कम वसूल करून शासन खाती भरणा करावी.

3) महाराष्ट्र शासन, सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु-2011/ प्र.क्र.442/अजाक, दिनांक 05/12/2011 अन्वये ग्रामसभेने ठराव पारीत करून ग्रापंचायतीकडे पाठविल्याचे व गटविकास अधिकारी यांनी अनुसूचीत जाती नवबौदध् दलीत वस्तीची तपासणी करून जिल्हा समितीकडे पाठविल्याचे अभिलेखे दर्शविले नाही.

4) कामाची निवड प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही व निधी वितरण प्रत्येक आर्थीक वर्षाच्या सप्टेंबर महिना अखेर पुर्ण व्हावी व शक्यतो कामे त्याच आर्थीक वर्षात पुर्ण व्हावीत असे नमुद असुन शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5) कामाची तपासणी केली असता देयकातून मूल्यवर्धितकर, आयकर, गौणखनीज, विमा व कामगार उपकाराची रक्कम कपात केलेली आहे परंतु सदर रक्कम संबधित खाते भरणा केल्याचे चालन दर्शविले नाही.

**4.275 13 वा वित्त आयोगामधुन केलेल्या विविध कामातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती लोहा, जिल्हा नांदेड, सन 2012-2013 ते 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19) -** पंचायत समिती लोहा सन 2012-13 ते 2014-15 मध्ये 13 वा वित्त आयोग मधुन केलेल्या विविध बांधकामावर रुपये 2024027/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/ वित्त-9, दिनांक 19/03/2012 अन्वये पंचायत समिती स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रीक मान्यतेची माहिती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतु अशी कार्यवाही केले बाबतचा ठराव दिसुन येत नाही.

2) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक झेडपीए-2009/प्र.क्र.472/वित्त-09(33), दिनांक 01/02/2009 अन्वये तांत्रीक व आर्थीकदृष्टया सक्षम असलेल्या व रूपये 5,000/- पर्यंत उत्पन्न असणा-या ग्रामपंचायतीना रूपये 10 लाख किंमतीपर्यंत काम देता येतात. परंतु ग्रामपंचायतीचे उत्पन्नाचे संचीकेत आढळुन आले नाही. तसेच गटविकास अधीकारी यांचे ग्रामपंचायत सक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र संचीकेत आढळुन आले नाही.

3) गटविकास अधीकारी यांचे सदर काम सुरु करण्यासाठी कार्यारंभ आदेश निरंक असुन दिनांक नमुद आहे. तसेच काम सुरु होण्यापुर्वी व कामपुर्ण झाल्यानंतरचे फोटो संचीकेत नाहीत.

4) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 व सार्वजनीक बांधकामे विषयक परिपत्रक क्रमांक जी.आर.-341का-4/5162, दिनांक 02/08/1987 व महाराष्ट्र ग्रामविकास व जलसंधारण विभाग परीपत्रक क्रमांक सिमेंट-1099/प्र.क्र.156/35,दिनांक 30/06/2000 अन्वये कामावर साहीत्य / सिमेंट वापरण्यापुर्वी प्रयोग शाळेत तपासणी करुन चाचणी अहवाल प्राप्त करुन साहीत्य वापरणे आवश्यक होते. तरी अनुक्रमांक 3,4,5,7 व 8 कामाबाबतीत असा अहवाल घेतला नाही व अनुक्रमांक 1,2,6,10,11,12,13 चा अहवाल कामपुर्ण झाल्यावर घेतला आहे.

5) 2002 तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र 04/04/2012 अन्वये अनोंदणीकृत कंत्राटदाराकडुन दिनांक 01/04/12 पासुन मुल्यवर्धीत कराची रक्कम 5 टक्के प्रमाणे वसुल करणे आवश्यक होते. परंतु 4 टक्के प्रमाणे वसुल करण्यात आली आहे. तरी कमी वसुल केलेली केलेली 1 टक्के रक्कम रुपये 9,274/- वसुल करुन शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

6) महाराष्ट्र जिल्हापरीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 अन्वये प्रत्येक पुर्ण झालेल्या कामाची नोंदवही नमुना नंबर 69 मध्ये ठेवणे आवश्यक असताना नियमाप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. तसेच नियम 67 (1) नुसार नमुना नंबर 23 मध्ये बांधकामाची प्रगती नोंदवही ठेवलेली नाही.

7) अंदाजपत्रकात कामाच्या सर्वात जवळच्या अंतरावरील खदानीवरुन साहीत्य वापरण्यात येत असुन दर सुचीतील दर व शासनमान्य खदानीचाच कामासाठी वापर करण्यात येत आहे. असे प्रमाणपत्र शाखा अभीयंता, उपअभीयंता व गटविकास अधीकारी यांच्या स्वाक्षरीनिशी अंदाजपत्रका सोबत असणे आवश्यक आहे. परंतु असे प्रमाणपत्र अंदाजपत्रकासोबत दिसुन आले नाही.

8) महाराष्ट्र जिल्हापरीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 97 नुसार पुर्ण झालेल्या रस्त्याची नोंदवही नमुना नंबर 39 मध्ये नोंद घेतली नाही.

9) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33,दिनांक 22/12/2000 नुसार कोणत्याही परीस्थीतीत एकाच मोजमापवहीत वेगवेगळया कामाच्या नोंदी घेण्यात येवु नयेत असे असताना प्रस्तुत कामावर वापरण्यात आलेल्या मोजमाप वहीत वेगवेगळया कामाच्या नोंदी घेतल्या नाहीत.

10) महाराष्ट्र जिल्हापरीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 168 (क) प्रमाणे कार्यकारी अभीयंता / उपअभीयंता यांनी कामाच्या 5 टक्के प्रमाणे तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु कामाच्या प्रत्येक टप्याप्रमाणे कार्यकारी अभीयंता / उप अभीयंता यांनी तपासणी केली नाही.

**4.276 कलंबर (बू.) व सावरगांव, कास्टेवाडी येथी बांधकामाबाबत.**

**पंचायत समिती लोहा, जिल्हा नांदेड, सन 2012-2013 ते 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 20) -** पंचायत समिती लोहाचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 7,00,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय झेडपीए 2012/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 19/03/2012 अन्वये पंचायत समिती स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची माहिती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे परंतू अशी कार्यवाही झालेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2009/प्र.क्र.472/ वित्त-9 (33), दिनांक 01/02/2009 अन्वये तांत्रिक व आर्थिक दृष्टया सक्षम असलेल्या व रुपये 5,000/- पर्यंत उत्पन्न असणा-या या ग्रामपंचायतींना रुपये 10 लाखा किंमतीपर्यंत काम देता येतात परंतू ग्रामपंचायतीचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र संचिकेत आढळून आले नाही तसेच गटविकास अधिकारी यांचे ग्रामपंचायत सक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र संचिकेत आढळून आले नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 87 व सार्वजनिक बांधकाम विषयक परिपत्रक जी.आर.341/का-4/5162, दिनांक 02/08/1987 अन्वये साहित्य वापराबाबत चाचणी अहवाल काम सुरु होण्या अगोदर घेणे आवश्यक आहे. परंतू मूळ परिच्छेदातील अनुक्रमांक 1 काम पूर्ण झाल्यावर चाचणी अहवाल घेतला आहे.

4) रॉयल्टी कपात करुन रुपये 19,790/- देय असातना रुपये 2,05,347/- देण्यात आली असुन जादा प्रदान झालेली रक्कम शासन खाती भरणा करावी.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 168(क) प्रमाणे कार्यकारी अभियंता / उपअभीयंता यांनी कामाच्या 5 टक्के प्रमाणे तपासणी करणे आवश्यक असताना कामाच्या प्रत्येक टप्प्याप्रमाणे कार्यकारी अभियंता/उपअभियंता यांनी तपासणी केली नाही.

4) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमाप/1098/प्र.क्र.28,दिनांक 19/08/1998 अन्वये कंत्राटी कामाच्या मुल्यांच्या 0.90 पैसे दराने कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही झालेली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 197 अन्वये प्रत्येक पूर्ण कामाची नोंदवही नमूना नंबर 69 मध्ये ठेवणे आवश्यक असतांना नियमांप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. तसेच नियम 67 (1) नुसार नमूना नंबर 23 मध्ये बांधकाम प्रगती नोंदवही ठेवलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.44/ 33, दिनांक 22/12/2000 नुसार कोणत्याही परिस्थिती एकाच मोजमापवहीत वेगवेगळया कामाच्या नोंदी घेवू नये असतांना नियमाचे पालन केले नाही.

7) रॉयटी कपात करुन रुपये 1,97,904/- देय असताना रुपये 2,05,347/- देण्यात आली असून जादा प्रदान रुपये 7,443/- चे झाले असून जादा रक्कम शासन खाती भरणा करावी.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 147 मधील नमुना नंबर 48 मधील करार नोंदवही ठेवण्यात यावी अशी नोंदवही ठेवण्यात न आल्यामुळे कार्यदेशापुर्वी रितसर करार झाल्याची खात्री होवू शकली नाही.

**4.277 अंगणवाडी बांधकामात अनियमितता झाल्याबाबत.**

**पंचायत समिती लोहा, जिल्हा नांदेड, सन 2012-2013 ते 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 21) -** पंचायत समिती लोहा सन 2012-13 ते 2014-15 मध्ये जिल्हा वार्षीक योजने अंतर्गत अंगणवाडी बांधकामावर रक्कम रुपये 11,25,735/- खर्च नोंदविला आहे.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 19/03/2012 अन्वये पंचायत समिती स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रीक मान्यतेची माहिती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतु अशी कार्यवाही केले बाबतचा ठराव दिसुन येत नाही.

2) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक झेडपीए-2009/प्र.क्रमांक.472/वित्त-09(33), दिनांक 01/02/2009 अन्वये तांत्रीक व आर्थीकदृष्टया सक्षम असलेल्या व रूपये 5,000/- पर्यंत उत्पन्न असणा-या ग्रामपंचायतीना रुपये 10 लाख किंमतीपर्यंत काम देता येतात. परंतु ग्रामपंचायतीचे उत्पन्नाचे संचीकेत आढळुन आले नाही. तसेच गटविकास अधीकारी यांनी ग्रामपंचायत सक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र संचीकेत आढळुन आले नाही.

3) महाराष्ट्र जिल्हापरीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे कलम 99 नुसार प्रशासकीय मान्यता अनुक्रमांक 1 संचिकेत आढळुन आली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हापरीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 व सार्वजनीक बांधकामे विषयक परिपत्रक क्रमांक जी.आर.-341का-4/5162, दिनांक 02/08/1987 व महाराष्ट्र ग्रामविकास व जलसंधारण विभाग परीपत्रक क्रमांक सिमेंट-1099/प्र.क्र.156/35, दिनांक 30/06/2000 अन्वये कामावर साहीत्य / सिमेंट वापरण्यापुर्वी प्रयोग शाळेत तपासणी करुन चाचणी अहवाल प्राप्त करुन साहीत्य वापरणे आवश्यक होते. तरी अनुक्रमांक.01 चा अहवाल कामपुर्ण झाल्यावर घेतला आहे.

5) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी/2005/प्र.क्र.324/ईमारती-2 दिनांक 03/03/2006 अन्वये 4 टक्के मुल्यवर्धीत कर कपात करणे आवश्यक असतांना अशी कपात केली नाही. रक्कम रूपये 22,500/- वसुल करावे.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस 1099/ प्र.क्र.54/08,दिनांक 20/05/1999 अन्वये जिल्हा परीषदेमार्फत नवीन व दुरुस्तीच्या रुपये 20,000/- व त्यापेक्षा अधीक रक्कमेच्या दर्शक फलक कामाच्या ठिकाणी लावणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही केली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हापरीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166 (3) नुसार मोजणी विषयाची प्रत्येक नोंद मोजमाप पुस्तीकेत घेताना बांधकामाचे पुर्ण नाव, कामाची जागा, करारनाम्याचा क्रमांक व दिनांक, प्रशासकीय व तांत्रीक मान्यता, कंत्राटाचे नाव कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक व कार्यपुर्तीचा दिनांक इत्यादीचा तपशील नोंदविणे आवश्यक आहे. तथापी मोजमापे नोंदविताना सदरील माहिती नोंदविली नाही.

8) अंदाजपत्रकात कामाच्या सर्वात जवळच्या अंतरावरील खदानीवरुन साहीत्य वापरण्यात येत असुन दर सुचीतील दर व शासनमान्य खदानीचाच कामासाठी वापर करण्यात येत आहे. असे प्रमाणपत्र शाखा अभीयंता, उपअभीयंता व गटविकास अधीकारी यांच्या स्वाक्षरीनिशी अंदाजपत्रका सोबत असणे आवश्यक आहे. परंतु असे प्रमाणपत्र अंदाजपत्रकासोबत दिसुन आले नाही.

9) सदरील कामाच्या देयकातुन विविध प्रकारच्या रक्कमा (मुल्यवर्धीत कर, आयकर,विमा, स्वामीत्वधन) कपात केल्याचे आढळुन आले आहे. तथापी सदरील कपात रक्कमा या विहीत नोंदवही खाती नोंद व भरणा केल्या बाबतच्या नोंदी तथा पावत्या लेखा परीक्षणात पाहवयास मिळाल्या नाहीत नोंदी व पोचपावत्या दर्शवुन अनुपालन दर्शवावे.

10) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमाप/1098/प्र.क्र.28, दिनांक 19/08/1998 अन्वये कंत्राटी कामाच्या मुल्यांच्या शेकडा 90 पैसे दराने कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तथापी अशी कार्यवाही झाले नाही. तरी विमा रुपये 6,300/- कपात करुन विमा संचालयाकडे भरणा करावा.

**4.278 लोकप्रतिनिधीनी सुचविलेले सी.सी. रस्ता बांधकामातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती लोहा, जिल्हा नांदेड, सन 2012-2013 ते 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 35) -** पंचायत समिती लोहाचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 6,99,935/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामाची मोजमापे नोंदवितांना जादा परिमाण नोंदवून रुपये 5,536/- जादा दर्शविले तसेच मूल्यवर्धित कर 7,000/- एकूण रुपये 12,536/- वसूल करुन शासन खाती भरणा करावी.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1961 चे नियम 99 नुसार प्रशासकीय मान्यता आदेश काम अनुक्रमांक 1 ची संचिकेत आढळून आली नाही.

3) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम 2002 तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र 04/04/2012 अन्वये अनोंदणीकृत कंत्राटदाराकडून दिनांक 01/04/2012 पासून मूल्यवर्धित कर 5 टक्के घेणे आवश्यक असतांना 4 टक्के वसूल केले.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 180 अन्वये मोजमाप पुस्तिकेत नोंदवलेली सर्व कामे लालशाहीने कर्णरेषा काढून न चूकता रक्कम प्रदान केल्यानतंर अधोरेखित करणे आवश्यक आहे, अशी कार्यवाही केलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 197 नुसार प्रत्येक पुर्ण झालेल्या कामाची नोंद नमूना नंबर 69 मध्ये नोंद घेणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झालेली नाही. तसेच नियम 67 (1) नुसार नमुना नंबर 23 मध्ये बांधकामाची प्रगती नोंदवही ठेवली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस 1099/प्र.क्र.54/08,दिनांक 20/05/1999 अन्वये जिल्हा परिषदेमार्फत नवीन व दुरुस्तीच्या रुपये 20,000/- व त्यापेक्षा अधिक रक्कमेच्या कामाच्या ठिकाणी माहिती फलक लावणे आवश्यक आहे. परंतू अशी कार्यवाही झालेली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 168 (क) प्रमाणे कार्यकारी अभियंता / उपअभियंता यांनी कामाच्या 5 टक्के प्रमाणे तपासणी करणे आवश्यक आहे. परंतू कामाच्या टप्याप्रमाणे कार्यकारी अभियंता / उपअभियंता यांनी तपासणी केली नाही.

**4.279 दलित वस्ती सुधार योजना कामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती माहुर, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती माहुरचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात एकुण 3 बांधकामावर रक्कम रुपये 7,70,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम 2002 तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र 04/04/2012 अन्वये दिनांक 01/04/2012 पासुन मुल्यावर्धित कराची रक्कम 5 टक्के प्रमाणे वसुल करणे आवश्यक आहे. त्यानुसार उपरोक्त अनुक्रमांक 1 या कामातुन रुपये 15,000/- व अनुक्रमांक 3 या कामातुन रुपये 10,000/- कपात करणे आवश्यक होते. परंतु सदर कामातुन अनुक्रमांक रुपये 12,000/- व रुपये 8,000/- कपात करण्यात आले आहे म्हणजेच अनुक्रमांक 1 मध्ये रुपये 3,000/- व अनुक्रमांक 3 मध्ये रुपये 2,000/- असे एकुण रुपये 5,000/- कमी कपात करण्यात आली आहे. तरी काम केलेल्या ग्रामपंचायतीकडुन मुल्यवर्धित कर रक्कम रुपये 5,000/- वसुल करुन शासन खाती भरणा करावा.

2) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 व सार्वजनिक बांधकाम विषयक परिपत्र क्रमांक जी.आर.34/का-04/5162, दिनांक02/08/1987 व महाराष्ट्र ग्रामविकास व जलसंधारण विभाग

परिपत्रक क्रमांक सिमेंट 1099 प्र.क्र.156/35, दिनांक 30/06/2000 अन्वये कामात वापरण्यात येणारे साहित्य / सिमेंट वापरण्या पुर्वी प्रयोग शाळेत तपासणी करुन चाचणी अहवाल प्राप्त करुन साहित्य वापरणे आवश्यक होते परंतु उपरोक्त कामात साहित्य वापरण्यापुर्वी चाचणी अहवाल प्राप्त करुन घेतलेला नाही.

3) महाराष्ट्र शासन जिल्हापरीषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 197 नुसार प्रत्येक पुर्ण झालेल्या बांधकामाची नोंदवही नमुना नंबर 69 मध्ये नोंद घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली नाही. तसेच नियम 67(01) नुसार नमुना नंबर 23 मध्ये बांधकाम प्रगती नोंदवही ठेवलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक वि.पी.एस 1099/प्र.क्र.-99/08,दिनांक 20/05/1998 नुसार कामाच्या ठिकाणी कामाच्या नावाचा तपशिल वार खर्चासह फ़लक लावणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

**4.280 लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे अंतर्गत कालीका मंदिरासमोर सभागृह बांधकाम मौ. हिमायतनगर मधील कामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती हिमायतनगर, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती हिमायतनगरचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 15,00,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 166 (अ) अन्वये कामाची सुरुवात झाल्यानंतर प्रत्येक वेळी कामाच्या मोजमापाची नोंद हि मोजमाप पुस्तिकेत दिनांकीत स्वाक्षरीने घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

2) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार बांधकामाच्या देयकातून 2 टक्के आयकर रुपये 35,100/- कपात केलेला नाही तो कपात करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक संकिर्ण 2009/प्र.क्र.123/ प.रा.-7,दिनांक 30/10/2009 नुसार 1 टक्के कामगार उपकराची रक्कम 15,000/- वसूल करण्यात आली नाही.

4) देयकातून विमा रक्कम रुपये 15,000/- वसूल करणे आवश्यक असतांना तो वसुल करण्यात आलेला नाही.

5) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम 2002 तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र 04/04/2012 अन्वये बांधकामाचे देयकातून मुल्यवर्धित कराची 5 टक्के रक्कम भरणा करणे आवश्यक असतांना तो भरणा केला नाही.

**4.281 पंचायत समिती उपकर योजनेंतर्गत केलेल्या कामातील नियमबाह्यतेबाबत.**

**पंचायत समिती अहमदपूर, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961चे कलम 101 व 108 नुसार पंचायत समिती स्वनिधीमधून घेण्यात येणाऱ्या कामांना पंचायत समितीची मान्यता असणे आवश्यक असताना मौ. हिप्परगा (का) येथील दिलीप पाटील ते चावडी भुमिगत नाली बांधकामाचे प्रदान प्रमाणक क्रमांक 25, दिनांक 23/02/2015 रक्कम रुपये 72,184/- केलेले असून सदरील कामास पंचायत समितीच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आलेली नाही.

2) अनुक्रमांक 9 चे हिप्परगा काजळ येथील सिमेंट रस्ता व नाली दुरुस्तीच्या कामामध्ये गौणखनीजाची रक्कम रुपये 18,922/- कपात करणे आवश्यक असताना रक्कम रुपये 12,057/- कपात केलेली आहे. तरी रक्कम रुपये 6,865/- कपात करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

3) पंचायत समिती अहमदपूरने ग्रामपंचायतीस विनानिविदा कामे दिलेली आहेत. सदरील कामाच्या निविदा ग्रामपंचायतीस विक्री केलेली नाही. निविदा कागदपत्रे न भरल्यामुळे कामाच्या अटी व शर्तीस ग्रामपंचायतीस बंधनकारक झालेल्या नाहीत. तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.428/वित्त-9,दिनांक 30/12/2008 नुसार विना निविदा देण्यात येणाऱ्या प्रत्येक कामाकरिता कोऱ्या

निविदा संचाच्या विक्रीचे दर ठरविण्यात आलेले आहेत. त्यानुसार रुपये 5 लाखापर्यंत कंत्राटाची रक्कम असलेल्या कामासाठी रुपये 100 व रुपये 10 लाखापर्यंत कंत्राटाची रक्कम असलेल्या कामासाठी रुपये 200 निविदा संचाची किंमत निश्चित केलेली आहे. तरी सन 2014-15 मध्ये घेण्यात आलेल्या एकूण 09 कामासाठी निविदा संचाची खरेदी केलेली नाही. तरी रक्कम रुपये 900 वसूल करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 145 नुसार ग्रामपंचायतीकडून सुरक्षा अनामत रक्कम ही सर्वसाधारणपणे इतर कंत्राटदाराच्या सुरक्षा अनामत रक्कमेच्या अर्धी रक्कम (अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 2 ते 3 टक्के रक्कम) सुरक्षा अनामत म्हणून ठेवण्यात येईल. अशी सुरक्षा अनामत रक्कम करारनाम्यातील अटी व शर्ती पूर्ण केल्याशिवाय परत देण्यात येवू नयेत. पंचायत समिती अहमदपूरने सन 2014-15 मधील एकूण नऊकामातून सुरक्षा अनामत रक्कम कपात केलेली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 146 नुसार कंत्राटदारासोबत करार (शेड्यूल बी) करण्यात येईल. तसेच नियम 147 नुसार प्रत्येक कराराची नोंद नमुना नंबर 48 मध्ये नोंदविण्यात येईल. परंतु कंत्राटदारासोबत करार (शेड्यूल बी) व नमुना नंबर 48 ची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

6) अनुक्रमांक 1,2, 3, 5, 6, 8 व 9 मधील कामे ही दुरुस्तीची केलेली आहेत. दुरुस्तीचे काम प्रस्तावित करताना सदरील मूळ काम कधी पूर्ण झालेले आहे तसेच त्या पूर्वीच्या कामाचा दोष निवारण कालावधी संपुष्टात आला आहे का याबाबत खात्री करणे आवश्यक असताना अशी खात्री बांधकाम विभागाकडून करण्यात आलेली नाही. त्यामुळे दोष दायित्व निवारण कालावधीतच दुरुस्तीची कामे झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.-विकास-2011/प्र.क्र.217/पं.रा.8, दिनांक 15/11/2011 नुसार सर्व कामे मुदतीमध्ये पूर्ण होतील या दृष्टीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियंत्रण ठेवावे व काम पूर्णत्वाचे दाखले व उपयोगिता प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महालेखापाल, विभागीय आयुक्त कार्यालय व शासनास सादर करावे तथापी अशी कार्यवाही केल्याबाबतची तपासणी करता आली नाही.

8) ग्राम पंचायतीस रक्कम प्राप्त झाल्याबाबत नमुना नंबर 7 ची सामान्य पावती घेण्यात आली नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 197 नुसार पूर्ण झालेल्या कामाच्या नोंदी नमुना नंबर 69 मध्ये घेण्यात यावी तसेच लेखासंहिता 1968 चे नियम 97 अन्वये नमुना नंबर 40 मध्ये रस्त्याची नोंद घेणे आवश्यक असताना अशा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

10) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक विकास-2011/प्र.क्र.217/ पं.रा.8,दिनांक 15/11/2011 नुसार होणारी कामे चांगल्या दर्जाची व टिकाऊ होण्यासाठी प्रधानमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत कार्यान्वित असलेल्या राज्य गुणवत्ता नियंत्रक याचेकडून कामाची तपासणी करण्यात यावी. या तपासणीचा मोबदला म्हणून अंदाजपत्रकामध्ये अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1 टक्के ची तरतूद करण्यात यावी. परंतु पंचायत समितीने अशी कामाच्या अंदाजपत्रकामध्ये अशी तरतूद केलेली नाही व अशी तपासणी करून घेतलेली नाही.

11) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 2009/प्र.क्र.81/ पंरा-7,दिनांक 08/06/2009 नुसार कामाच्या ठिकाणी कामाची माहिती दर्शविणारे फलक बसविण्यात यावेत. परंतु सदर माहिती फलक बसविण्यात आलेले नाहीत.

12) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 180 नुसार अंतिम मोजमाप घेवून रक्कम प्रदान केल्यानंतर मोजमाप पुस्तिकेवर लाल शाईने कर्ण रेषा मारावयास पाहिजे परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

13) सदरील अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 42 दिनांक 21/10/2015 अन्वये विचारणा केली असता सदरील अर्धसमास पत्राचे उत्तर दिलेले नाही.

**4.282 शाखा अभियंता यांना विशेष वेतन रोख भत्ता प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती अहमदपूर, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 21) -** पंचायत समिती, अहमदपूर सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात खालील प्रमाणकान्वये शाखा अभियंता / अभियंता यांना विशेष वेतन रोखभत्ता रुपये 100 दरमहा देण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वित्त विभाग, शासन अधिसुचना वेपूर-1029 प्र.क्र.27 सेवा-9, दिनांक 22/04/2009 अन्वये सहाव्या वेतन आयोगातील सुधारित वेतन संरचनेत रोख भत्ता देय नाही. त्यामुळे संबधीताना 01/01/2006 पासून दिलेले भत्ते रुपये 30,400/- चे जादा प्रदान झाले आहे. ते वसूल करावेत व योग्य त्या लेखाशीर्षाखाली भरणा करणे आवश्यक आहे.

2) सदरील अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 40 दिनांक 21/10/2015 अन्वये विचारणा केली असता सदरील अर्धसमास पत्राचे उत्तर दिलेले नाही.